साप्ताहिक

माणूस

२६ सप्टेंबर ८३ / दोन रुपये.

मी उभा कोऽम्यासारखा
छत्रसालच्या सीमेवर

प्रभचिन्हांच्या भोवऱ्यात आसाम

सी बुल्फ ... एक्सोसेट .. हार्पून

क्षेपणास्त्र स्पर्धा

साप्ताहिक
माणूस

वर्ष : तेविसावे
अंक : सतरावा

२४ सप्टेंबर १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
संजय पवार

पुणे वार्ता

'स्त्री-मुक्ती पुरस्कार' प्रदान समारंभ

'स्त्री-मुक्ती' ही कल्पना पाश्चिमात्य आहे किंवा स्त्रीमुक्ती हे एक फॅड आहे अशी गैरसमजूत सामान्य, असामान्य जनमानसात अजूनही आहे. त्यामुळे स्त्रीमुक्तीआंदोलनाबाबत आढळणारा कटाक्ष तिरका आणि सूर हेटाळणीचाच आढळतो. स्त्रीला माणूस म्हणून अस्तित्व मिळण्यासाठी, आपल्या कर्तृत्वावर पुढे जाण्याची संधी मिळण्यासाठी व पुरुषाच्या बरोबरीने समाजात स्थान व वावरण्याची संधी मिळण्यासाठी आज स्त्री-मुक्ती आंदोलनांची गरज आहे व त्यासाठी सामाजिक संस्था व सेवाभावी व्यक्ती प्रयत्नशील आहेत अशा व्यक्तींच्या व संस्थांच्या सन्मानार्थ सरदार किराड प्रतिष्ठानतर्फे स्त्री मुक्ती पुरस्कार यंदाच्या वर्षापासून आयोजित करण्यात आला आहे.सध्याचा स्त्रीमुक्तीबाबत हेटाळणीचा सूर व उदासीन प्रतिक्रिया याच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या स्त्री-मुक्ती पुरस्कारांनी आंदोलनाची प्रतिमा जनमानसात निश्चितच उंचावेल व आंदोलनाच्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना प्रेरकच ठरेल.

या वर्षीच्या १९८३ च्या पुरस्कारासाठी खा. प्रमिला दंडवते यांची निवड करण्यात आली. बलात्कारविरोधी व हुंडाबंदी कायद्यात सुधारणा करण्यासाठी, कुटुंबन्यायालयांसाठी, स्त्रीची ग्राहक म्हणून होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी खा. प्रमिला दंडवते यांनी आपल्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातून नेहमीच प्रयत्न केले आहेत. त्यामुळे त्यांची निवड योग्यच आहे.

पुरस्कार–प्रदानाचा कार्यक्रम–दि. १६ रोजी टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे, ज्येष्ठ नेते एस. एम. जोशी यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध विचारवंत गं. बा. सरदार होते.

पुरस्कार–प्रदानप्रसंगी बोलताना एस. एम. जोशी यांनी 'पुरस्कारासाठी योग्य व्यक्तीचीच निवड झाली आहे' अशा शब्दांनी खा. प्रमिला दंडवतेंचा गौरव केला. प्रमिला दंडवते यांच्या कामावरील निष्ठेचे, त्यांच्या जिद्दीचे व चिकाटीचे त्यांनी कौतुक केले व अशी निष्ठा फारच थोड्या स्त्रियांच्यात आढळते असेही त्यांनी सांगितले.

यानंतर पुरस्काराच्या मानकरी खा. प्रमिला दंडवते यांनी स्त्री मुक्ती आंदोलनातील वेगवेगळ्या प्रश्नांना स्पर्श करून आपली भूमिका मांडली. त्या म्हणाल्या, '१९७५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'कमिटी ऑन स्टेटस ऑफ वुमेन'च्या अहवालाने स्त्रियांच्या परिस्थितीचे विदारक चित्रण आकडवारीसह डोळ्यांसमोर आले व त्यामुळे आंदोलनाला जोर आला. या अहवालात नमूद केल्याप्रमाणे स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण पुरुषांच्या मृत्यूपेक्षा जास्त आहे. हाच प्रकार बालमृत्यूत आढळतो. त्यामुळे स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येपेक्षा कमी आहे, याचे कारण अर्थातच आपल्या मनात रुजलेल्या विषमतेच्या बीजात आहे चांगला आहार, शिक्षण या अजूनही पुरुषाच्या गरजा मानल्या जातात. शहरी मध्यमवर्गीय स्त्री याबाबतीत ग्रामीण स्त्रीपेक्षा सुखी आहे तिला शिक्षणामुळे उपलब्ध झालेली विविध क्षेत्र ग्रामीण स्त्रीला उपलब्ध नाहीत.

खा. प्रमिला दंडवते

वेगवेगळ्या व्यवसायांतील स्त्रियांबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, 'स्त्रियांचे व्यवसायातील प्रमाण घटत आहे. कारण स्त्रियांसाठी केलेले मजूरविषयक कायदे. आणि मजूरसंख्या कमी करण्याच्या वेळी प्रथम हकालपट्टी होते ती स्त्रियांची. देशातील ९ कोटी स्त्री कामगारांपैकी ९४% असंघटित स्त्री कामगार आहेत.'

आजच्या हुंडाप्रथेबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, आजच्या भ्रष्टाचाराचे मूळ हुंडाप्रथेत आहे. बलात्कार व हुंडा याबाबतीत कायद्यात ज्याप्रमाणे त्रुटी आहेत, त्याप्रमाणेच स्त्रीकडे बघण्याचा पुरुषाचा व स्वतः स्त्रीचा दृष्टिकोनही याला कारणीभूत आहे. 'स्त्री ही पुरुषाची मालमत्ता बनली आहे ब्रिटिश राजवटीच्या आगमनानंतर काही काळाने समाजसुधारकांनी बालविवाह व केशवपन यासारख्या प्रथांविरुद्ध आवाज उठवला; पण याच पुरोगाम्यांची हिंदू कोड बिलामुळे खळबळ उडाली. या बिलामुळे स्त्री खरोखरच स्वतंत्र होईल असे त्यांना वाटले.

याचा स्त्रियांनी विचार केला पाहिजे व पुरुषप्रधान संस्कृतीतले साहित्य, कला इ. हो पारखून घेतले पाहिजे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धरी' अशा गोड वचनांना न भुलता 'दोरी दोघांमुळे आली आहे ती दोघेही सांभाळू' अशी ठणकावण्याची वेळ आज आली आहे.

आपल्या भाषणात त्यांनी योनिशुचितेबद्दलच्या गैरसमजुती, सेक्स डिटरमिनेशन टेस्टचा गैरवापर स्त्रीच्या सुरक्षिततेची गरज इत्यादी बरही भाष्य केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना गं. बा. सरदार म्हणाले, 'काही वेगळी जाणीव व ध्येय असणाऱ्या मुलीही पुढे संसारात गुरफटून पारंपारिक मार्ग स्वीकारतात; पण प्रमिला दंडवतेसारखी एखादुसरीच वेगळा मार्ग स्वीकारते आजच्या १० वर्षांच्या काळात स्त्रीमुक्तीची दिशा बदलली आहे. नेतृत्व स्त्रियांच्याच हातात आहे. पुरुषांनी उपकृत करून स्वातंत्र्य देण्याची भावना यात नाही.

'आज स्त्रीला विकासाची संधी हवा आहे, माणूस म्हणून प्रतिष्ठा हवी आहे. त्यासाठी जनआंदोलनाचा वाढता जोर हवा; पण संस्कृतीच्या ठेकेदारांचे महत्त्व वाढतंय आणि पांढरपेशा समाज च प्रतिगामी बनत चाललाय'

कार्यक्रमात बोलताना स्व. प्रमिला दंडवते म्हणाल्या, 'या पुरस्काराने स्त्रीमुक्तीला सामाजिक मान्यता मिळाल्याचेच जाणवते.' त्यांचो ही प्रतिक्रियाच पुरस्काराबाबत पुरेशी बोलकी आहे.

—विद्या कुलकर्णी

यंदाचा गणेशोत्सव

पुण्याचा गणेशोत्सव हे पुण्याच्या सांस्कृतिक सुबत्तेचं लक्षण मानलं जातं. महाराष्ट्रभरातून हा गणेशोत्सवाचा अनुभव घेण्यासाठी लोक पुण्यात येतात. अनंत–चतुर्दशीच्या दिवशी निघणारी विसर्जनाची मिरवणूक पाहण्यासाठी झालेली गर्दी डोळ्याचं पारणं फेडणारी असते. लोकमान्यांनी सुरू केलेला हा उत्सव कोणत्या का स्वरूपात होईना अजून जोमाने टिकून आहे हेच या उत्सवाचं वेगळेपण.

पूर्वी गणेशोत्सवात होणाऱ्या कार्यक्रमात बिनीचे कलावंत भाग घेत. बालगंधर्व, सवाई गंधर्व, भीमसेन जोशी यांच्यासारख्यांनी पुणेकरांना आपली कला भरभरून दिली ती गणेशोत्सवामुळेच. एकाच वेळी अनेक कलावंतांचे कार्यक्रम सादर करण्याची त्या वेळी चढाओढच होती. दर्जेदार कार्यक्रम हे एके काळी पुण्याच्या गणेशोत्सवाच खास वैशिष्ट्य आता हरवून गेलं आहे. नाही म्हणायला गायकवाडवाडा, सदाशिवपेठ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यासारखी हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढी मंडळी गणेशोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतात. त्यामध्येही आवर्जून उपस्थित राहावं असं कार्यक्रम दुर्मिळच. पुण्याच्या औद्योगीकरणाचा परिणाम गणेशोत्सवावर अशा पद्धतीने झाला. गणपतीच्या दिवसापुरते ते मंडळ, त्यातील कार्यकर्ते उभे राहातात. त्यानंतर वर्षभर ते पुन्हा भेटत असतील की नाही शंकाच आहे. सार्वजनिक कामांचा श्रीगणेशा या उत्सवातून केलेली अनेक मंडळी आज सामाजिक राजकीय क्षेत्रात उभी आहेत. नव्या पिढीत हा 'श्रीगणेशा' अजून तरी झालेला दिसत नाही.

या निमित्तानं लोकांना एकत्र येण्याची संधी निर्माण करणं हा यां उत्सवामागील हेतू स्वातंत्र्योत्तर काळात लोप पावू लागला. एकत्र येण्याचं कारणच नष्ट झालं हे एक आणि दुसरं अन्य कारणांमुळे व साठी एकत्र येणं शक्य होऊ लागलं हे दुसरं.

ही सगळी टीका मान्य करूनही पुण्याच्या गणेशोत्सवानं आपलं वेगळं अस्तित्व राखलं आहे. पुण्याबाहेरील शहरांमधून, वा गावांतून गणेशोत्सव साजरा होतो; पण पुण्याचा थाट वेगळा असतो हे बाहेरगावच्या लोकांचं मत लक्षात घ्यायलाच हवं! हे सगळं अस्तित्व कोणतं? पुण्याच्या उत्सवातील भव्यता आणि पसारा हे वैशिष्ट्यच अस्तित्व टिकवून आहे.

पुण्यात सुमारे सातशे गणेशोत्सव मंडळांनी यंदा सार्वजनिकरीत्या गणपतीची प्रतिष्ठापना केली आहे. गेल्या काही वर्षांत हे प्रमाण वाढतंच आहे, अगदी गल्लीबोळात, दुसऱ्या मजल्यावर, न दिसेल अशा ठिकाणीही सार्वजनिक मंडळं तयार झाली. दहा दिवस गणपती बसविणे याव्यतिरिक्त अन्य 'दृश्य' हेतू तिथं दिसत नाहीत. गणपती बसवायचा हे ठरल्यापासून तो बसेपर्यंत या मंडळातील लहानमोठे कार्यकर्ते आपली नोकरी–धंदा सांभाळून वेगवेगळ्या कामात गर्क असतात. आपला गणपती खास वैशिष्ट्यांसह दिसावा या हेतूपेक्षा 'रूटिन'पेक्षा वेगळं काम, वेगळी माणसं याचंच अप्रूप त्यात जास्त असतं. त्यामुळे 'स्टॅण्डर्ड' पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळींची संख्या निम्म्याहून अधिक!

हा उत्साह अमाप असला तरी पुण्यातील सार्वजनिक गणपती अगदी गणेशचतुर्थीपासून कधीच पाहता येत नाहीत. दहा दिवसांचा उत्सव असला तरी ह्यातले पहिले तीन-चार दिवस आरास पूर्ण करण्यातच जातात आणि मग पाचव्या-सहाव्या दिवसानंतर पुणेकर 'गणपती पाहणे' नामक प्रकाराला सुरुवात करतात. पूर्वी 'गणपती पाहणे' असा काही प्रकार अस्तित्वात नसावा, म्हणजे आरास, देखावा यापेक्षाही त्या उत्सवाचं सांस्कृतिक मूल्य त्या वेळी वेगळं होतं. आता मूल्ये बदलली, गणपती पाहण्याची नवी परंपरा सुरू झाली. अगदी गल्ली-बोळात घुसून 'चांगले चांगले' (?) गणपती पाहणे हा आता नित्याचा कार्यक्रम बनला आहे. दहा दिवसांतल्या एखाद्या 'सुटेबल' दिवशी

'सहकुटुंब सहपरिवार गणपती पाहण्याचा' कार्यक्रम होतो. त्यामध्ये गणपती पाहण्याएवढाच 'खाण्या' वरही भर. या दिवसांत रस्त्यावरील खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सची संख्याही वाढलेली असते.

यंदाच्या वर्षी पुण्याच्या गणेशोत्सवाचं जाणवलेलं वैशिष्ट्य म्हणजे 'लायटिंग'पेक्षा काही तरी वेगळं, भव्य करण्याचा मंडळींचा उत्साह. गेली काही वर्षं 'लायटिंग' हा गणेशोत्सवाचा अपरिहार्य भाग झाला होता. लायटिंग म्हणजे चार रेकॉर्डी आणून त्याच्या तालावर विविध रंगी दिव्यांना खेळवण्याची नेत्रदीपक किमया. लायटिंगचे गणपती बसवणे ही मंडळींच्या दृष्टीने सोपी गोष्ट. लायटिंग करणाऱ्याला उक्तं कंत्राट दिलं की मंडळाचे कार्यकर्ते मोकळे. पाहणारेही लोक मोठे हौशी असतात. अनेक ठिकाणी लायटिंग असलं– सर्वत्र तंत्र एकच असलं तरी त्यांच्या त्यांच्यात स्पर्धा लावून तासन् तास लायटिंगचे गणपती पाहणारे हौशी अजूनही आहेतच. यंदा मात्र लायटिंगचं उक्तं कंत्राट न देता काही नवी कल्पना राबवण्याची, नवं काही तरी करण्याची जिद्द दिसून आली. ही गोष्ट निश्चितच स्वागतार्ह म्हटली पाहिजे.

अखिल मंडई मंडळानं तीन-चार लाख रुपये खर्चून तयार केलेला 'स्वप्नदृश्याचा देखावा' प्रेक्षणीय होता. त्यामध्ये मंडळाचे अनेक कार्यकर्ते आपापल्या परीनं सहभागी झाले. दगडूशेठ हलवाई गणेशोत्सव मंडळाने गेल्या वर्षीचंच सामान वापरून पण दीड-दोन लाख रु. खर्चून उभारलेलं भव्य मंदिरही नेत्रदीपक होतं. या दोनही गणपतींमधील चुरस हा पुणेकरांमधील चर्चेचा विषय असतो. आणीबाणी व नंतरच्या काळात मंडईतील कार्यकर्त्यांचा उत्साह टिकला; पण मंडई हलवून गुलटेकडीला गेली अन् या मंडळाचं पाठबळच संपुष्टात आलं. इतकी वर्षे या मंडळाला वर्गणीसाठी हिंडावं लागलं नव्हतं. आता वर्गणीसाठी कार्यकर्ते पावती-पुस्तकं घेऊन फिरले; पण तरीही दोन महिने खपून गणेशचतुर्थीला देखावा पूर्ण करणारं हे एकमेवच मंडळ असेल! दगडूशेठचा गणपती 'श्रीमंत' समजला जातो. या मांडवातील नारळांचा ढीग पाहिला म्हणजेही हे लक्षात येतं. नुसत्या नारळांचीच संख्या ८० हजार. देवाला दरवर्षी मिळणारे सोन्या-चांदीचे दागिनेही काही लाख रु.च्या किमतीचे. (त्याच धातूपासून या गणपतीची प्रतिमा यंदा भाविकांसाठी तयार केली गेली, या गणपतीची मूर्तीही देखणी आणि श्रीमंती. असे हे दोनही वैभवसंपन्न, परंपरा असलेले गणपती. पुण्याच्या गणेशोत्सवात मानाचं स्थान लाभलेले दगडूशेठला मुख्यमंत्री आल्यावर त्यांना मंडईत जाणंही भाग पडलं ते याचमुळे.

या दोन गणपतींप्रमाणे सुवर्णरौप्यमहोत्सव करणारी मंडळेही खूप; पण त्यांचे वैशिष्ट्य आता राहिलेले नाही. दरवर्षी नित्य नेमाने गणपती बसवायचा एवढंच; पण कुणी बावीस फूट उंचीची भगवान बाहुबलीची मूर्ती उभी केली तर कुणी कन्याकुमारीचे विवेकानंद शीला स्मारक उभं केलं, प्रुडेन्शिअल कपचा विजय हा जसा अनेक ठिकाणी दिसला. तसेच पौराणिक प्रसंगही अनेकांनी उभे केले. एकूणातच 'लायटिंग'चं वेड यंदा कमी झालेलं दिसलं!

सुमारे सातशे मंडळांपैकी निम्म्या मंडळांनी मांडव-उभारणीसाठी महापालिकेकडून परवानगी घेतलेली नव्हती, अशी तक्रार मनपाच्या अधिकाऱ्यांनी केली. हे दरवर्षीच घडतं असंही त्यांनी सांगितले. बेकायदा मांडव पाडून टाकता येत नाही आणि मांडवासाठी द्यावी लागणारी फी वसूल करता येत नाही अशी त्यांची अडचण. गणपतीसारख्या विद्येच्या दैवताची प्रतिष्ठापना 'बेकायदा' मांडवात करणाऱ्या गणेशोत्सवमंडळांनी याचा गांभीर्याने विचार करायला नको का?

पुण्याच्या गणेशोत्सवातील एकूण उलाढाल काही कोटी रुपयांमध्ये होते. एवढा वैभवी उत्सव इतरत्रही क्वचितच होत असेल! पण या उत्सवातलं उत्सवी स्वरूप गणपती पाहणे आणि मिरवणुकीत वेडवाकडं नाचणं यापलीकडे गेलेलं नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात माणसाची शक्ती एकवटली जाते, पण तिला पुढे वळणच मिळत नाही. या उत्सवामुळे हे साधलं तर...

यंदा पावसामुळे गणेशोत्सवाच्या उत्साहावर काहीसं पाणी पडलं. तरीही उत्साही पुणेकर रात्रभर गणपती पहातच राहिले. अशा प्रकारच्या उत्साहात पुणेकरांचा हात कुणी धरू शकणार नाही. विसर्जन-मिरवणुकीच्या मार्गावर अगदी सकाळपासून सतरंज्या टाकून म्हातारे-कोतारे, लहान, तरुण दिवसभर ठाण मांडून बसतात, दिसेल तिथं पाय रोवून तासन्तास उभे रहातात, हा उत्साह फक्त पुणेकरांमध्येच! हा उत्साह या उत्सवाचं अस्तित्व टिकवून धरायला निश्चितच पुरेसा आहे. पुण्याची सांस्कृतिक सुबत्ता म्हणजेच हा उत्साह. सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातली गंगोत्री समजल्या जाणाऱ्या पुण्यातील या उत्सवातून स्वातंत्र्योत्तर काळात आणखी काही भरीव घडणे शक्य आहे, एवढंच यंदाच्या उत्सवदर्शनातून दिसून आलं.

–प्रतिनिधी

मुक्ताफळे

निदान एवढे करा

खासदार प्रमिला दंडवते यांनी स्त्रीमुक्तीसाठी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी सरदार किराड प्रतिष्ठानातर्फे त्यांना खास पुरस्कार प्रदान करण्याचा सोहळा पुण्यात १६ सप्टेंबरला पार पडला. अपेक्षेप्रमाणे 'स्त्रीमुक्ती' या विषयाची सांगोपांग चर्चा करणारी भाषणे खासदार दंडवतेबाई, एस. एम., गं. बा. सरदार, श्री. ग. मुणगेकर, भाई वैद्य या सर्वांनी केली. श्रीमती प्रमिलाबाई म्हणाल्या–

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धरी' असे सांगून स्त्रीला मूलबाळ व संसारामध्ये जखडून टाकले गेले आहे; पण स्त्रियांनी त्यांच्या नवरेमंडळींना सांगितले पाहिजे की, आपल्या दोघांमुळे ही दोरी निर्माण झाली आहे. तेव्हा दोघे मिळूनच ती ओढू या! पुरुषाशिवाय स्त्रीला गती नसेल, तर स्त्रीशिवाय पुरुषाची मती राहू शकणार नाही!'

समस्त पुरुषांनी, विशेषत: सरकारी–निमसरकारी खात्यात काम करणाऱ्या पुरुषांनी प्रमिलाबाईंच्या या सूचनेचे स्वागतच केले पाहिजे. बायका– 'आपण दोघे मिळून ही दोरी ओढू या' असं म्हणण्याची वाट न पहाता, आम्हाला दोरी ओढायचीच आहे,

यासाठी स्त्री–कर्मचाऱ्यांना जशी तीन महिने भरपगारी बाळंतपणाची रजा मिळते तशी रजा आम्हालाही मिळावी अशी चळवळ ताबडतोब त्यांनी सुरू करावी. बायको बाळंत झाल्याचा दाखला व सोबत दोरी जोडताच, कोणत्याही सरकारी–निमसरकारी कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना तीन महिने भरपगारी रजा मिळायलाच हवी. यासाठी त्वरित आंदोलनाची गरज आहे.

आता आईबाप दोघे दोर ओढू लागले तर त्या हिसक्यांनी बाळाला झोप येण्याऐवजी त्रास अधिक होईल आणि 'बाळाला दोरांचा त्रास होतो' यासाठी कोणी सुप्रीम कोर्टापर्यंत गेल्यास– 'पाळणा हलवण्यासाठी दोहोंचा उपयोग अमानुष आहे' या कारणास्तव त्याला स्थगिती मिळण्याचा धोकाही संभवतो; परंतु हा धोका पत्करलाच पाहिजे! या योजनेने पहिलेच अपत्य झालेल्या नवऱ्यालाही खूप दिलासा मिळेल. पहिल्या अपत्यप्राप्तीनंतर होणारा तीन महिन्यांचा विरह त्यांना जाणवणार नाही. रोज दोरी ओढण्याच्या निमित्ताने बायको जवळच असेल. तेव्हा सर्व साधकबाधक विचार करून प्रमिलाताईंनीच पुरुषांना 'दोरी ओढण्याची तीन महिने रजा' मंजूर करणारे विधेयक संसदेत आणावे. त्यांचा मुद्दा बरोबर आहे. पुरुषाशिवाय पाळण्याला गती नसेल तर पाळणा बंदच ठेवलेला बरा!

प्रा. गं. बा. सरदार यांची चिंता वेगळीच होती. ते म्हणाले– 'स्त्री–पुरुष दर्जाबाबतच दुहेरी मूल्यव्यवस्था टिकवून धरण्यासाठी काहींजणाचे हितसंबंध गुंतलेले आहेत. अशा प्रकारची साहित्यातील सुभाषिते या प्रवृत्तीची निदर्शक आहेत.'

कोणाचे बरे हितसंबंध गुंतलेले आहेत? हे काहीजण कोण असावेत? एवढी सर्व समाजवादी मंडळी एकत्र आलेली असूनही यामागे रा. स्व. संघाचा हात असल्याचे कोणाच्याच कसे ध्यानात आले नाही? आम्हाला तो हात स्पष्ट दिसतो आहे. दुहेरी मूल्यव्यवस्था म्हणून संघटनेत स्त्रियांना मज्जाव! स्त्रीशिवाय पुरुषाची 'मती' कशी काय राहू शकते? आता सुभाषिते विपुल आहेत. इंग्रजी ही जवळजवळ भारताची राष्ट्रभाषा असल्याने, इंग्रजी सुभाषितांचा परिणाम अखिल भारतीय होतो. आम्ही काही निवडक सुभषितेच देतो–

'Crying is the refuge of plain women, but the ruin of pretty ones.'

'Women know life too late. That is the difference between men & women.'

'Women defend themselves by attacking.'

'Women love us for our defects. If we have enough of them, they will forgive us everything.'

'Every women is a rebel & usually in wild revolt against herself.'

स्त्रियांना आयुष्य उशीरा कळते, हल्ला चढवून स्त्रिया आपला बचाव करू पहातात, प्रत्येक स्त्री बंडखोर असते; पण तिचे बंड स्वत:विषयक असते–स्त्रियांची अशी बदनामी करणाऱ्या वाक्यांना सुभाषिते कोण म्हणेल? पण ऑस्कर वाइल्ड या लेखकाच्या नाटकातली ही वाक्ये रंगभूमीवर जेव्हा फेकली गेली तेव्हा श्रोत्यातील स्त्रियाही खिदळत-हसत होत्या म्हणे! या नाटकाची मराठी रूपांतरे झाली आहेत. काही मान्यवरांनी अशी ही सुभाषिते पळवून आपल्या नाटकात घातली आहेत–कारण ती विपुल आहेत. या सर्व सुभाषितांचे संशोधन करून यातली कोठली स्वीकारार्ह आहेत याची शहानिशा विद्वानांनी करायचे ठरवले तर ते एक मोठेच कार्य होईल.

स्त्री–मुक्तीसंबंधात ताबडतोब करण्यासारखे निदान एवढे तरी आहे.

–ग्यानबा

इथून तिथून

कोरियन विमान आणि रशिया

सुमारे तीन, आठवड्यांपूर्वी साखालिन बेटानजीकच्या समुद्रात रशियनांकडून पाडले गेलेले दक्षिण कोरियाचे विमान आणि त्यातले प्रवासी यांचा शोध जारी असून ताज्या माहितीनुसार त्या विमानातल्या सुमारे दोनशे वस्तू सापडल्या आहेत. आतापर्यंत तीन मृतदेह सापडले आहेत. त्यातला एक स्त्रीचा, दुसरा ९ ते ११ या वयोगटातील बालकाचा (लिंग समजू शकले नाही) तसेच धड आणि पाय नसलेला असा आणखी एक मृतदेह (याचेही लिंग समजू शकले नाही) असे तीन आहेत. कोरियातल्या दुर्दैवी विमानातलेच हे तीन असावेत असा अंदाज शोध घेणाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. विमानाचे अवशेष शोधण्याचे काम अद्यापही सुरूच आहे.

दरम्यान 'संडे टाइम्स' मधल्या वृत्तानुसार रशियन लढाऊ विमानाच्या पायलटला कोरियन विमान पाडण्यापूर्वी त्याने केलेल्या संपर्काला प्रतिसाद मिळू शकला नाही. तसेच गेल्याच आठवड्यात त्या वैमानिकाला जे आदेश देण्यात आले होते; त्यात 'लक्ष्यावर दृष्टी ठेव', आणि 'मारा करा' असे जे शब्द होते, ते यासंबंधी उपलब्ध झालेल्या टेपवर सापडत नाहीत.

टाइम्सने पुढे असेही म्हटले आहे की: कोरियन विमान रशियाकडून केवळ अपघाताने पाडले गेले आहे असे दिसत नाही, अशी चर्चा लष्करी, राजकीय आणि नागरी हवाई वाहतूकसंबंधी वर्तुळात चालू आहे. कोरियन विमानाच्या वैमानिकाने नेहमीचा हवाईमार्ग सोडून तिथपासून आतमध्ये ३९० मैल आत जाण्याचे धैर्य दाखवण्याची जोखीम हेतुत: पत्करली असावी असेही मत व्यक्त केले जात आहे.

इंग्लंडमधल्याच 'ऑब्झर्व्हर' या वृत्तपत्राने म्हटले आहे की, या घटनेबाबतचे सत्य, अमेरिकन लोकांपासून वॉशिंग्टनचे सरकार या बाबत जो प्रचार करीत आहे, त्यामुळे खूप दूर गेले आहे.

या विमानातल्या २६९ प्रवाशांच्या जीवितहानीची नुकसानभरपाई मागण्याचेही दक्षिण कोरियन सरकारने ठरवले आहे. द. कोरिया आणि रशियात राजनैतिक संबंध नसल्यामुळे नुकसानभरपाईचा प्रस्ताव अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्रालयातर्फे रशियापुढे मांडण्यात येणार आहे. नुकसानभरपाईची ही रक्कम किती मागण्यात येईल यासंबंधी अजून ठरलेले नाही.

रशियाच्या या कृत्याचा तीव्र निषेध जपानच्या संसदेने एकमताने ठराव संमत करून केला आहे. रशियाने पाडलेले विमान गुप्तचर टेहळणी विमान होते, हे पुराव्यानिशी रशियाने सिद्ध करून द्यावे असेही जपानने म्हटले आहे. आपला दावा सिद्ध करण्यात रशिया अपयशी ठरला तर जपान सरकार मॉस्को ते जपान या हवाईमार्गावरची व्यावसायिक वाहतूक बंद करील असे जपानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटले आहे. □



हे भगवान, तू ही सहारा है।

फिरोझ रानडे

जसजसे माणसाचे वय होत जाते तसतसे त्याला काही सवयी लागतात, त्याच्या अशा काही लकबी तयार होतात. थोडे व्यसनासारखेच असते म्हणानात. कोणाला चहाचे, कोणाला सिगरेटचे तर कोणाला तपकिरीचे.

अशीच काही लोकांना सवय लागते की मधून-मधून काही तरी देवाचे नाव घ्यावयाचे कोणी प्रभो, प्रभो म्हणतात कोणी श्रीहरी, श्रीहरी म्हणतात.

श्यामच्या एका काकांना अशीच सवय होती. जाता-येता, उठता-बसता ते श्रीगुरू देव दत्त' असा पुकारा करत. आता श्यामच्या काकांनी दत्ताला गुरू करण्याला वा वेळोवेळी त्याच्या नावाने पुकारा करण्याला काही विरोध नव्हता. पण काकांची अपेक्षा अशी असे की त्यांनी श्रीगुरुदेव म्हटले की बाकीच्यांनी 'दत्त' म्हणून त्याला प्रतिसाद द्यावा. व येथेच श्यामला त्याचा जाच व्हावयाचा.

श्यामचे काका फक्त येता-जाता, उठता-बसताच श्रीगुरुदेवाचा पुकारा करत असत असे नव्हे तर अगदी अहो, ऐकता पिता पण करत असत. सगळेजण चांगले जेवायला बसले आहेत. श्यामने लाडवाचा वा जिलबीचा बोकणा भरला आहे. अशा स्थितीत काका नेमके 'श्रीगुरुदेव' म्हणून हाकारा देत. आता जिलबी वा लाडूचा तोबरा भरला असता 'दत्त' म्हणणे श्यामला कसे शक्य होते ? मग त्याला लाडवा-जिलबीबरोबर काका-काकूची व आईची बोलणी पण खावी लागत.

त्या 'दत्त'चा बाल मनावर परिणाम झाला होता म्हणून म्हणा श्यामला चांगले मोठे होईपर्यंत कोणत्याही देवाचे वेळोवेळी नाव घेण्याची सवय लागली नव्हती. व ज्या वेळी लागली ती उत्तरभारतात रहात असल्यामुळे हिंदी भाषेत 'हे भगवान तूही सहारा है।' म्हणण्याची लागली.

सरकारी नोकरीत तर पदोपदी, कागदोकागदी व खातो खाती देवाच्या नावाचे स्मरण व्हावे अशी स्थिती होत चालली होती. देवावर विश्वास असो नसो त्याचे नाव घेतले की बरे वाटते. इंग्रजीत ज्याला Relax म्हणतात तसे वाटते असा श्यामला अनुभव येत चालला. पुढे पुढे ही सवय अगदी अंगवळणी पडली.

एक दोन वेळा श्यामला ह्या सवयीचा त्रास पण झाला होता.

राधाबरोबर काही खरेदी चालली होती. बहुधा साडयांची असावी. चार-पाच दुकाने पालथी घालून झाली होती. सहाव्या दुकानात राधाला 'साधारण आवडली' ह्या कॅटेगरीतली साडी गावली ते बघताच श्यामने चक्क मोठ्याने 'हे भगवान तूही सहारा है।' म्हटले. ते ऐकताच दुकानदार मंडळींनी श्यामकडे मोठ्या सहानुभूतीने पाहिले तर राधाने ज्याला 'जळजळीत नजर' म्हणता येईल त्या नजरेने पाहिले !

मस्कतला श्याम असतानाची गोष्ट, मोठा थकून तो टॅक्सीत बसला व बसता बसता 'हे भगवान' म्हणाला. झाले, टॅक्सीवाल्याच्या तळपायाची आग मस्तकी गेली. हिंदी सिनेमामुळे त्या लोकांना हिंदू लोक अल्लाला भगवान म्हणतात वगैरे माहीत झाले होते. त्यामुळे त्याने श्याम हिंदू आहे हे ओळखून त्याच्याशी उगाचच बखेडा माजवला होता. आता असा अनुभव सगळ्याच मुसलमानांबाबत येत असे असे नाही. श्यामने कचेरीत-मस्कतच्याच-'हे भगवान' म्हटले ही काही पाकिस्तानी सहकारी 'तूही सहारा है।' म्हणून प्रतिसाद देत.

शारीरिक दमवणुकीनंतर 'हे भगवान' म्हटले म्हणजे बरे वाटते हे जसे श्यामच्या लक्षात आले होते तसेच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व वाङमयीन थकावटीनंतर पण हे 'हे भगवान तू ही सहारा है' हे औषध उपयोगी पडते हे त्याच्या लक्षात येऊ लागले होते.

बाळ गंगाधरांनी मोठ्या चांगल्या भावनेने व राष्ट्र-प्रेमाने काढलेल्या गणपती उत्सवात आजकालचे वेग वेगळे डिस्कोडान्सर पाहिले की श्याम हताशपणे 'हे भगवान तूही सहारा है।'म्हणत असे. पण मग त्याचा त्यालाच प्रश्न पडत असे की, खरच ह्या लोकांनी उत्साहात करावयाचे तरी काय ? ते लोक काही गणपती-बाप्पाचा अपमान करण्याच्या हेतूने नाचत नाहीत. आपल्या समाजात सर्वांनी मिळून नाच करावेत असे नाच आहेत तरी कुठे ? मग नाचेनात का ते त्यांना वाटते तसे !

श्यामच्या तोंडून असेच 'हे भगवान...' अजाणता निघत असे ते म्हणजे दूदवरचे काही कार्यक्रम बघत असता. सध्या-सध्या 'संसार हा सुखाचा' कार्यक्रम बघत असताना. हा संसारही नाही व सुखाचाही नाही त्यात काम करणाऱ्यांना पण नाही व बघणाऱ्यांना तर बिलकुल नाही.

गणपतीसमोर वेडे-बाकडे नाचणारे एकतर तरुण तरी असतात नाही तर अडाणी तरी असतात पण दूदवरचे लोक तर चांगले अनुभवी व सुशिक्षित आहेत ना ? हा प्रश्न त्याच्या 'हे भगवान तू ही सहारा है' मध्ये सामावला असे.

असेच 'हे भगवान' श्यामच्या तोंडून निघत असे महाराष्ट्राच्या काय किंवा इतर प्रांताच्या मुख्यमंत्रीपदी नेमणूक करण्याबाबत कारवाया सुरू झाल्या म्हणजे. महाराष्ट्रासारख्या प्रांताचा एक विदुषकी वृत्तीचा

माणूस मुमं होतो व तो वर्षभर रहातो ह्याने श्यामचे मन विषण्ण होत असे. सर्व तऱ्हेची अवहेलना होऊन व ज्यात कोणत्याही तऱ्हेचा मान राहिला नाही आहे त्या मुमं पदाकरता होणारी राजकारणे पाहिली म्हणजे वाचली की श्यामच्या तोंडून अगदी सहजपणे 'हे भगवान तूही सहारा है' निघत असे.

आता ह्याचा अर्थ भगवान खरंच आपल्याला काही सहारा देणार आहे असा श्यामचा विश्वास बळावत चालला होता असा बिलकुल नाही. उलट आपल्या लोकांचा भगवान कधीही चांगल्यांचा सहारा होत नाही व होणार नाही ह्याबद्दल त्याची खात्री होती.

पंढरपूरच्या पंढरीनाथाने विठूमहार होऊन यावनी बादशहापुढे खळखळा सोन्याच्या मोहरा टाकल्या. पण उत्तरेकडे यावनी सत्तेविरुद्ध युद्ध करणाऱ्या व नेहमी पैशांच्या विवचनेत असणाऱ्या पहिल्या बाजीरावाच्या झोळीत काही चांदीचे रुपये सुद्धा त्याने टाकले नाहीत.

कोणा दुसऱ्या संताकरता त्या विजापुराच्या बादशहाला दर्शन दिले म्हणा ! म्हणजे वघा इकडे वर्षानुवर्ष जप-तप करणाऱ्यांना मात्र दर्शनाची वानवा आणि परधर्माच्या बादशहाला मात्र दर्शन. आता परधर्मियाला आपल्या भगवानाने दर्शन देऊ नये अशा शिळ्या विचाराचा श्याम नव्हता. पण ह्या सगळ्या गोष्टींमागे जी काही लाचार मनोवृत्ती आहे त्याचा श्यामला राग येत असे कधी दुःख होत असे.

पण परवा अशी काही बातमी आली व भगवान आपणा सर्वांना खरच सहारा होणार आहे असा विश्वास आमच्या मनात उत्पन्न झाला. सगळ्या भारतात सध्या जे काही लाचारीचे काळेकुट्ट ढग पसरले आहेत त्यात हा मोठ्या आशेचा किरणच मानायला लागेल !

मोठेमोठे आचार्य–प्राचार्य, स्वातंत्र्ययोद्धे, सहकारी चळवळीचे प्रणेते, बुद्धिवादी, पूंजीपती सगळ्यात आज एकच गुण बोकाळला आहे, तो म्हणजे लाचारी! मात्र जर आमच्या नेत्याने सांगितले तर मी झाडूसुद्धा मारीन हे अभिमानाने सांगणारे लोक सगळ्यात उच्चपदी आहेत ! 'मात्र आमच्या नेत्यांनी सांगितले तर मी माझ्या कामाची पद्धत बदलेन, स्वभाव बदलेन' सांगणारे मुख्यमंत्री आहेत. नशीब की माझे मी आणखीही 'काही' बदलेन असे हे लोक म्हणत नाहीत; पण जवळजवळ तशीच स्थिती आली आहे. ह्या लोकांनी आपले आणखीही 'काही' बदलले आहे असा संशय वा अगदी खात्री वाटण्याइतपत स्थिती झाली आहे !

ह्या नेत्यांच्या शब्दकोशात 'नाही' हा शब्दच राहिला नाही. त्या नेत्याला कोणी ठामपणे 'हे करता येणार नाही' असे सांगणारा राहिला नाही आणि आता सांगितले गेले ते भगवानाकडून !

परवा आपल्या पंतप्रधानांना पुरीच्या पुजाऱ्यांनी चक्क 'तुम्ही पारशी आहात म्हणून तुम्हास मंदिर-प्रवेश नाही' असे सांगितले म्हणे !

शामला ह्यामागचे कारण आवडले नव्हते; पण कृती मात्र आवडली होती. सगळ्या जाती–जमातींच्या हिंदू लोकांना तर देवळे उघडी असावीतच; पण दुसऱ्या धर्माच्या लोकांना पण ती उघडी ठेवावीत असे त्याचे मत होते.

आता मशिदींचे, चर्चेसचे वा गुरुद्वाऱ्याचे पहा ना. सर्व धर्मीयांना कशी ती मोकळी असतात; पण देवळांचे उलटेच-कधी स्नान घालणे चालले आहे म्हणून, तर कधी भोग लावणे चालले म्हणून, तर कधी भगवान वामकुक्षी घेत आहेत म्हणून आमची देवळे मात्र दिवसाचे तासन् तास बंद असतात.

आता पंतप्रधानांना देवळात प्रवेश नाही म्हणून सांगितले गेले ते वरील कारणाकरता नव्हे तर त्या पार्शी आहेत म्हणून सांगितले गेले.

आता हेच 'प्रवेश नाही' उत्तर आपल्या टाटांना वा पालखीवाल्यांना वा भाभांना दिले गेले असते तर श्यामला नुसते वाईटच वाटले नसते तर रागही आला असता; पण पंतप्रधानांची गोष्ट वेगळी !

आपल्याकडे जी लाचारी माजली आहे त्याचा पुष्कळसा उगम आपल्या देवळांतून तेथल्या पुजाऱ्यांच्या वृत्तीतून झाला आहे. अगदी शंकराचार्यांपासून सगळे लाचारवृत्तीचे. आता पंतप्रधानांना 'नाही' म्हणून सांगणारे एक देऊळवालेच निघाले ह्याचा श्यामला फार संतोष झाला व तो मोठ्या संतोषाने म्हणाला 'हे भगवान, तूही सहारा है।' □

आसाम गिळंकृत झालेलाच आहे

घुसखोरांचा मोर्चा आता बिहार-बंगाल, कलकत्ता-मुंबईतदेखील !

विनय सहस्रबुद्धे

गेल्या चार-साडेचार वर्षात, विशेषतः जनता पक्षांतर्गत लाथाळघांच्या चविष्ट बातम्या त्या पक्षाच्या सरकाराबरोबरच संपुष्टात आल्यानंतर, देशभरातील वृत्तपत्रांच्या शीर्षवृत्ताची जागा (Headlines) सर्वाधिक काळ व्यापून राहणारा एकच विषय होता आणि तो म्हणजे आसामात सुरू असलेले परकीय नागरिक विरोधी आंदोलन. आकडेवारीचे फार अभ्यासपूर्ण विश्लेषण न करतादेखील या आंदोलनाच्या संदर्भात, बाह्यतः गमतीदार वाटणारे पण खरं तर गांभीर्यानं विचार करावा असे अनेक निष्कर्ष कोणालाही अगदी सहज मांडता येतील. स्थानिक जनतेचा, संपूर्ण शक्ती एकवटून आणि हातचे काहीही न राखता सतत चार वर्षे उत्स्फूर्त सहभाग असलेली अलीकडच्या काळातली ही एकमेव चळवळ ठरेल. घंटानाद, ब्लॅक-आउटपासून जनता कर्फ्यू आणि रास्ता-रोकोपर्यंत आंदोलनाचे शंभराहून अधिक वैविध्यपूर्ण प्रकार हाताळणारी ही एकमेव चळवळ आणि राजकीय पक्ष ज्या चळवळीतून खड्यासारखे बाजूला ठेवण्यात आले आहेत अशीही ही बहुधा एकमेवच चळवळ ठरेल. राष्ट्रीय पातळीवर ज्याची बरीच चर्चा होऊन सुद्धा विचार करणाऱ्या सामान्य नागरिकांतही ज्याबद्दल एक तर अज्ञान अथवा समजुतीचे घातक घोटाळे आहेत अशीही ही बहुधा एकच चळवळ असावी. देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित अशा अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर लढविलेले हे जन-आंदोलन, आंदोलक व सरकार यांच्यातील चर्चेच्या सुमारे ३४ फेऱ्या आणि पोलिसी गोळीबाराच्या अगणित फैरी यापैकी कशाचाही परिणाम न होता सतत पुढे-पुढेच जात राहिले. आज साडेचार वर्षे आंदोलकांचा हा अथक प्रवास सुरू असूनसुद्धा या समस्येची अर्थपूर्ण उकल होण्याची पुसटशी देखील शक्यता दिसू नये हेही या आंदोलनाचे एक दुर्दैवी वैशिष्ट्यच !

सुमारे दोन कोटी लोकसंख्येच्या आसाम प्रांतात आज सुमारे चाळीस लक्षांहून अधिक घुसखोर बांगलादेशातून आल्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत अनेकांचे अनेक हितसंबंध उत्पन्न झाले व आसामच्या राजकीय, सामाजिक जीवनात विचित्र ताणतणावांची गुंतागुंत निर्माण झाली आहे. गोलपारा, बारपेटा इ. सीमावर्ती क्षेत्रातील अनेक जिल्ह्यांत, विशेषतः ग्रामीण भागात, घुसखोर बांगलादेशी मियाँ आणि एतद्देशीय हिंदू-मुसलमान यांच्यात अगोदरच असलेल्या तणावपूर्ण वातावरणात मियाँमंडळींच्या हडेलहप्पीमुळे नित्य भरच पडत आहे. खेड्यापाड्यात जणू काही वादळापूर्वीची शांतता वाटावी असेच अस्वस्थतेने ठासून भरलेले वातावरण आहे.

दमननीती

ऑल आसाम स्टुडंटस युनियन (आसू) आणि गणसंग्राम परिषदेने गेल्या स्वातंत्र्यदिनापासून आंदोलनाची पुनर्घोषणा करून एक प्रकारे या अस्वस्थतेलाच पुन्हा एकदा वाचा फोडली आहे. या घोषणेनंतरच्या आसाम बंदच्या आवाहनांना ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातील काही शहरे वगळता अन्यत्र फारसा प्रतिसाद न मिळाल्याच्या प्रकाशित झालेल्या बातम्या बव्हंशी अतिरंजित स्वरूपाच्या होत्या. सतत साडेचार वर्षे आंदोलनाचा अनुभव घेतलेली असमिया जनता मनाने नाही, पण शरीराने आणि मुख्यतः व्यावहारिक पातळीवर आंदोलनाला काहीशी कंटाळली आहे हे खरं असलं तरी अलीकडच्या 'बंद'च्या आवाहनाला काही ठिकाणी भरघोस प्रतिसाद न मिळण्यामागे पोलिसांची वाढती दमननीती हेच कारण होतं. आंदोलनाशी संबंधित असण्याच्या आरोपावरून शेकडो विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनापूर्वीच गजाआड टाकण्यात आले आहे. विद्यार्थी-नेत्यांवर विविध कोर्टात भरण्यात आलेल्या खटल्यांची तर गणतीच नाही. खटले भरण्याच्या या उत्साहात सैकिया मंत्रिमंडळातील मुनोन शर्मा नावाच्या एका राज्यमंत्र्याच्या नातेवाइकावरही 'गौहाटी विद्यापीठाच्या कुलसचिवांच्या तक्रारीवरून' खटला भरण्यात आला होता. या नातेवाईक विद्यार्थ्याच्या सुटकेसाठी, या राज्यमंत्र्याने कुलसचिव श्री. भूयान यांच्यावर दडपण आणण्यासाठी दोन पोलीसनिरीक्षक, एक जिल्हा दंडाधिकारी व एक पत्रकार यांच्यासह दि. १६ जुलैला रात्री दीड वाजता भूयान यांची भेट घेऊन त्यांना धमक्या दिल्या. पुढे अनेक दिवस या घटनेची चर्चा गौहाटीच्या प्रमुख वृत्तपत्रांतून सुरू होती.

पोलिसी दमननीतीचे उद्दिष्ट आंदोलकांचे नीतिधैर्य ढासळविणे हे आहे व त्यामुळेच आंदोलकांचे शक्तिकेंद्र असलेल्या नौगाव शहरात तर त्यांनी अघोषित पोलीस-राज्यच स्थापन केले आहे. जमिनींचे पट्टे पट्टे घुसखोरांच्या नावांवर करून देण्यामुळे कुप्रसिद्ध झालेले राज्याचे अर्थमंत्री श्री. महम्मद इद्रिस यांच्या आग्रहास्तव या ठिकाणी दोन नव्या मुस्लिम पोलीसअधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून संपूर्ण शहरात आज त्यांचेच राज्य आहे. संपूर्ण राज्यात राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली आज चारशेहून अधिकजण अटकेत आहेत व त्यात नौगाववासीयांची बहुसंख्या आहे. गेल्या जुलैत विद्यापीठांच्या परीक्षा सुरू असताना परीक्षाकेंद्रात बसून उत्तरपत्रिका लिहिणाऱ्या सुमारे डझन निरपराध विद्यार्थ्यांना पोलिसांनी एकाएकी व अकारण अटक करून नेले. रात्री-अपरात्री विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांवर धाड

टाकून एका-दोघांना पकडून नेण्याचे सत्रही नौगावात अव्याहत सुरू आहे. व्यापाऱ्यांना दमदाटी करून त्यांच्याकडून पैसा उकळण्याचे, अन्यथा त्यांना अटकेत टाकण्याचे प्रकार गेल्या जुलैअखेर इतके वाढले की, नौगाव चेंबर ऑफ कॉमर्स या व्यापारी संघटनेने एक विशेष ठराव संमत करून राज्यशासनावर सडकून टीका केली आणि एक दिवस 'नौगाव बंद' देखील पाळला !

राज्यात सर्वत्र आंदोलनाविरुद्ध दहशतीचे वातावरण कायम टिकून रहावे म्हणून निवडणूक-काळात देशातील अन्य राज्यांतून आलेल्या राखीव पोलिसांच्या तुकड्या अद्याप माघारी पाठविण्यात आलेल्या नाहीत. मणिपूर व नागभूमीतील परकीय हस्तकांविरुद्ध उपाययोजनेसाठी वापरण्याचा Anti Insurgency Act आज आसामात जवळजवळ सर्वत्र लावण्यात आला आहे व याचा फायदा घेऊन पोलीसयंत्रणा अटक व गोळीबारांच्या संदर्भात मनमानी कारभार करू लागली आहे. दमननीतीचाच एक भाग म्हणून राज्यशासनाने सरकारी नोकऱ्यांमध्ये 'आंदोलनाशी संबंधित नसल्याची' गुणवत्ता श्रेष्ठ मानून हजारोंच्या संख्येत मुस्लिम घुसखोर मंडळींच्या नेमणुकींचा सपाटा लावला आहे. गेल्या जुलैत कामपूर, मरीगाव या भागात प्राथमिक शिक्षकांच्या पदांवर झालेल्या नव्या नियुक्त्यांमध्येही मुस्लिम शिक्षक बहुसंख्य आहेत. अर्थात आंदोलनाशी भूतकाळात कधी ना कधी, या ना त्या प्रकारे संपर्क आल्यावरून आपल्याला सरकारी नोकऱ्यांपासून वंचित रहावे लागते हे लक्षात आल्यानंतर सामान्य माणूस आंदोलनाबाबत अधिकाधिक उदासीन बनेल अशी सैकिया सरकारची कल्पना असली तरी ती तितकीशी परिणामकारक ठरलेली नाही.

घुसखोरवादी सरकार

राज्यसरकार एकीकडे दहशतीच्या नवनव्या तंत्रांचा अवलंब करीत असतानाच दुसरीकडे मुस्लिमांच्या तुष्टीकरणासाठी सर्व काही केले जात आहे. राज्यात नवे ६ जिल्हे व सुमारे १८ तालुके जाहीर करण्यात आले आहेत व यामागे घुसखोर बहुसंख्य प्रदेश वेगळा काढून आंदोलन-विरोधी शक्ती सरकारीरीत्या संगठित करण्याचाच भाग आहे. गेल्या १० सप्टेंबरच्या रस्ता रोको आवाहनाला जिथे अल्प प्रतिसाद मिळाला अशा जिल्ह्यांची यु. एन. आय. वृत्तसंस्थेच्या बातमीतील यादी नजरेखालून घातल्यावर हेच लक्षात येते.' बंगाली व्याप्त सिल्चरव्यतिरिक्त करीमगंज, द. गोलपारा, बारपेटा आणि मंगलदई इ. जिल्ह्यांची नावे या यादीत आहेत व हे चारही नवनिर्मित जिल्हे घुसखोर-बहुसंख्यांक आहेत. याशिवाय ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातील ज्या चर-बेट प्रदेशात घुसखोरांची बहुसंख्या आहे, त्या प्रदेशाच्या विकासासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय तालुका पंचायत समित्यांसाठी नेमणुकीची तरतूद करून बहुसंख्य मुस्लिम-नेत्यांच्या या समित्यांवर केलेल्या नियुक्त्या व अल्पसंख्यांकांच्या विशेष रक्षणासाठी निर्माण करण्यात येणाऱ्या एका खास पोलीसदलात अल्पसंख्यांकांसाठी ३३% जागा राखून ठेवण्याची तरतूद इ. सैकिया शासनाचे काही निर्णय त्या सरकारच्या धोरणावर प्रकाश टाकणारे आहेत.

अस्मितेला फुंकर

आसामच्या जनतेचा असमिया अहंकार दुखावला जाणार नाही, शक्यतो तो अधिकाधिक फुलेल या दृष्टीने विचार करून निर्णय घेणे हे सैकिया सरकारच्या विद्यमान नीतीचे आणखी एक वैशिष्ट्य. 'असमिया' राष्ट्रीयत्वाच्या दांभिक गप्पा मारण्यात मुख्यमंत्री सैकिया कुशल आहेत ! त्यांचे कुठलेही भाषण या राष्ट्रीयत्वाच्या जपणुकीच्या आवाहनाशिवाय संपत नाही. आंदोलनाच्या आतापर्यंतच्या अपयशामुळे निराशेच्या गर्तेत सापडलेल्या बेकार असमिया युवकांसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर रोजगारयोजना आखल्या आहेत व आतापर्यंत एक लाखाहून अधिक तरुणांना रोजगार मिळवून दिला आहे. आंदोलनकाळात सरकारची गैरमर्जी ओढवून घेतलेल्या सर्व असमिया अधिकाऱ्यांची त्यांनी पुनर्नेमणूक केली असून विशेषत: महत्त्वाच्या शहरांमधून जे बिगरअसमिया अधिकारी नेमण्यात आले होते त्यांची बदली करण्यात आली आहे. खुद्द गौहाटीत प्रिय गोस्वामी या अस्सल असमिया पोलीसअधिकाऱ्याची नियुक्तीकरून सैकिया सरकारने एक हुशार खेळी खेळली आहे.

गुळमुळीत धोरण

घुसखोरांच्या ज्वलंत समस्येबाबत सैकिया सरकारने नेहमीसारखेच अस्पष्ट, संदिग्ध आणि गुळमुळीत धोरण ठेवले आहे व विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षात आज $\frac{1}{3}$ म्हणजे ३३ आमदार मुसलमान आहेत ही वस्तुस्थिती लक्षात घेता हे धोरण स्वाभाविकच आहे. घुसखोरी कायमस्वरूपी रोकण्याच्या हितेश्वर सैकिया यांच्या घोषणा या अखेर वल्गनाच ठरल्या आहेत. आसाम-बांगलादेश सीमावर्ती क्षेत्राच्या २७० कि. मी. लांबीच्या पट्ट्यावर संरक्षक भिंत उभारण्याची आपली कल्पना सैकिया यांनी कधीच विचारपूर्वक मांडली नव्हती. स्वाभाविकच केंद्र सरकारने ही शेख महंमदी कल्पना सपशेल फेटाळून लावली. मुख्यमंत्री सैकिया आता तारेच्या कुंपणाच्या गप्पा मारत आहेत ! पण अशा कोणत्याही आयोजनेविरुद्ध बांगलादेशचे लष्करी प्रशासक जन. एर्शाद यांनी एक डरकाळी फोडल्यानंतर सैकिया सरकारचे तावूत थंड झाले आहेत. आश्चर्य म्हणजे केंद्र सरकारनेही याबाबत कोणतीही प्रतिक्रिया नोंदवलेली नाही. आलेल्या घुसखोरांना बाहेर काढण्याबाबतही, अपेक्षेप्रमाणेच, सैकिया सरकारचे धोरण निव्वळ चालढकलीचे राहिलेले आहे. सुमारे चाळीस लाखांपैकी १९७१ नंतर आलेल्या निम्म्याहून अधिक घुसखोरांची छाननी करायची तर किमान १२६ निवाडामंडळांची गरज आहे. माजी मुख्यमंत्री श्रीमती अन्वरा तैमूर यांच्या आग्रहावरून सैकिया यांनी ही संख्या अवघ्या २० वर आणून ठेवली व प्रत्यक्षात अद्याप एकाही न्यायमूर्तीची नेमणूक या निवाडामंडळावर झालेली नाही. या निवाडामंडळाची कार्यपद्धती व मुख्य म्हणजे त्यांचा निर्णय रावविण्याची यंत्रणा याबाबतही राज्यसरकारने अद्याप काहीही स्पष्ट केलेले नाही.

अल्पसंख्यांकांचे पुष्टीकरण, घुसखोरीच्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावण्याची टाळाटाळ आणि संकुचित असमिया अहंकाराला खतपाणी

घालण्याचे उद्योग या सैकिया सरकारच्या त्रिसूत्रीमुळे आंदोलकांची अडचण झाली आहे यात शंका नाही. सतत चार वर्षे दमछाक होऊनही आसामचा विद्यार्थीवर्ग मोठ्या धैर्याने पुन्हा एकदा आंदोलनात उतरला असला तरी वातावरण पूर्वीइतके उत्साहवर्धक राहिलेले नाही. आसू नेता नुरुल हसन याच्या पदत्यागापाठोपाठ 'आसो' (ऑल आसाम स्टुडंटस ऑर्गनायझेशन) व 'आमसू' (ऑल आसाम मायनॉरिटी स्टुडंटस युनियन) या फुटीर गटांच्या कारवाया काहीशा वाढल्या आहेत. आसूच्या संघटनात्मक ताकदीवर याचा जवळजवळ शून्य परिणाम झाला असला तरी 'आसू'च्या जनमानसातील प्रतिमेला विशेषत: आपल्याकडील खोट्या निधार्मिकतेच्या वातावरणात, चांगलेच तडे गेले आहेत. सरकारी पाश अधिकाधिक आवळले गेल्यामुळे सरकारी नोकरांच्या सहभागावरही काहीसा प्रतिकूल परिणाम होणे स्वाभाविक आहे. या सगळ्या वातावरणात आसामातील बुद्धिजीवीवर्गातही वैचारिक गोंधळ वाढीला लागला आहे. अर्थात असे सगळे असले तरी असमिया नागरिकांची अभेद्य एकजूट कायम आहे व आंदोलन असेच पुढे चालले पाहिजे याबाबत कोठेही विसंवादी सूर दिसून येत नाही.

पुढे काय ?

अशा स्थितीत या आंदोलनाचे पुढे काय होणार ? या व त्या अंतर्गत लपलेल्या विविध उपप्रश्नांची उत्तरे सबंध देशातून या प्रश्नाबाबत सरकारवर, चहूकडून लोकमताचा दबाव कितपत आणता येतो यावर अवलंबून आहेत. आरंभापासूनच, आसामच्या नेतृत्वाने या आंदोलनाला राष्ट्रीय स्वरूप देण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत व यामुळे आजतागायत या चळवळीची अमाप हानी झाली आहे. या आंदोलनाविषयी देशभरातील जनतेत विविध गैरसमज वाढीला लागण्यासही, एका अर्थाने, आंदोलकांचा हा दृष्टिकोनच जबाबदार आहे. अ. भा. विद्यार्थी परिषदेच्या पुढाकाराने जानेवारी १९८१ मध्ये हे आंदोनल राष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी दिल्लीत एक राष्ट्रीय परिषद घेतली गेली व हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी अर्थपूर्ण प्रयत्न केले गेले. जैनेन्द्रकुमार, बी. जी व्हर्गिस, आर. आर. दिवाकर, बाळ आपटे, इंदरजित इ. मंडळींची या संदर्भात एक समितीही नेमण्यात आली. हे सूत्र पकडून ही चळवळ देशव्यापी करण्याचे प्रयत्न आसामच्या आंदोलक नेत्यांनी करायला हवे होते; पण ते झाले नाही, असमिया नेत्यांच्या या प्रवृत्तीस, हा घुसखोरीचा प्रश्न म्हणजे 'असमिया राष्ट्रीयत्वावर' हल्ला होय ही त्यांची चुकीची धारणाही बव्हंशी कारणीभूत आहे. एक, भाषेतील भेद वगळल्यास, असमिया-असमियांची संस्कृती व्यापक अशा हिंदु–भारतीय संस्कृतीपेक्षा वेगळी कशी ? आणि जर सांस्कृतिक एकरसता आहे तर असमियांची स्वतःची अशी वेगळी 'राष्ट्रीयता' तरी कशी असेल ? पण असा कुठलाही तर्कसंगत विचार न करता असमिया-नेते नेहमीच असमिया राष्ट्रीयत्वाची जपमाळ ओढत बसले व त्यातून हे आंदोलन सार्वदेशिक बनविण्याच्या प्रयत्नांना चांगलीच खीळ बसली. प्रादेशिक अस्मितेच्या निखाऱ्यावर फुंकर घालून तो फुलवायचा आणि त्यावर राजकीय स्वार्थाची पोळी भाजून घ्यायची या आमच्या करंटया राजकीय नेत्यांच्या डावपेचांना आपल्या 'स्वतंत्र राष्ट्रीयतेच्या आग्रहामुळे असमिया-नेतृत्व बळी पडले. या राष्ट्रीयतेच्या भाषेमुळेच अनेकांना या अत्यंत राष्ट्रवादी आंदोलनावर फुटीरतेचा शिक्का मारण्यासाठी संधी विनासायास मिळाली.

हिंदु निर्वासितांचा प्रश्न

हिंदु बांगलादेशींना निर्वासित म्हणून स्वीकारण्याबाबत असमिया नेतृत्वाने घेतलेली भूमिकाही अंतिमत: या आंदोलनाला हानिकारक ठरणार आहे. बंगाली हिंदूंविषयी असमियांच्या मनात असलेला परंपरागत राग व आंदोलनाचा चेहरामोहरा धर्मनिरपेक्ष ठेवण्याची आंदोलकांची धडपड यातूनही या आंदोलनाविषयीच्या गैरसमजांना खतपाणी मिळाले आहे. बांगलादेशातून आलेले मुसलमान त्वरित असमिया भाषा शिकून त्यांच्या सर्व सांस्कृतिक जीवनात समरसतेने सहभागी होतात. याउलट बंगाली हिंदू मात्र आसामात येऊनही बंगालीपणाची जपणूक करू पाहतात. हा दोन प्रवृत्तींमधील फरकही असमियांच्या या मानसिकतेस कारणीभूत आहे. कसेही असले तरी बांगलादेशात उपासनास्वातंत्र्याला पारखे झालेले हिंदू आसामात आले ते निर्वासित म्हणून व म्हणूनच आंदोलकांना त्यांचा स्वीकार करण्यास आज ना उद्या उघडपणे मान्यता द्यावी लागेल हे निःसंशय.

अखेर राष्ट्रीय प्रश्न

घुसखोरांचा प्रश्न हा राष्ट्रीय प्रश्न असल्याचे सार्वत्रिक वातावरण निर्माण करण्यास आंदोलक-नेते कितीही अनुत्सुक असले तरी तसा तो राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा सर्वच राष्ट्रवादी विचारांच्या अखिल भारतीय संघटनांची जबाबदारी आहे व ती त्यांना टाळता येणार नाही. गेल्या १५ ऑगस्टपासून ह्या प्रश्नाबाबत अ. भा. विद्यार्थी परिषदेने राष्ट्रीय पातळीवर असम–बचाओ अभियान सुरू केले आहे व हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम म्हणजे सध्याच्या वातावरणात आशेचा एकमेव किरण आहे. विद्यार्थी परिषदेच्या पुढाकाराने, पण राष्ट्रव्यापी असम–बचाओ समितीच्या नावाखाली देशात सर्वत्र आसाम बचाओ परिषदा पार पडल्या आहेत. हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेण्याचे महत्त्व ज्यांनो जाणले आहे अशा अनेक असमिया-नेत्यांनी विविध प्रांतात जाऊन या परिषदांमध्ये भागही घेतला आहे. येत्या २ ऑक्टोबरला, आसाम विधानसभेचे विसर्जन, 'घुसखोरवादी' सैकिया शासनाची बरखास्ती, सीमा सील करून घुसखोरी पूर्णत: रोकणे व आंदोलकांबरोबर वाटाघाटींचा आरंभ या चार मागण्यांसाठी विद्यार्थी परिषदेने देशभरातील सुमारे १५०० कार्यकर्त्यांचा असम–बचाओ सत्याग्रह योजला असून या आवाहनाला सर्वत्र उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे. असमिया नेतृत्वाचा दृष्टिकोन व देशभरातील शेकडो विद्यार्थी–विद्यार्थिनींना गौहाटीस घेऊन जाण्याच्या मार्गातील अडचणींचा विचार करता अ. भा. वि. प. चा हा निर्णय धाडसीच म्हणावा लागेल.

देशव्यापी समस्या

अर्थातच एकट्या अ. भा. वि. प. च्या प्रयत्नाने घुसखोरीच्या या जुनाट समस्येबाबत राष्ट्रीय स्तरावर जागृती घडून येणे सोपे नाही. घुसखोरीची ही समस्या दिवसेंदिवस अक्राळविक्राळ बनत आहे.

केवळ आसामच नव्हे तर बिहार व बंगाल, ओरिसामध्येही मोठ्या प्रमाणावर घुसखोरांच्या वस्त्या उभ्या राहिल्या आहेत. बिहार–बंगाल-मधील पूर्णिया, किशनगंज, कटिहार, मालदा आणि राजमहल या जिल्ह्यांमध्ये १९६१–७१ आणि ७१–८१ या काळात उत्तरोत्तर वाढलेले मुस्लिम लोकसंख्येचे प्रमाण (पाचही जिल्ह्यांत सरासरी ३.५% वाढ. मुस्लिम लोकसंख्या, सरासरी ४८%) या वाढत्या घुसखोरीचीच साक्ष आहे. बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यात काही आठवड्यांपूर्वीच घुसखोर मुस्लिम व स्थानिक वनवासी यांच्यात अनेक ठिकाणी चकमकी घडून आल्या व त्यात वनवासींची मोठ्या प्रमाणावर हानी झाली. प. बंगालमध्येही घुसखोरी अव्याहत सुरू असून खुद्द कलकत्त्यात, राज्यसभेचे कलीमुद्दीन शम्स यांच्या आशीर्वादाने सुमारे पन्नास हजार बांगलादेशींची एक वसाहत उभी राहिली आहे. या घुसखोरीचे कलकत्त्याच्या नागरी जीवनावर व सबंध देशाच्या सुरक्षिततेवर कितीही प्रतिकूल परिणाम होवोत, पुढच्या निवडणुकीसाठी शम्ससाहेबांची पन्नास हजार मते निश्चित झाली आहेत हे निःसंशय !

बिहार–बंगालपाठोपाठ आता या घुसखोरांची स्वतःच्या पोटा-पाण्याचा प्रश्न सोडविणाऱ्या उद्योगप्रधान शहरांच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. गेल्याच महिन्यात, मुंबईच्या जे जे स्कूल ऑफ आर्टच्या पदपथावर बांगलादेशी घुसखोरांच्या १५–२० झोपड्या उभ्या राहिल्याबद्दल महापालिकेच्या स्थायी समितीची बैठक तहकूब झाली होती. कमिशनर रिबेरोसाहेबांनी या झोपड्या आता हलविल्या असल्या तरी घुसखोर काही मायदेशी परतलेले नाहीत हे उघडच आहे.

अखेर हा प्रश्न आणखी किती उग्र होण्याची आम्ही वाट पाहणार आहोत हाच खरा प्रश्न आहे. आसामातील घुसखोरीचा प्रश्न हा देशापुढील सर्वांत गंभीर प्रश्न आहे व त्यामुळे राजकीय–वैचारिक मतभेद बाजूला ठेवन या देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित अशा, तुमच्या–आमच्या अस्तित्वाशी निगडित अशा या प्रश्नावर व्यापक जागृती घडून येऊन मुर्दाड केंद्रसरकारवर जोपर्यंत लोकमताचे दडपण येत नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही हे उघड आहे. प्रचंड भौगोलिक अंतरामुळे जो सुसंवादाचा अभाव निर्माण झाला आहे त्यामुळे ईशान्य भारतातील नागरिकांच्या मनाची तार अन्य प्रदेशातील नागरिकांच्या मनाशी जुळणे मुळातच अवघड आहे. वाढती घुसखोरी आणि या समस्येची वाढती उपेक्षा यामुळे एक प्रकारच्या मानसिक फाळणीची प्रक्रिया याआधीच सुरू झाली आहे आणि शेवटी भौगोलिक फाळणीपेक्षाही मानसिक फाळणी अधिक धोकादायक असते हे विसरून चालणार नाही ! □

शरदमणी मराठे हा इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगची पदविका मिळवलेला विद्यार्थी परिषदेचा एक कार्यकर्ता. गेल्या नोव्हेंबरमध्ये परिषदेच्या एका कार्यक्रमात सहभागी होऊन तो पूर्वांचलात गेला होता. आसामच्या सद्यःस्थितीत घुसखोरांची समस्या कशी व्यापून आहे हे त्यांनी जवळून वघितलं. प्रत्यक्ष सरहद्द... 'सीमा' बघून तो थक्कच झाला. सीमाक्षेत्राच्या भेटीचा तो अनुभव आणि नंतर गेल्या फेब्रुवारीत निवडणूककाळात जो हिंसाचार झाला त्याच्या शरदच्या मनावर उमटलेल्या प्रतिक्रिया म्हणजेच

'आसामच्या कविता'

एक
छत्रसालच्या सीमेवर

अन्यायाच्या विरोधात
पेटलेल्या ह्या भूमीवर
मी उभा कोडग्यासारखा
छत्रसालच्या सीमेवर

दिमते तेवढी शांत नाही
ही हिरवी भातशेती
प्रत्येक हिरव्या दाण्यामध्ये
व्यापून आहे एक भीती
परकीयांचे पांढरे पाय
उभे पीक तुडवून जातात
तक्रार तरी करणार कोठे
येथे कुंपणेच शेत खातात
विद्रोहाच्या गडद छटा
इथल्या दगडा-दगडावर
मी उभा कोडग्यासारखा
छत्रसालच्या सीमेवर... (१)

गस्त तशी नावापुरतीच
घुसखोरीला चिकार वाव
शिवाय रक्षकांचे देखील
ठरले आहेत बाजारभाव
नतद्रष्ट धर्मांधांचा
कुठून सांडा येतो आहे
सार्वभौमत्वाला आमच्या
खुले आव्हान देतो आहे
विषवेलींची हिरवी बने
ह्या भगव्या भूमीवर
मी उभा कोडग्यासारखा
छत्रसालच्या सीमेवर... (२)

ब्रह्मपुत्रादेखील आता
आसवे ढाळून थकली आहे
राज्यकर्त्यांनीही आमच्या
बुद्धी गहाण टाकली आहे
शहीद वेदीवरील अग्नी
किती दिवस जळणार आहे
अन् दिल्लीला त्याचे दुःख
कुठल्या काळी कळणार आहे ?
ईशान्येतली राज्ये चालतात
बंदुकांच्या धाकावर
मी उभा कोडग्यासारखा
छत्रसालच्या सीमेवर... (३)

धन्य शासन धन्य आम्ही
धन्य आमचा कोडगेपणा
मतासाठी खुशाल वाकेला
असला आमचा खास कणा
मी देखील असाच बनेन

सारे कळते वळत नाही
माझी नोकरी माझे घर
पाश तुटता तुटत नाही
करणार मी काहीच नाही
सारा भर बोलण्यावर
बेचैन होईन दोन दिवस
पुन्हा गाडे वळणावर... (४)

अन्यायाच्या विरोधात
पेटलेल्या ह्या भूमीवर
मी उभा कोड्ग्यासारखा
छत्रसालच्या सीमेवर

□

नोव्हेंबर १९८२
छत्रसाल (जि. गोलपारा, आसाम)
येथे भारत–बांगलादेश–सीमाक्षेत्राला
भेट दिल्यानंतर.

□

दोन

तो : मुंबई व आसाम

पहिल्या वाफेचा चहा
ताजे वर्तमानपत्र
वह्या...बॉलपेन्स
दगडी पाटया...दगडी पेन्सिली
चिमणाळी...खुळखुळे
ह्यांच्या गराडयात
तो उद्गारला
आसामचे काही खरे नाही !

ट्रेनमध्ये
साऱ्यांच्याच हातात वर्तमानपत्रे
चेहेऱ्यावरती
पानापानांमधून वाचलेली
एक छापील अस्वस्थता
स्टेशनबाहेर
एक थोडी मूठभर गर्दी
तिच्यापुढे एक लाल भाषण
आणि शेजारच्याच चौकामध्ये
प्रसिद्धी बुभुक्षितांचे
एक साखळी–उपोषण
आसामच्या निमित्ताने

ऑफिसमध्ये दिवसभर
काम करता करता
किंवा चुकवता चुकवता
आसामचीच चर्चा
अग्रलेखातील
आठवतील त्या मुद्दयांची उजळणी
अधूनमधून चहाच्या फैरी
आसामच्या निमित्ताने

चालता...चालता...
बोलता बोलता...
चित्रपटांच्या रांगेत...
नाटकांच्या मध्यंतरात...
किंवा अगदी
सार्वजनिक स्वच्छतागृहात देखील
संगमरवरी आडोशाच्यावर
डोके उचलून
शेजारच्या माणसाशी
माफक चर्चा
आसामबद्दलच

कामाच्या त्रासाने
रेल्वेच्या प्रवासाने
शिणलेला तो
घरी आला
...पोह्याची बशी
चहाचा कप
मासिके कॉमिक्स
भोवरे...गुंजा
चिमणाळी...खुळखुळे
ह्यांच्या समवेत
दूरदर्शनवरील
राष्ट्रीय बातम्या
ऐकता ऐकता
अर्धवट झोपेत
तो पुटपुटला
आसामचे काही खरे नाही !

फेब्रुवारी १९८३

□

तीन

ब्रह्मपुत्रा

ब्रह्मपुत्रा...
सारा आसाम भेदून जाणारे
एक खळाळते महाभूत
मैलन्‌मैल पसरलेले
महा प्रचंड पात्र
ब्रह्मपुत्रा
ऊर्ध्व आसामातील
चहामळे शिपून
ती थोडीशी पुढे निघाली
आसपासच्या जनजातीतील
तिच्या मैत्रिणींशी खेळत
थोडीशी रमली
शीतल पाण्याचे
स्फटिकतुषार उधळीत
निघाली वीज वेगाने
कामरूपाकडे

अगराची सुगंधी झाडी दुतर्फा
मधे ब्रह्मपुत्रा
आपापल्या घरअंगणात
रमणारी वस्ती किनाऱ्यावर
मधे ब्रह्मपुत्रा
प्रवाहात दूरवर
एक डुलणारी होडी
तिच्यावरती
होडीवाल्याच्याच गीतस्वरांनी
भारलेले आकाश
खाली ब्रह्मपुत्रा

आता समोर दिसतेय
प्रागज्योतिषपुराची प्राचीन भूमि
गुवाहाटी शहराला
कटीखांद्यावर खेळवीत
लहानाचे मोठे केले
ह्याच ब्रह्मपुत्रेने
ऐन प्रवाहात मध्यभागी
आहे उमानंदाचे बेट
तेथील स्वयंभू उमानंदच आहे साक्षी
ह्या महान जलस्रोताच्या
प्रवाही इतिहासाचा

ब्रह्मपुत्रा...
नसतील पिटले कोणी
जगभर डांगोरे हिच्या पावित्र्याचे
नसेल जमत हिच्या काठाकाठांवर
कुंभमेळघांची धामट गर्दी
किंवा हिच्या सीलबंद गडूंचीही
देव्हाऱ्यामधे पूजाही कधी झाली नसेल
पण हिचे पाणी स्वच्छ आहे
एकीकडे
जाऊन मिळायचे गंगेला

पृष्ठ २१ वर

युनायटेड फ्रंट : नाव मोठं लक्षण खोटं

अभय गोखले

भाजप–लोकदल आघाडीच्या पाठोपाठ आता जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली चार पक्षांच्या युनायटेड फ्रंटची स्थापना झाली आहे. जनता पक्षाशिवाय या युनायटेड फ्रंटमध्ये शरद पवारांची समाजवादी काँग्रेस, बहुगुणांचा लोकशाही समाजवादी पक्ष व गुजरायेतील बंडखोर काँग्रेसनेते रतुभाई अदाणी यांची राष्ट्रीय काँग्रेस या पक्षांचा समावेश आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या स्थापनेनंतर घाईघाईने या युनायटेड फ्रंटची स्थापना करण्यात आली. त्याचप्रमाणे या युनायटेड फ्रंटच्या निरनिराळ्या नेत्यांची राष्ट्रीय लोकशाही आघाडीविरुद्धची वक्तव्ये तपासली तर ही फ्रंट इंदिरा काँग्रेसविरोधी आहे की भाजप–लोकदल आघाडीविरुद्ध आहे ही शंका यावी. भाजप–लोकदल आघाडी ही इंदिरा काँग्रेसपेक्षा खतरनाक आहे असे जनता पक्ष-अध्यक्ष चंद्रशेखर म्हणाल्याचे ऐकिवात आले. ते जर खरे असेल तर मग भाजप–लोकदल आघाडीच्या सामर्थ्याची असूया वाटून निराशेने ते असे म्हणाले असतील, असे समजून तिकडे दुर्लक्ष केलेले बरे. खरी गोष्ट अशी की, भाजप–लोकदल यांच्या आघाडीने आपण एकाकी पडलो आहोत (विशेषत: उत्तर भारतात) असे जनतानेत्यांना जाणवले व मिळतील त्या सटरफटर पक्षांशी युती करून जनतापक्षाने युनायटेड फ्रंटची स्थापना केली. युतीची घाई करण्यामागे आपण एकाकी नाही अशी स्वत:चीच समजूत घालण्याचा जनतानेत्यांचा व्यर्थ प्रयत्न आहे. त्यामुळे युनायटेड फ्रंटचा बार फुसका ठरण्याचीच जास्त शक्यता आहे.

या युनायटेड फ्रंटने चरणसिंगांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करून, राष्ट्रीय लोकशाही आघाडी मोडून भाजपला एकाकी पाडण्याचा प्रयत्न केला, तोसुद्धा त्यांच्या पराभूत मनोवृत्तीचे दर्शन घडवणारा आहे. एक तर भाजपला सोडून युनायटेड फ्रंटमधे जाण्याइतके चरणसिंग मूर्ख नाहीत. कारण त्यांना जनतापक्ष व त्याच्या फ्रंटमधील गोतावळ्याची ताकद माहीत आहे. शिवाय या फ्रंटमधील मोरारजी, चंद्रशेखर, देवीलाल, मधू लिमये यांच्याशी चरणसिंग यांचे जमणे कठीण आहे. याचा परिणाम मात्र एखादे वेळेस जनता पक्षालाच भोगावा लागणार आहे. कारण जनतानेत्यांची भाजप–विरोधी वक्तव्ये वाढली व भाजपला एकाकी पाडण्याचा उपद्व्याप त्यांनी असाच पुढे चालू ठेवला, तर कर्नाटकात एखादे वेळेस भाजप त्यांचा पाठिंबा काढून घेईल व जनता मंत्रिमंडळाच्या तंगड्या वर होतील, या गोष्टीची जनतानेत्यांनी काळजी घेतलेली नाही.

युनायटेड फ्रंटबद्दल व तिच्या भवितव्याबद्दल विचार करण्यापूर्वी या फ्रंटच्या सहप्रवाशांची ताकद अजमावून पहायला हवी. आज जनता पक्षवाले उड्या मारत आहेत ते कर्नाटकात त्यांचे राज्य आहे या गोष्टीच्या जोरावर. त्याचप्रमाणे लोकशाहीतील फुटीनंतर त्यांच्या पक्षात कर्पूरी ठाकूर, देवीलाल, जॉर्ज फर्नांडिस, बिजू पटनाईक; मधू लिमये इत्यादि नेते आल्याने त्यांची ताकद काही राज्यात बरीच वाढली आहे. मात्र ज्या उत्तरप्रदेशात लोकसभेच्या सर्वांत जास्त जागा आहेत तेथे जनतापक्ष अत्यंत कमकुवत आहे. जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर उत्तरप्रदेशातील आहेत. मात्र त्यांचा बालीया मतदारसंघ सोडला तर इतरत्र त्यांचा फारसा प्रभाव नाही. बहुगुणांचा लोकशाही समाजवादी पक्ष युनायटेड फ्रंटमध्ये असल्याने व त्यांच्या मुस्लिमांतील लोकप्रियतेचा प्रभाव लक्षात घेता, त्यांचा उपयोग फ्रंटला होऊ शकेल. मात्र बहुगुणांनी वारवार पक्ष बदलल्याने सुज्ञ मतदार त्यांच्यावर कितपत विश्वास ठेवेल हे पहावयास हवे. सध्याच्या ४२५ सदस्यांच्या उत्तरप्रदेश विधानसभेत जनतापक्षाचे डझनभरही सभासद नाहीत. उत्तरप्रदेशनंतर बिहार या मोठ्या राज्यात जनतापक्षाचे काम बरे आहे. कर्पूरी ठाकूर यांनी नुकताच जनतापक्षात प्रवेश केल्याने जनतापक्ष तेथील मान्यताप्राप्त विरोधीपक्ष बनला आहे. स्वत: ठाकूर, एस. एन. सिन्हा, रामसुंदर दास यांच्यासारखे निरनिराळ्या जातींवर प्रभुत्व राखून असलेले नेते जनता पक्षाजवळ आहेत. मात्र बिहारमध्ये इंदिरा काँग्रेसला जोरदार आव्हान देण्यासाठी त्यांना भाजप–लोकदल आघाडीची मदत घेण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. युनायटेड फ्रंटमधील समाजवादी काँग्रेसचाही काही भागात प्रभाव आहे.

हिमाचलप्रदेशात जनतापक्ष नगण्य आहे. त्याचप्रमाणे त्याचे फ्रंटमधील इतर साथीदारही तेथे अस्तित्वहीन असल्याने एक तर त्यांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीशी तडजोड करावी लागेल किंवा दारुण पराभव स्वीकारावा लागेल. हरयाणात देवीलाल यांच्या जनताप्रवेशाने जनतापक्ष मजबूत झालाय; परंतु चरणसिंग व देवीलाल यांच्यात जाटांची मते विभागली गेल्याने देवीलाल पूर्वीसारखे प्रभावी असणार नाहीत. शिवाय देवीलालना जनतापक्षात प्रवेश दिल्याने सुषमा स्वराज्यसारखे तेथील स्थानिक जनता नेते असंतुष्ट आहेत. देवीलाल–चरणसिंग–भाजप हे एकत्र आले तरच ते इंदिरा काँग्रेसला खडे चारू शकतात हे पूर्वी सिद्ध झाले आहे. हरयाणात जनता पक्षाचे इतर साथीदार औषधालाही नाहीत. पंजाबमध्ये जनतापक्षाचा जोर कधीच नव्हता. मागे पंजाबमध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत जनतापक्षाला एकही जागा जिंकता आली नव्हती, बहुगुणा, शरद पवार हे चंद्रशेखर यांच्या बरोबरीने पंजाब-प्रश्नावर कितीही आपुलकी दाखवत असले तरी तेथील जनमानसावर त्यांचा कितपत प्रभाव पडेल हा प्रश्नच आहे. मध्यप्रदेशात पूर्वीच्या समाजवाद्यांचा जोर होता; पण नंतर जनसंघाने त्यांना नामोहरम केले. समाजवाद्यांकडे (जनतापक्ष) यमुनाप्रसाद शास्त्री, शरद यादव, पुरुषोत्तम कौशिक यांच्यासारखे बरेच नेते असले तरी तेथे त्यांची स्थिती नेते अनेक कार्यकर्ते थोडे अशी झाली आहे. जनता राज्यात

जनता पक्ष मध्यप्रदेशात सत्तेवर होता तो जनसंघाच्या (भाजप) जोरावरच; परंतु आपली ताकद वाढल्याचा भ्रम तेव्हा समाजवाद्यांना झाला होता. नंतर जनता पक्ष फुटल्यावर विधानसभांच्या निवडणुकांत समाजवाद्यांना (जनतापक्ष) आपली मध्यप्रदेशातील ताकद समजली. ३२४ सदस्यांच्या मध्यप्रदेश विधानसभेत जनतापक्षाचे अवघे दोन आमदार निवडून आले. आता लोकदलातील काही कार्यकर्ते जरी जनतापक्षात आले असले तरी जनता पक्षाच्या तेथील बळावर फारसा परिणाम (वाढ) झालेला नाही. लोकसभेच्या निवडणुका तर जनतापक्षातील समाजवादी घटकाच्या उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या होत्या. राजस्थानमध्ये कुंभाराम आर्य यांच्यासारखा जाटनेता लोकदलातून जनतात आल्याने जनता पक्ष तेथे काही भागात आपला प्रभाव राखून आहे. मात्र भाजपच्या भैरवसिंग शेखावत यांच्यासारखा सर्वमान्य नेता जनता पक्षाजवळ नसल्याने त्यांचा प्रभाव फारसा पडत नाही. शिवाय राजस्थानातील जाटांवर चरणसिंगांचा खूप प्रभाव असल्याने इंदिरा काँग्रेसला आव्हान देण्यासाठी युनायटेड फ्रंटला, राष्ट्रीय लोकशाही आघाडीची मदत घ्यावीच लागेल. राजस्थानमध्ये भाजपचा चांगलाच प्रभाव आहे. विशेषतः भाजपचे नेते माजी मुख्यमंत्री भैरवसिंग शेखावत राजपूत असल्याने राजस्थानात सर्वांत मोठा असलेल्या राजपूत जमातीवर त्यांचा चांगलाच प्रभाव आहे. भैरवसिंग शेखावत हे राजस्थान-विधानसभेतील मान्यताप्राप्त विरोधीनेते आहेत. उत्तरप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, हरयाणा, हिमाचल, पंजाब या पट्ट्यात लोकसभेच्या जवळजवळ २२५ जागा आहेत आणि या गोष्टीचा विचार केला तर जनतपक्षप्रणीत युनायटेड फ्रंटचा बिहार, हरयाणा याच राज्यात विशेष प्रभाव आहे. बहुगुणांमुळे उत्तरप्रदेशात व कुंभाराम आर्य यांच्यासारख्या नेत्यांमुळे राज्यस्थानात जनता पक्षाची स्थिती बरी आहे. मात्र हिमाचल, पंजाब, मध्यप्रदेश या राज्यांत युनायटेड फ्रंटचा विशेष प्रभाव नाही व येथेच ती राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या तुलनेत मार खाते.

महाराष्ट्रातले चित्र

महाराष्ट्रात जनता पक्षाचा प्रभाव बरा आहे. शिवाय युनायटेड फ्रंटमध्ये शरद पवारांची समाजवादी काँग्रेस असल्याने युनायटेड फ्रंटची स्थिती महाराष्ट्रात मजबूत दिसते. शरद पवारांचा महाराष्ट्राचा झंझावती दौरा सध्या चालू असल्याने त्याची मोठी मदत युनायटेड फ्रंटला मिळेल. महाराष्ट्रातील शरद पवारांचा लोकप्रियता वादातीत आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील त्यांच्या सभांना बरीच गर्दी असते. कित्येक इंदिरा काँग्रेस कार्यकर्त्यांना त्यांनी आपल्या पक्षाकडे खेचून घेतले आहे. माजी मुख्यमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द चांगली झाली होती. जनता पक्षाचा खेडेगावात चांगला प्रभाव आहे. त्याच्या जोडीला शरद पवारांचा विस्तृत पाठिंबा असला तरी शहरी भागात या पक्षाचा विशेष प्रभाव नाही, त्याकरिता त्यांना भाजपबरोबर समझोता करावा लागेल तरच ते महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला खडे चारू शकतील. जनता, भाजप, समाजवादी काँग्रेस व शेकाप ही आघाडी चांगला पाठिंबा मिळवू शकेल. ह्याकरीता जनता, शेकाप, काँग्रेस (स) यांनी भाजपवरील आपला बहिष्कार उठवला पाहिजे.

कर्नाटकात गुंडुराव कंपनीच्या (मेहेरबानीने) जनता पक्ष सत्तेवर आला. आता त्यांच्या आघाडीतील बंगारप्पांनी जनता पक्षाशी फारकत घेतली असली तरी भाजपच्या पाठिंब्यावर ते कर्नाटकात सत्तेवर टिकून आहेत. सत्तेवर असल्याने जनता पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत चांगली कामगिरी करू शकला. आज भारतात कर्नाटकातच जनता पक्ष सर्वांत प्रभावी आहे. मात्र गुंडुरावांनी घातलेला हैदोस लोक आता विसरलेत. त्यामुळे त्या गोष्टीचे भांडवल करून सत्तेवर टिकून रहाणे फार काळ जमणार नाही. अर्थात मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांच्या सरकारचा कारभार चांगला चालला आहे. कर्नाटकात युनायटेड फ्रंटच्या इतर सहपक्षांची फारशी मदत जनता पक्षाला मिळणार नाही. भाजप—लोकदल-आघाडीशी समझोता केला तरच जनता पक्ष निवडणुकात चांगली कामगिरी करू शकेल.

पूर्वीच्या संघटना—काँग्रेसमुळे गुजराथेत जनता पक्षाचा प्रभाव चांगला आहे. मागे गुजराथेत जनता पक्ष सत्तेवर असताना संघटना काँग्रेसचे बाबुभाई पटेल मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांनी चांगला राज्यकारभार केला होता. सध्या जनता पक्षाचे पटेलच विधानसभेतील मान्यताप्राप्त विरोधीपक्षनेते आहेत. मात्र गेल्या काही दिवसांत भाजपने गुजराथेत जनता पक्षाला तिसऱ्या क्रमांकावर ढकलले आहे. विधानसभांच्या तीन पोटनिवडणुका आतापर्यंत भाजपने जिंकल्या आहेत. केशुभाई पटेल, मकरंद देसाई, चिमणभाई शुक्ल, शंकरसिंग वाघेला यांच्यासारखे जबरदस्त नेते भाजपजवळ आहेत. भाजपच्या दुर्दैवाने सौराष्ट्रातील त्यांचे नेते व राजकोटचे माजी महापौर अरविंद मणीयार यांचे एका मोटारअपघातात नुकतेच दुःखद निधन झाले. रतुभाई अदाणींच्या राष्ट्रीय काँग्रेसचा गुजराथच्या काही भागात प्रभाव आहे. ही राष्ट्रीय काँग्रेस युनाटटेट फ्रंटमध्ये आहे. मात्र राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर लगेचच त्या पक्षाला गळती लागली व एक आमदार इंदिरा काँग्रसमध्ये परत आला, तर एक खासदार मनेका गांधींच्या पक्षात गेला. रतुभाई अदाणींच्या पक्षाचे बळ अजमावण्याची चांगली संधी पोरबंदर लोकसभा निवडणुकीत चालून आली; परंतु जनता पक्षाला मदतीला घेऊनही इंदिरा काँग्रेसच्या उमेदवाराने जनता राष्ट्रीय काँग्रेस उमेदवाराचा सहज पराभव केला आणि जनता राष्ट्रीय काँग्रेसला आपण भाजपपेक्षा जास्त मते मिळवली या गोष्टीवरच समाधान मानावे लागले. तेव्हा गुजराथेतही इंदिरा काँग्रेसला आव्हान देण्यासाठी युनायटेड फ्रंटला भाजप लोकदल आघाडीची मदत घ्यावीच लागेल.

आंध्रप्रदेशात मागे झालेल्या विधानसभा-निवडणुकात जनता पक्षाचा साफ धुव्वा उडाला. अविभक्त जनता पक्षाचे तो केंद्रात सत्तेवर असताना आंध्र विधानसभेत पन्नासच्यावर सभासद होते. मात्र आता आंध्र विधानसभेत जनता पक्षाचा एकच सभासद आहे. जनता पक्षातून फुटलेल्या भाजपचे चार तर लोकदलाचा एकही सभासद आंध्र विधानसभेत नाही. तेव्हा आंध्रप्रदेशात युनायटेड फ्रंट नगण्य आहे. जरी युनायटेड फ्रंटनेते तेलगुदेशमला आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करीत असले तरी निवडणुकांत एन. टी. रामाराव फ्रंटकरिता काही जागा सोडण्याची शक्यता कमी आहे.

ओरिसात बिजू पटनाईक यांनी मागे जनता पक्षात प्रवेश केल्याने तेथील पक्षाची ताकद वाढली आहे. बिजू पटनाईक हे माजी मुख्य-

मंत्री ओरिसामध्ये चांगलेच लोकप्रिय आहेत. शिवाय जनता पक्षाचा ग्रामीण विभागात जोर आहे. युनायटेड फ्रंटच्या इतर सहकाऱ्यांपैकी शरद पवारांच्या समाजवादी काँग्रेसचा काही भागात प्रभाव आहे. या राज्यात भाजप–लोकदल आघाडीचे विशेष काम नाही. मात्र बिजू पटनाइकांसारखा नेता जनताकडे असल्याने फ्रंट इंदिरा काँग्रेसवर बाजी उलटवू शकेल.

बंगाल आणि आसाम

केरळमध्ये जनता पक्ष आपले नाव टिकवून आहे. इंदिरा काँग्रेसला पाठिंबा देण्याच्या प्रश्नावरून मागे जनता पक्ष फुटल्याने त्यांची केरळातील ताकद कमी झाली आहे. शरद पवारांच्या काँग्रेसचा केरळात बराच जोर होता. मात्र त्यांचे नेते अँटोनी, चँडी, वायलर रवी हे इंदिरा काँग्रेसमध्ये गेल्याने आता समाजवादी काँग्रेसचा केरळात फारसा प्रभाव राहिलेला नाही. मात्र जनता व काँग्रेस (स) यांची आघाडी झाल्याने त्यांची कामगिरी बऱ्यापैकी होईल. बंगालमध्ये पूर्वीच्या संघटना काँग्रेसमुळे जनता पक्षाचा बराच प्रभाव होता. जनता पक्ष सत्तेवर असताना त्यांचे बरेच आमदार बंगाल विधानसभेत होते. मात्र मार्क्सवाद्यांशी त्यांनी फारकत घेतल्यावर जनता पक्षाची खरी ताकद उघडकीस आली व विधानसभेच्या निवडणुकीत त्यांचा धुव्वा उडाला. बंगालमध्ये जनता पक्षाजवळ पी. सी. सेन यांच्यासारखे नेते आहेत; परंतु ते इंदिरा काँग्रेसविरोधी पवित्रा घेण्यास फारसे उत्सुक नसतात. त्यांचा खरा विरोध मार्क्सवाद्यांना आहे. काँग्रेस समाजवादी पक्षाचे काम बंगालमध्ये चांगले होते; परंतु प्रियरंजनदास मुन्शींच्या इंदिरा काँग्रेसप्रवेशानंतर समाजवादी काँग्रेसची ताकद खच्ची झाली आहे. लोकशाही समाजवादी पक्षाचाही बंगालमध्ये काही भागात प्रभाव आहे. मात्र मार्क्सवादी, इंदिरा काँग्रेस यांच्या तुलनेत युनायटेड फ्रंटचा फारसा प्रभाव पडणार नाही व फक्त ते अस्तित्व दाखविण्याइतकेच कार्यरत रहातील.

आसाममध्ये समाजवाद्यांमुळे जनता पक्षाचा बराच प्रभाव आहे. त्याचप्रमाणे समाजवादी काँग्रेसचाही जोर आहे; परंतु काँग्रेस (स) च्या माजी मुख्यमंत्र्यांनी श्री. शरदचंद्र सिन्हांनी निवडणूक लढवून ते हरल्याने आसाममधील सर्वसाधारण जनता काँग्रेस (स) वर नाराज आहे. जनता पक्ष-राजवटीत, जनतापक्ष आसामात सत्तेवर होता तेव्हा जनता पक्षाचे मुख्यमंत्री गोलप बोरबोरा यांची कारकीर्द बऱ्यापैकी होती. मात्र राज्यात इंदिरा काँग्रेस व मार्क्सवाद्यांच्या जगता विरोधी राजकारणाला शह देण्यासाठी युनायटेड फ्रंटला भाजप–लोकदल आघाडीशी समझोता करावा लागेल. आसामातील दंगलींनंतर तेथे भाजपचा प्रभाव बराच वाढलाय. जम्मू–काश्मिर, दिल्ली, गोवा इत्यादि राज्यांत जनतापक्ष नगण्य आहे. नुकत्याच झालेल्या जम्मू–काश्मिर व दिल्लीतील निवडणुकांत जनता पक्षाचा दारुण पराभव झाला. तामिळनाडूत पूर्वीच्या संघटना काँग्रेसमुळे जनता पक्षाची नामोनिशाणी शिल्लक आहे. मात्र अण्णाद्रमुक, द्रमुक, इंदिरा काँग्रेस यांच्यासमोर जनताचा तेथे पाडाव लागत नाही. गांधी–कामराज पक्ष जरी तेथे जनतात सामील होत असला तरी जनता पक्षाच्या तेथील सामर्थ्यात फारशी वाढ होणार नाही.

वरील सर्व विवेचनावरून निरनिराळ्या राज्यांतील जनता पक्ष व त्यांच्या सहपक्षांची ताकद लक्षात घेतली तर युनायटेड फ्रंटचा आपणच इंदिरा काँग्रेसला पर्याय असल्याचा दावा किती हास्यास्पद आहे हे लक्षात येईल. **युनायटेड फ्रंटचे नेते आता कितीही आगपाखड करत असले तरी शेवटी त्यांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीशी तडजोड करावीच लागेल.** कारण जनता पक्षाने कितीही दावा केला तरी भाजप–लोकदल आघाडी युनायटेड फ्रंटपेक्षा बरीच मजबूत आहे. जनता पक्षव्यतिरिक्त बहुगुणा, शरद पवार व रतुभाई अदाणी यांचे पक्ष हे प्रादेशिक पक्ष आहेत. त्याकरिताच आपल्या सहपक्षांची ताकद ओळखूनच जनता पक्षाने आता शेकाप, अकाली दल, नॅशनल कॉन्फरन्स, द्रमुक, तेलगूदेशम इत्यादि प्रादेशिक पक्षांना आपल्या फ्रंटमध्ये आणण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. गंमतीची गोष्ट म्हणजे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला या सर्कशीची गरज भासली नाही यावरून या दोन आघाड्यांचे तौलनिक बळ लक्षात येईल. प्रादेशिक पक्षांबरोबरच मार्क्सवादी, जगजीवनराम, जनवादी इत्यादि पक्षांशीही जवळीक साधून पुन्हा मागचेच कडबोळे तयार होण्याची जास्त शक्यता आहे. भाजप–लोकदल आघाडीबद्दल, जातीयतावादी, प्रतिगामी अशी विशेषणे वापरून त्यांना वाळीत टाकण्याचे प्रयत्न युनायटेड फ्रंटने जरूर करावेत; पण लोकांना तेच पक्ष हवे आहेत याची त्यांनी दखल घ्यावी. भाजपला वाळीत टाकण्याची भाषा करणारे विरोधक आतून मात्र भाजपचा प्रभाव ओळखून त्याच्या पाठिंब्याची अपेक्षा करतात हा ताकाला जाऊन भांडे लपवण्याचा प्रकार आहे. ठाणे लोकसभा पोटनिवडणुकीत भाजप उमेदवाराला उघडउघड पाठिंबा देणाऱ्या व विधानसभेची एक पोटनिवडणूक भाजपच्या पाठिंब्यावर जिंकून घेणाऱ्या शरद पवारांना काही दिवसांनी भाजपपक्ष रा. स्व. संघाच्या संबंधामुळे जातीयतावादी व प्रतिगामी वाटतो हा एक विनोदच नाही का? या घरसोडवृत्तीने अशा नेत्यांबद्दल जनतेला विश्वास कसा वाटावा? कर्नाटकात सत्ता टिकवण्यासाठी चंद्रशेखरांना रा. स्व. संघवादी भाजपचा पाठिंबा चालतो; पण इतर राज्यांत त्यांना तो अस्पृश्य वाटतो. भाजप–लोकदलयुती त्यांना इंदिरा काँग्रेसपेक्षा भयानक वाटते. राजकारणी लोकांची विश्वासार्हता कमी होत चालल्याचीच ही लक्षणे नव्हेत का? बरे, ज्या मुस्लिमांची मते लाटण्यासाठी ते भाजपविरुद्ध गदारोळ करतात त्यांची एकगठ्ठा मते तरी त्यांना मिळतात का? आज जनता पक्षापेक्षा भारतीय जनता पक्ष मुस्लिमांत लोकप्रिय आहे. भाजपमध्ये आरीफ बेग, सिकंदर बख्त यांच्यासारखे मुस्लिमांत लोकप्रिय असलेले नेते आहेत. शिवाय हे नेते जनता पक्षाच्या खासदार शहाबुद्दीन, यांच्याप्रमाणे विषारी व जातीयतावादी विधाने करत नाहीत. मुस्लिमांचा पाठिंबा मिळवण्यासाठी शहाबुद्दीन, निहाल अहंमद यांच्याप्रमाणे ते मुस्लिम–प्रेमाचा खोटा पुळका आणत नाहीत. आपले मित्र कोण व शत्रु कोण याची पक्की जाणीव सुज्ञ मुस्लिम मतदारांना आहे. इंदिरा गांधी, जनता पक्ष, नॅशनल कॉन्फरन्स, बहुगुणा यांचा मुस्लिमांचा पाठिंबा मिळविण्याकरीता जो स्टंट चाललेला असतो, तो मुस्लिम मतदार पुरेपूर ओळखून आहेत. भाजप, रा. स्व. संघ यांच्याविरुद्ध मुस्लिमांना भडकवून त्यांची मते लाटण्याचे दिवस आता संपले आहेत. स्वतः इंदिरा गांधींना याची जाणीव आहे. म्हणून तर देशातील निरनिराळ्या जातीय दंगलीत रा. स्व. संघाला गोवण्याचे उद्योग त्यांनी आता थांबवलेले आहेत. जे इंदिरा गांधींना समजते ते विरोधी पक्षांना समजत नाही हीच तर खरी शोकांतिका आहे. ज्या आघाडीत भाजप–लोकदल हे पक्ष नाहीत ती आघाडी सत्तेवर येण्याची कल्पना स्वप्नातही करता येणार नाही. म्हणून आता जनता पक्ष व त्याच्या मित्रांनी आपल्या टीकेचा रोख राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे नव्हे तर इंदिरा काँग्रेसकडे वळवायला हवा. आपला शत्रु (प्रमुख शत्रु) इंदिरा काँग्रेस पक्ष की भाजप–लोकदल आघाडी याबाबत ठाम निर्णय युनायटेड फ्रंटने घ्यावयास हवा. कारण सध्याच्या त्यांच्या काही नेत्यांच्या बाष्कळ टीकेवरून त्यांच्या हल्ल्याचा रोख लक्षात येत नाहीये. □

मुदतपूर्व निवडणुकांचे वारे जोरात वाहू लागले आहेत. आपली निवडणूकपद्धती ब्रिटिश धर्तीची. कामकाज-व्यवस्थाही बरीचशी तशीच. त्यामुळे ब्रिटिश व भारतीय निवडणूकपद्धतीचा एक तौलनिक आढावा देणारा हा लेख.

निवडणूकपद्धती : ब्रिटिश - भारतीय

तुकाराम कोकजे

आपल्या संसदीय लोकशाहीची आखणी ब्रिटिश संसदीय लोकशाहीवरून करण्यात आली आहे. आपल्या संसदीय मंडळाचे कामकाज ब्रिटिश पार्लमेंटच्या धर्तीवरच चालते. ब्रिटिश पार्लमेंटच्या बहुतांश प्रथाही आपण उचलल्या आहेत. त्याचप्रमाणे आपल्या लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकाही ब्रिटनमधील निवडणुकांच्या धर्तीवरच होतात. ब्रिटनमध्ये त्यांच्या लोकसभेच्या (ब्रिटिश पार्लमेन्ट) निवडणुका नुकत्याच झाल्या. त्यात कॉन्झर्वेटिव पक्ष प्रचंड बहुमताने निवडून आला. १९७९ साली कॉन्झर्वेटिव पक्ष सत्तेवर आला. त्यानंतर १९८४ साली निवडणुका व्हावयाच्या होत्या; परंतु पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांनी एक वर्ष आधीच निवडणुका घेतल्या. आपल्याकडेही मुदतपूर्व निवडणुकांच्या वावडघा उठत आहेत.

ब्रिटिश पार्लमेंटच्या म्हणजे हाउस ऑफ कॉमन्सच्या निवडणुका दर पाच वर्षांनी व्हाव्या असा नियम आहे. आपल्याकडेही लोकसभा व राज्यांच्या विधानसभा यांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी घेण्याची तरतूद रिप्रेझेंटशन ऑफ पिपल्स ॲक्टमध्ये आहे. १९५२ मध्ये प्रथम आपल्याकडे निवडणुका झाल्या. १९६७ पर्यंत हे पाच वर्षांचे चक्र व्यवस्थित चालू होते. १९७१ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी एक वर्ष आधीच लोकसभा बरखास्त करण्याचा सल्ला राष्ट्रपतींना दिला व निवडणुका घेतल्या. त्यानंतर १९७६ साली पाच वर्ष पुरी झाली; परंतु आणीबाणी असल्याने इंदिरा गांधी यांनी लोकसभेची मुदत वाढवून घेतली व १९७७ मध्ये निवडणुका झाल्या. प्रथमच बिगरकाँग्रेस सरकार सत्तेवर आले. ते पुरी पाच वर्षे टिकू शकले नाही म्हणून १९८० मध्ये लोकसभेसाठी सार्वत्रिक निवडणूक झाली. परत काँग्रेस सरकार सत्तेवर आले. आता हे सरकार संपूर्ण काळ सत्तेवर राहते की मुदतपूर्व निवडणुका होतात हे पहावयाचे.

३८ वर्षात १२ निवडणुका

दुसरे महायुद्ध संपले आणि १९४५ मध्ये ब्रिटनमध्ये हाउस ऑफ कॉमन्ससाठी निवडणुका झाल्या. तेव्हापासून पाच वर्षांचे चक्र व्यवस्थित चालले असते तर १९८० साली आठवी सार्वत्रिक निवडणूक व्हावयास पाहिजे होती; परंतु १९७९ साली अकरावी सार्वत्रिक निवडणूक झाली. दुसरे महायुद्ध संपले आणि १९४५ साली झालेल्या निवडणुकीत मजूरपक्ष प्रचंड मताधिक्याने सत्तेवर आला. मजूर पक्षाने पाच वर्षे राज्य केले व १९५० च्या निवडणुकाही जिंकल्या; पण मताधिक्य फक्त १७ वर आले. त्यामुळे हे सरकार फक्त एक वर्ष टिकले व १९५१ मध्ये निवडणुका होऊन कॉन्झर्वेटिव आणि त्यांचे सहकारी २६ च्या मताधिक्याने सत्तेवर आले. त्या वेळी कॉन्झर्वेटिव व त्यांचे सहकारी पक्ष यांना ४८ टक्के मते पडली तर मजूर पक्षाला ४८.८ टक्के मते मिळाली. त्यानंतर चार चार वर्षांनी दोन निवडणुका झाल्या आणि कॉन्झर्वेटिव पक्षाने इतर पक्षांच्या साहाय्याने सत्ता टिकवून धरली. १९६४ साली. चौदा वर्षांनी – मजूरपक्ष पुन्हा सत्तेवर आला; पण मताधिक्य फक्त १४ चे मिळाले. म्हणून दोन वर्षांनी १९६६ साली जनतेकडे त्यांनी कौल मागितला. या वेळी मात्र ब्रिटिश मतदारांनी मजूरपक्षाला भरघोस पाठिंबा दिला. मजूरपक्षाला ३६३ तर कॉन्झर्वेटिव व त्यांच्या सहकाऱ्यांना २५३ जागा मिळाल्या. तरीही संपूर्ण ५ वर्षे ते सत्तेवर राहिले नाहीत. १९७० मध्ये निवडणुका घेण्यात आल्या व त्या कॉन्झर्वेटिव व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिंकल्या. मजूरपक्षापेक्षा त्यांना ४३ जागा जास्त मिळाल्या. १९७४ च्या फेब्रुवारीतील निवडणुक मजूरपक्षाने जिंकली; पण कॉन्झर्वेटिव पक्षापेक्षा फक्त ५ जागा जास्त जिंकून; त्यामुळे १९७४ च्या ऑक्टोबरमध्ये म्हणजे ८ महिन्यांनी पुन्हा निवडणुका घेण्यात आल्या. त्यात मजूरपक्षाचे बळ वाढले व कॉन्झर्वेटिवपेक्षा ४३ जागा जास्त मिळाल्या. या वेळी मात्र मजूर सरकारने ५ वर्षे संपूर्ण सत्ता उपभोगली व ७९ मध्ये निवडणुका झाल्या. त्या कॉन्झर्वेटिव पक्षाने जिंकल्या. मजूरपक्षापेक्षा ७१ जागा जास्त मिळवून या वेळी ब्रिटनचे पंतप्रधानपद प्रथमच महिलेकडे गेले. मार्गारेट थॅचर यांना अत्यंत कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागले; परंतु त्यातून त्यांनी ब्रिटिश राष्ट्राला सहीसलामत बाहेर काढले व मुदतपूर्व निवडणुका घेऊन प्रचंड विजय नुकताच मिळविला !

महिलांना मताचा हक्क

१९४५ ते १९८३ या अडतीस वर्षांत आठ वेळा निवडणुका व्हावयास पाहिजे होत्या, त्या बारा वेळा झाल्या आणि त्यात मजूर व कॉन्झर्वेटिव पक्ष आलटून-पालटून सत्तेवर आले. अशा या ब्रिटिश पार्लमेंटचा जन्म तेराव्या शतकात झाला; परंतु हाउस ऑफ कॉमन्स

प्रातिनिधिक झाली ती १८३२ साली. त्यापूर्वी मतदानाचा हक्क फक्त स्थावर मालमत्ताधारकांनाच होता. त्यामुळे मतदारांची संख्या अगदीच अल्प होती. १८३२ च्या कायद्याने स्थावर मालमत्ताधारकांखेरीज आणखीही काही व्यावसायिकांना मतदानाचा हक्क लाभला. म्हणून ब्रिटिश संसद जास्त प्रातिनिधिक झाली इतकेच. १८८४ च्या कायद्याने मात्र २१ वर्षांवरील सर्व प्रौढ पुरुषांना मतदानाचा हक्क लाभला; पण त्याचबरोबर जमीनदार, व्यापारी आणि पदवीधर यांना एकापेक्षा जास्त मतदानसंघात मतदान करण्याचा हक्क मिळाला. १९४९ मध्ये एक कायदा करून हा हक्क काढून घेण्यात आला. १९१८ पर्यंत स्त्रियांना मतदानाचा हक्कच नव्हता. तो १९१८ मध्ये मिळाला; पण ३० वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या महिलांना. त्यानंतर दहा वर्षांनी महिलांची ही वयोमर्यादा पुरुषांबरोबर २१ करण्यात आली आणि १९६९ साली १८ वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुष मतदार झाले.

आपल्याकडे १९५२ मध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या निवडणुका झाल्या तेव्हापासून सर्व स्त्री-पुरुष प्रौढांना–म्हणजे २१ वर्षे पूर्ण झालेल्यांना– मतदानाचा हक्क लाभला आहे. ही वयोमर्यादा १८ करावी अशी मागणी आहे; पण ती अद्याप मान्य झालेली नाही. ब्रिटिश संसदशाहीचा हळूहळू विकास झाला. आपणाला स्वातंत्र्य मिळाले व संसदीय लोकशाहीचा आपण मार्ग स्वीकारला तेव्हा आपणाला हा विकसित ढांचा मिळाला आणि तोच आपण स्वीकारला. फक्त भारतातील परिस्थितीनुसार त्यात काही मामुली बदल करण्यात आले आहेत. एक मोठे उदाहरण म्हणजे भारतात निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला एक निवडणूकचिन्ह निवडावे लागते. कारण इथली बहुतांश जनता अशिक्षित आहे. ब्रिटनमध्ये अशा निवडणूक-चिन्हांची गरजच भासत नाही.

आपल्याकडे लोकसभा किंवा ब्रिटनमधील हाउस ऑफ कॉमन्सची सर्वसाधारणपणे मुदत पाच वर्षांची आहे. म्हणजेच दर पाच वर्षांनी सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची; परंतु मुदत संपण्यापूर्वीच लोकसभा किंवा हाउस ऑफ कॉमन्स बरखास्त करता येते. गेल्या ३८ वर्षांत ब्रिटनमध्ये नऊ वेळा हाउस ऑफ कॉमन्स बरखास्त करून मुदतपूर्व निवडणुका झाल्या. भारतात तीस वर्षांत असा प्रसंग दोनदा आला– १९७१ व १९८० साली. भारतात १९७६ साली लोकसभेची मुदत एक वर्षाने वाढविण्यात आली ! इंग्लंडमध्ये मुदत वाढविण्याचा प्रसंग एकदाही आलेला नाही. १९७६ मध्ये भारतात आणीबाणी होती त्या वेळी लोकसभेची मुदत एक वर्षाने वाढविण्याचा ठराव लोकसभेत मंजूर झाला आणि हा ठराव मंजूर झाला तेव्हा विरोधी पक्षाचे अनेक सदस्य तुरुंगात होते, त्यामुळे ठरावावर मतदान झाले तेव्हा ते लोकसभेत हजर नव्हते.

सतरा दिवसांत निवडणुका

पार्लमेंट म्हणजेच हाउस ऑफ कॉमन्स बरखास्त करण्याचे व नव्या निवडणुका घेण्याचे शाही फर्मान निघाल्यापासून सतरा दिवसांनी (अर्थात रविवार व इतर सुट्या सोडून) मतदानाचा दिवस येतो. आपल्याकडे निवडणुकीची घोषणा झाल्यापासून ४२ दिवसांनी मतदानाचा दिवस असतो. उमेदवारी मागे घेण्याचा दिवस आणि प्रत्यक्ष मतदानाचा दिवस यात ३० दिवसांचे अंतर असावे लागते. त्याचप्रमाणे निवडणुकीची घोषणा झाल्यापासून सातव्या दिवसापर्यंत उमेदवारी–अर्ज स्वीकारण्यात येतात. ब्रिटनमध्ये उमेदवारी–अर्ज स्वीकारण्याच्या शवटच्या दिवसापासून नवव्या दिवशी मतदान घ्यावे लागते. आपल्याकडे उमेदवाराला प्रचारासाठी ३० ते ३५ दिवस मिळतात तर ब्रिटनमध्ये त्याच्या निम्म्यानेही मिळत नाहीत.

निवडणूक जाहीर झाली की, सार्वजनिक इमारतींवर व जाहिरातीच्या फलकांवर पत्रके लावून मतदानाची तारीख जाहीर करण्याची ब्रिटनमध्ये पद्धत आहे. अर्थात याबाबतची वृत्तेही वृत्तपत्रे, नभोवाणी व दूरदर्शनवर येतात त्यातूनही मतदारांना माहीत होते. शिवाय प्रत्येक मतदाराला निवडणूकयंत्रणेतर्फे एक कार्ड जाते. त्यावर मतदाराचे नाव, पत्ता व नंबर, मतदानकेंद्र व वेळ आदि माहिती दिलेली असते. आपल्याकडे अशा प्रकारचे कार्ड निवडणूकयंत्रणेतर्फे येत नाही; परंतु प्रत्येक उमेदवार ही माहिती देणारे कार्ड मतदाराकडे पाठवितो. एखाद्या मतदारसंघात दहा उमेदवार असले तर निदान सहा–सात कार्डे तरी मतदाराकडे येतात. त्या प्रत्येकावर मतदाराचे नाव, पत्ता, क्रमांक व मतदानकेंद्राचा पत्ता आदि माहिती दिलेली असते. वर उमेदवाराचे नाव व निशाणी छापलेली असते. उमेदवाराच्या प्रचाराचा एक भाग म्हणून हे कार्ड पाठविले जाते. एक कार्ड छापून वाटायला किमान ५० पैसे तरी खर्च येतो. लोकसभेच्या एका मतदारसंघात साधारणपणे ६–७ लाख मतदार असतात. तेव्हा या कार्डांचाच खर्च तीन-साडेतीन लाख रुपये होतो. एका मतदारसंघातील पाच उमेदवारांनी अशी कार्डे पाठविली तर १५ ते १७ लाख रुपये खर्च होतो. शासनानेच जर ही व्यवस्था केली तर व तो खर्च उमेदवारांवर वाटला तरी १०-१२ लाख रुपये वाचतील आणि सबंध देशातून ५०–६० कोटी रुपयांची बचत होईल. पुनरावृत्ती टळेल. ही कार्डे म्हणजे अनावश्यक खर्चच आहे.

निवडणूकखर्चावर बंधन

निवडणूकखर्चावर खरे म्हणजे फार कडक बंधन आहे. १९५१ साली रिप्रेझेंटेशन ऑफ पिपल्स ॲक्ट मंजूर झाला व त्याखाली निवडणुकीचे नियमही करण्यात आले. त्यानुसार लोकसभेसाठी उमेदवाराने करावयाच्या खर्चावर मर्यादा घालण्यात आली. ३५००० रुपयांची ही मर्यादा होती. मणिपूर, मेघालय व तामिळनाडूत ही मर्यादा रु. १७५००।– होती. अरुणाचल व नागालँडमध्ये १५०००।– तर केंद्रशासित प्रदेशात १२५००।– दिल्ली-चंदिगड १००००।– आणि दादरा–नगरहवेली ६०००।– अशी मर्यादा होती. जम्मू–काश्मिरमध्ये २५००० ची मर्यादा होती. १९८० च्या निवडणुकीच्या वेळी ३५ हजारांची मर्यादा १ लाखपर्यंत वाढविण्यात आली. उमेदवाराला मतदानाच्या दिवसापासून एक महिन्यात निवडणुकीसाठी केलेल्या खर्चाचा तपशील निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करावा लागतो. तो वेळेवर सादर न केल्यास वा खोटा तपशील दिल्यास उमेदवाराविरुद्ध कारवाई होऊ शकते किंवा तो निवडणुकीस अपात्र ठरविण्यात येतो.

लोकसभेची निवडणूक १ लाख रुपयांच्या खर्चात आटपते का ?

भित्तीपत्रके, कापडी फलक, प्रचारसभा, प्रचारघोषणांसाठी ध्वनिक्षेपक, मतदारांसाठी छापील निवडणूक-जाहीरनामा व इतर पत्रके निवडणूककचेऱ्या, चहापाणी, मतदानाच्या दिवशी मतदानकेंद्रावर काम करणाऱ्या उमेदवाराच्या प्रतिनिधींचा नाश्ता-चहाचा खर्च व मतदारांना पाठविण्यात येणारी कार्डे, याखेरीज गाडचा व पेट्रोल इतका खर्च उमेदवाराला करावा लागतो. निव्वळ कार्डांवरच तीन-साडेतीन लाख रुपये खर्च होतो. मग उमेदवार इतका सर्व खर्च १ लाख रुपयात बसवून खर्चाचे निवेदन कसे सादर करतात असा प्रश्न पडतो. यावर सर्व उमेदवारांनी उपाय शोधून काढला आहे. १ लाखाच्या वर होणारा खर्च हा इतरांनी केला असे दाखविण्यात येते. त्यासाठी उमेदवार मित्रमंडळे, XYZ for Parliament committee अशी मंडळे व समित्या स्थापन करण्यात येतात व त्यांच्यातर्फे विविध खर्च करण्यात येतो. सदर खर्च अर्थातच उमेदवाराच्या खर्चाच्या निवेदनात येत नाही, अशी कायद्याची पळवाट आपल्याकडे आहे. त्याचा फायदा अनेक उमेदवार घेतात आणि लाखो रुपये खर्च करतात. फक्त तो खर्च समित्या व मंडळांतर्फे केला असे दाखविण्यात येते. ब्रिटिश कायद्याने अशी पळवाट ठेवलेली नाही.

निवडणूक-खर्चाबाबतचे ब्रिटिश कायदे फार कडक आहेत व त्यांचे पालन फार काटेकोरपणे केले जाते. या कायद्याचा भंग करणारास कडक शासन करण्याची तरतूद कायद्यात आहे. निवडून आलेल्या खासदाराची निवडणूकही रद्द होऊ शकते. बरो व कौन्टी असे दोन प्रकारचे मतदारसंघ असतात. नागरी व अनागरी असे म्हणता येईल. बरो मतदारसंघात प्रत्येक उमेदवार २७०० पौंड अधिक प्रत्येक मतदारामागे २.३ पेन्स खर्च करू शकतो, तर कौन्टीमध्ये २७०० पौंड अधिक प्रत्येक मतदारामागे ३.१ पेन्स खर्चण्यास परवानगी आहे. साधारणपणे ६०-७० हजार मतदारांचा एक मतदारसंघ असतो. कौन्टीमध्ये प्रत्येक मतदारामागे ३.१ पेन्स म्हणजे ७० हजार मतदारांसाठी २१७० पौंड अधिक २७०० मिळून ४८७० पौंड खर्च करता येतात. रुपयात जर हिशेब केला तर तो दोन लाख रुपयांच्या वर जातो.

सहा-सात लाख मतदारांसाठी आपल्याकडे उमेदवार १ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च करू शकत नाही. इंग्लंडमधील उमेदवार त्याच्या एकदशांश मतदारांसाठी दुपटीपेक्षा जास्त खर्च करू शकतो. याखेरीज ब्रिटिश उमेदवाराला इतर अनेक सवलती मिळतात. उमेदवार आपले आवाहन प्रत्येक मतदाराला पोस्टाने विनामूल्य पाठवू शकतो. अर्थात त्याचे वजन ५७ ग्रॅमपेक्षा जास्त असता कामा नये. जाहीर सभांसाठी उमेदवाराला शाळा व इतर जाहीर सभागृहे विनामूल्य उपलब्ध होतात. फक्त वीजबत्तीचा खर्च करावा लागतो. (उत्तर आयर्लंडमध्ये मात्र ही सवलत मिळत नाही.)

ब्रिटनमध्ये कडक निर्बंध

निवडणुकीचा खर्च उमेदवाराने किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीनेच केला पाहिजे असा दंडक ब्रिटनमध्ये आहे. याचाच अर्थ मित्रमंडळे व समित्या स्थापून त्यांच्यामार्फत खर्च करता येणार नाही उमेदवाराचा व्यक्तिशः खर्च सोडून इतर सर्व निवडणूकखर्च मर्यादेत बसला पाहिजे. पक्षाने निवडणूकप्रचारासाठी केलेला खर्च उमेदवाराच्या खर्चात धरला जात नाही. उमेदवार आपल्या प्रचारासाठी कितीही प्रचारसभा घेऊ शकतो व त्यात कोणालाही भाषणास बोलावू शकतो. सभा उघड्यावर वा बंदिस्त सभागृहात कोठेही घेता येते. फक्त ती कोणत्याही प्रकारचा गोंधळ-गडबड न करता शांतपणे पार पाडली पाहिजे. पत्रके वाटून व भित्तीपत्रके लावून प्रचार करता येतो. (भिंती रंगविण्याचा प्रकार मात्र दिसत नाही.) उमेदवार अगर त्याच्या अधिकृत व्यक्तीखेरीज इतर कोणीही प्रचारसाहित्य छापणे हा गुन्हा आहे. प्रत्येक प्रचारसाहित्यावर मुद्रक व प्रकाशकाचे नाव छापावे लागते. भित्तीपत्रके लावण्याचे काम अधिकृत व्यक्तीसच द्यावे लागते. खाजगीरीत्या पैसे देऊन हे काम करून घेता येत नाही. वृत्तपत्रांमध्ये जाहिराती छापून प्रचार करता येतो; पण त्या जाहिराती अधिकृत कंपन्यांमार्फतच पाठविल्या पाहिजेत आणि हा सर्व खर्च उमेदवाराला आपल्या खर्चाच्या तपशिलात दाखवावा लागतो. अधिकृत व्यक्तींकडे ही कामे देण्याचा हेतू हाच की, खर्चाचे तपशील खोटे दाखविण्यास संधी मिळू नये. अधिकृत कंपन्या व एजन्सीच खोटी बिले देणार नाहीत.

प्रचारसाहित्यावर मुद्रक-प्रकाशकाचे नाव छापले पाहिजे असा आपल्याकडेही नियम आहे; पण त्यातून पळवाट काढण्यात आली आहे. प्रकाशक म्हणून मंडळे व समित्यांच्या पदाधिकाऱ्यांची नावे टाकण्यात येतात व उमेदवाराशी त्यांचा संबंध नाही असे भासविण्यात येते. त्यामुळे खर्चाच्या तपशिलात हा खर्च दाखविण्याची गरज भासत नाही. या सर्व गैरप्रकारांमुळे खर्चावर आळा घालण्याचा मूळ हेतू आपल्याकडे साध्यच होत नाही. उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाचे निवेदन कोणासही एक रुपया फी भरून पाहण्यास मिळते; परंतु खर्चाचे निवेदन अशा प्रकारे तयार करण्यात येते की, त्यातून कायद्याचे उल्लंघन केल्याचे कुठेच आढळत नाही. उमेदवार व त्याचे अधिकृत प्रतिनिधी आपले सर्व कौशल्य इथेच पणाला लावतात व लोकशाहीतील आपली सेवा खोटेपणाचा ओनामा करून सुरू करतात.

ब्रिटनमधील प्रचारमोहीम

प्रचारमोहीम राष्ट्रीय व स्थानिक स्तरावर संघटित करण्यात येते. राष्ट्रीय पक्ष वार्ताहरांना मुलाखती देऊन आपले धोरण विशद करतात, भूमिका स्पष्ट करतात. त्याची वृत्ते वृत्तपत्रे, नभोवाणी व दूरदर्शनवरून प्रसारित होतात. राष्ट्रीय नेते देशभर दौरे करून जाहीर भाषणे करतात, त्याचीही वृत्ते प्रसिद्ध होतातच. विविध पक्षांच्या नेत्यांच्या नभोवाणी व दूरदर्शनवर मुलाखती होतात. शिवाय प्रचारमोहिमेची अनेक दृश्ये दूरदर्शनवर दाखविली जातात. दूरदर्शन व नभोवाणी ही माध्यमे सार्वजनिक संस्थांकडे आहेत. ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन व इंडिपेंडंट ब्रॉडकास्टिंग ॲथॉरिटी. निवडणुकींचे कार्यक्रम एकाच वेळी सर्व चॅनल्सवरून दाखविले जातात. प्रत्येक पक्षाला ते किती जागा लढवीत आहेत व बरखास्त सभागृहात त्यांच्या किती जागा होत्या त्या प्रमाणात त्यांना वेळ देण्यात येतो. याबाबतचे निर्णय घेण्यासाठी एक समिती नेमलेली असते. त्यात राजकीय पक्ष, बी. बी. सी. व आय. बी. ए. यांचे प्रतिनिधी असतात. नभोवाणी व दूरदर्शनवर पैसे देऊन जाहिरातीच्या माध्यमातून प्रचार

करण्यास बंदी आहे. आपल्याकडेही सर्वसाधारणपणे याच पद्धतीने प्रचार होतो. फरक इतकाच की, इंग्लंडमधील निवडणूक शांतपणे पार पडते तर आपल्याकडे या काळात प्रतिस्पर्धी उमेदवारांचे पाठीराखे एकमेकांची डोकी फोडतात, सभा उधळतात व सार्वजनिक शांततेचा भंग करतात. इतकेच नाही तर समोरासमोर ध्वनिक्षेपक लावून रात्रंदिवस घोषणांचे तुंबळ युद्ध सुरू करून मतदारांचे डोके उठवतात. प्रचाराचे ते ३०–३५ दिवस नको ती निवडणूक असे सामान्य माणसाला होऊन जाते.

उमेदवारीचे नियम

इंग्लंडमध्ये ज्या नागरिकाला १८ वर्षे पूर्ण झाली आहेत त्याला जरी मतदानाचा हक्क असला तरी २१ वर्षे वय पूर्ण झाल्याखेरीज हाउस ऑफ कॉमन्सच्या निवडणुकीला उमेदवारी अर्ज भरता येत नाही. आपल्याकडे मतदानाचा हक्क २१ वर्षानंतर मिळतो व लोकसभेची निवडणूक लढवायची असेल तर किमान २५ वर्षे वय असावे लागते. राज्यसभेच्या उमेदवारीसाठी तर ३० वर्षांची वयोमर्यादा आहे. इंग्लंडमध्ये उमरावसभेचे (हाउस ऑफ लॉर्डस्) सदस्य, दिवाळे काढलेल्या व्यक्ती, एक वर्षापेक्षा जास्त तुरुंगवास भोगलेले कैदी, इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड व रोमन कॅथलिक चर्चचे धर्मगुरु, न्यायसंस्थेचे सदस्य व (न्यायाधीश वगैरे), मुलकी नोकर, स्थानिक संस्थांचे नोकर, पोलीस व लष्करी दलातील लोक, सरकारी आयोग, सार्वजनिक महामंडळे व निगममधील सेवक यांना हाउस ऑफ कॉमन्सची निवडणूक लढविता येत नाही. आपल्याकडेही वरीलप्रमाणेच बंधने आहेत. फक्त त्यात राज्यसभेच्या सदस्यांचा समावेश नाही. राज्यसभेच्या सदस्याला लोकसभेची निवडणूक लढविता येते. निवडून आल्यास त्याने कोणत्याही एका सभागृहाचे सदस्यत्व ठेवून दुसरीकडे राजिनामा दिला पाहिजे. एकाच वेळी तो दोन सदनांचा सदस्य राहू शकत नाही इतकेच. सर्वसाधारणपणे लोकसभेत निवडून आलेला सदस्य राज्यसभेचा राजिनामा देतो. निवडून न आल्यास प्रश्नच नाही. राज्यसभेचे सदस्यत्व चालू राहते.

इंग्लंडमध्ये उमेदवारी-अर्जावर सूचक व अनुमोदक म्हणून दोन मतदारांच्या व सदर उमेदवारीला पाठिंबा देणाऱ्या आणखी आठ मतदारांच्या सह्या लागतात. आपल्याकडे पूर्वी सूचक व अनुमोदक म्हणून दोन मतदारांच्या सह्या लागत. आता एका मतदाराची सूचक म्हणून सही पुरते. उमेदवार हा ज्या मतदारसंघात निवडणूक लढविणार असतो तिथलाच मतदार असला पाहिजे असे नाही; परंतु सूचक–अनुमोदक मात्र त्याच मतदारसंघातील असावे लागतात. इंग्लंडमध्ये उमेदवाराला उमेदवारी-अर्जासोबत १५० पौंड (जवळजवळ २४०० रु.) अनामत रक्कम भरावी लागते. एकूण मतदानाच्या आठव्या हिश्श्यापेक्षा कमी मते पडली तर अनामत रक्कम जप्त होते. आपल्याकडे उमेदवारी-अर्जासोबत ५०० रुपये अनामत रक्कम भरावी लागते. हरिजन-गिरिजन उमेदवारांना फक्त २५० रु. अनामत रक्कम भरावी लागते. एक उमेदवार जास्तीत जास्त चार उमेदवारी-अर्ज भरू शकतो; परंतु अनामत रक्कम मात्र एकाच अर्जाची भरावयाची असते. उमेदवार आपला एक निवडणूकप्रतिनिधी (इलेक्शन एजंट) नेमू शकतो. उमेदवाराइतकेच जवळजवळ अधिकार त्याला असतात. त्यामुळे ज्याला निवडणूक लढविण्याचा अधिकार नाही त्याला प्रतिनिधी नेमता येत नाही.

राष्ट्रीय पक्ष विविध मतदारसंघात आपल्याला मान्य असलेल्या उमेदवारांची यादी पक्षशाखांना पाठवितात. त्या यादीतून स्थानिक पक्ष शाखाउमेदवार निवडतात; परंतु त्या यादीतील उमेदवार त्यांना पसंत नसेल तर त्याव्यतिरिक्त दुसरा उमेदवारही ते निवडू शकतात; पण नंतर केंद्रीय समितीची त्याला मान्यता घ्यावी लागते. आपल्याकडे पक्षाच्या राज्यशाखा आपल्या भागातील उमेदवारांची यादी तयार करून केन्द्रीय समितीला सादर करते. केंद्रीय समिती वाटल्यास त्यात फेरफार करून अंतिम यादी राज्याकडे पाठविते व ते पक्षाचे अधिकृत उमेदवार धरले जातात.

मतदानाचा अधिकार नाही

इंग्लंडमध्ये १८ वर्षांवरील प्रत्येक नागरिकास मतदानाचा हक्क असला तरी उमरावसभेच्या सदस्यांना मतदानाचा अधिकार नाही. पिअर्स, पिररेसेस् व धर्मगुरु उमरावसभेचे सदस्य आहेत. उमरावसभेच्या पिअर्स व पिअरेसेस्ना मतदानाचा अधिकार नाही; परंतु उमरावसभेचे सदस्य असलेल्या २२ धर्मगुरूंना (आर्चबिशप्स) अधिकार आहे की नाही हा वादाचा मुद्दा झाला आहे. कॅन्टरबरीचे आर्चबिशप रेव्ह. रॉबर्ट रुन्सी यांनी हा वाद निर्माण केला आहे. ते उमरावसभेचे सदस्य आहेत. तरी त्यांनी नुकत्याच झालेल्या निवडणुकीत मतदान केले. बिशपला जर मतदानाचा हक्क आहे तर आपल्याला का नाही असा त्यांचा दावा आहे. त्यांचे म्हणणे, " आपण उमरावसभेचे सदस्य असलो तरी पिअर नाही, म्हणून आपणाला मतदानाचा हक्क आहे. " कायद्यात आर्चबिशपना मतदानाचा हक्क नाही असे म्हटलेले नाही. आता न्यायालयाला यावर निर्णय द्यावा लागेल. आपल्याकडे राज्यसभेच्या सदस्यांचा मतदानाचा हक्क काढून घेतलेला नाही. किंबहुना ते मतदार असल्याशिवाय राज्यसभेची निवडणूक लढवू शकत नाहीत. याखेरीज मनोरुग्ण, शिक्षा झालेले व तुरुंगात असलेले कैदी, लाचलुचपत व अवैध मार्ग अवलंबिल्याच्या आरोपावरून निवडणूक लढविण्यास अपात्र ठरलेले माजी उमेदवार अशांना मतदानाचा हक्क नाही.

मतदारसंघात फेरफार

मतदारसंघांची फेररचना १० वर्षांनंतर व १५ वर्षांच्या आत एकदा होते. त्यासाठी इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स व उत्तर आयर्लंड अशा चार विभागांसाठी चार आयोग नेमले जातात. हाउस ऑफ कॉमन्सचे सभापती हे आयोगाचे नामधारी अध्यक्ष असतात. हायकोर्टाचे न्यायमूर्ती उपाध्यक्ष असतात. (स्कॉटलंडमध्ये सेशन्स कोर्टाचे न्यायमूर्ती). याखेरीज सरकार दोन सदस्य नियुक्त करते. ही नियुक्ती इतर पक्षांशी विचारविनिमय करून होते. अर्थात सभापतिखेरीज इतर कोणीही खासदार आयोगाचा सदस्य असत नाही. आयोगाला सल्ला देण्यासाठी इंग्लंड व वेल्सचे रजिस्ट्रार जनरल; स्कॉटलंडमध्ये जन्ममृत्यू व विवाहनोंदणीखात्याचे रजिस्ट्रर जनरल; उत्तर आयर्लंडमध्ये मुख्य निवडणूक-अधिकारी; जन्म, मृत्यू व विवाहनोंदणीखात्याचे रजिस्ट्रार जनरल व कमिशनर ऑफ व्हॅल्युएशन हे ॲसेसर्स

असतात. १९८२ मध्ये मतदारसंघांची फेरआखणी झाली त्यानुसार इंग्लंडमध्ये साधारणपणे ६८ हजार मतदारांचा एक मतदारसंघ झाला. स्कॉटलंडमध्ये ५५ हजार, वेल्समध्ये ६० हजार तर उत्तर आयर्लंडमध्ये ८८ हजार मतदारसंघांचा एक मतदारसंघ झाला. १९४५ च्या निवडणुकीच्या वेळी हाउस ऑफ कॉमन्सची सदस्यसंख्या ६४० होती ती १९५० मध्ये १५ ने कमी होऊन ६२५ झाली. १९५५ मध्ये ती ६३० झाली. १९७४ मध्ये ६३५ व १९३८ च्या निवडणुकीच्या वेळी ६५० झाली. १९७८ च्या निवडणुकीच्या वेळी या ६३५ जागा चार विभागात पुढीलप्रमाणे वाटण्यात आल्या होत्या- उत्तर आयर्लंड १२, स्कॉटलंड ७१, वेल्स ३६ व इंग्लंड ५१६.

आपल्याकडे मतदारसंघांची फेररचना करण्यासाठी दर दहा वर्षांनी एक आयोग नेमण्यात येतो व त्यासाठी आधीच्या जनगणनेची आकडेवारी विचारात घेतली जाते. उच्च न्यायालय वा सर्वोच्च न्यायालाचे दोन न्यायमूर्ती व मुख्य निवडणूक आयुक्त असे तिघे व ज्या राज्यात आयोगाचे काम सुरू होईल त्या राज्यातील ५ खासदार व ५ आमदार (हे दहा सदस्य प्रत्येक राज्यात बदलतात) असा तेरा सदस्यांचा आयोग असतो. त्यांच्या मदतीला शासकीय अधिकारी असतात. आपल्याकडील आयोगाला हरिजन व गिरिजन यांच्यासाठी राखीव जागाही ठरवाव्या लागतात. इ. स. २००० नंतर मतदार-संघाची फेररचना होणार नाही.

आपल्याकडे मतदारांच्या याद्या सार्वत्रिक निवडणुकीच्या आधी तपासून नव्या केल्या जातात. ब्रिटनमध्ये हे काम दर वर्षी होते. इंग्लंड, स्कॉटलंड व वेल्समध्ये १० ऑक्टोबरला ज्या मतदारसंघात तुम्ही कायम रहात असाल त्या मतदारसंघात तुमचे नाव मतदार म्हणून नोंदले जाते.उत्तर आयर्लंडमध्ये त्यासाठी १५ सप्टेंबर हा दिवस ठरला आहे. दरवर्षी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या युवक व युवतींची नावे मतदारांच्या यादीत समाविष्ट केली जातात. दरवर्षी १५ फेब्रुवारीला मतदारांची अंतिम यादी प्रकाशित होते. त्यामुळे केव्हाही निवडणुका घेतल्या तरी मतदारांची अद्ययावत यादी तयार मिळते.

गुप्त पद्धतीने मतदान

मतदानाच्या दिवशी सर्व मतदारांनी मतदानकेंद्रावर जाऊन गुप्त मतदानपद्धतीने मतदान करावयाचे असते. याबाबतचा कायदा १८७२ साली मंजूर झाला; परंतु परदेशात पाठविलेले सरकारी नोकर व लष्करातील व्यक्ती तसेच ब्रिटिश कौन्सिलचे परदेशात असलेले नोकर (अर्थात ब्रिटिश नागरिक असल्यास) व त्यांच्या पत्नी यांना आपली मते पोस्टाने पाठविता येतात. असे सुमारे अडीच लाख मतदार आहेत. जे मतदार व्यापारउद्योगाच्या निमित्ताने परदेशात गेले असतील व मतदानाच्या दिवशी हजर राहू शकणार नाहीत त्यांना प्रॉक्सी पद्धतीने मतदान करता येते. अर्थात सुटीनिमित्त परदेशात गेले त्यांना मात्र ही सवलत उपलब्ध नाही. भारतातही अशी सवलत नाही. सरकारी नोकरांना मात्र ते कामानिमित्त इतरत्र कुठे असल्यास पोस्टाने मतदान करता येते. ब्रिटनमध्ये बहुतांश मतदान-केंद्रे शाळांतूनच असतात. उमेदवाराच्या नावाखाली त्याचा राजकीय पक्ष व व्यवसाय लिहिलेला असतो. अशिक्षित किंवा अपंग मतदाराला निवडणूक-अधिकाऱ्याने मदत करावयाची असते. अंधाला मात्र त्याच्याबरोबर असलेल्याने मदत करावयाची असते. मतदानाची वेळ सकाळी ७ ते रात्री १० अशी असते. आपल्याकडे सकाळी ८ ते सायं-काळी ५ अशी असते.

निवडणूक–कायद्याचे पालन ही जबाबदारी होम ऑफिस (इंग्लंड व वेल्समध्ये) स्कॉटिश होम व हेल्थ विभाग व नॉर्थर्न आयर्लंड ऑफिस यांची असते; परंतु प्रत्यक्ष निवडणुकांची जबाबदारी कौन्टीचे शेरीफ, लंडन बरोचे महापौर व डिस्ट्रिक्ट कौन्सिलचे चेअरमन यांच्यावर असते. ते ॲक्टिंग रिटर्निंग ऑफिसर नेमून त्यांच्यावर काम सोपवितात. ते आणखी सहाय्यक नेमून हे काम पार पाडतात. मतदानकेंद्रावर काम करण्यासाठी व मतमोजणीसाठी स्थानिक स्वराज्यसंस्थांचा नोकरवर्ग व शिक्षकांची मदत घेतली जाते. आपल्याकडे चीफ इलेक्शन-कमिशनर (मुख्य निवडणूक आयुक्त) यांच्या अखत्यारीत संपूर्ण निवडणूकयंत्रणा असते. उपआयुक्त, विभागीय आयुक्त रिटर्निंग ऑफिसर, प्रिसाइडिंग ऑफिसर, पोलिंग-ऑफिसर अशा विविध नेमणुका करून ही कामे पार पाडली जातात. केंद्र व राज्यशासनाचा नोकरवर्ग, स्थानिक स्वराज्यसंस्थांचा सेवक-वर्ग व पालिका व जिल्हा परिषदांच्या शाळेतील शिक्षकांची मदत घेतली जाते.

एकाच व्यक्तीकडे आजन्म सभापतीपद

ब्रिटिश निवडणुकीची पद्धत आणि आपली निवडणूकपद्धत यात फार मोठा फरक नाही. ब्रिटिश संसदीय पद्धतीचे आणखी एक वैशिष्ट्य हे की, ज्याच्याकडे आपण संपूर्ण पाठ फिरवली आहे आणि ते म्हणजे सभापतिपद. हाउस ऑफ कॉमन्सच्या सभापतिपदी एकदा निवड झाली की, तो आजन्म किंवा संसद जीवनातून निवृत्त होई-पर्यंत सभापतिपदी राहतो दर वेळी त्याला सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहून निवडून यावे लागते व नव्या हाउस ऑफ कॉमन्समध्ये सभापतिपदीही परत निवडून यावे लागते; पण त्याच्याबाबत हा एक उपचारच ठरतो. सभापतिपदी निवडून आल्या-बरोबर तो पक्षाशी असलेले आपले संबंध तोडून टाकतो व निवडणूक लढवितो तो अपक्ष उमेदवार म्हणून. पक्षही त्याच्याविरुद्ध उमेदवार उभा करीत नाही. त्यामुळे त्याची निवड निश्चित होते. नंतर कोण-त्याही पक्षाला बहुमत मिळो त्याचे नाव सभापतिपदासाठी सुचविले जाते व तो निवडूनही येतो. एखादा सभापती संसद-जीवनातून निवृत्त झाला वा निधन पावला तरच सभापतिपदाची खरी निवड-णूक होते व बहुमतवाला पक्ष आपला उमेदवार उभा करतो व तो निवडून येतो; पण निवडून आल्याबरोबर तो पहिली कोणती गोष्ट करीत असेल तर जो पक्ष त्याला निवडून देतो त्या पक्षाशी असलेले संबंध तोडून टाकणे. याला कायद्याचे बंधन कोणतेही नाही; पण प्रथा आहे व ब्रिटिश संसदपटू ते कसोशीने पाळतात.

आपल्याकडे या प्रथेबाबत अनेक वेळा चर्चा झाली; परंतु त्यापेक्षा जास्त प्रगती नाही. ज्याला मंत्रिमंडळात स्थान द्यावयाचे नाही अशाची वर्णी या पदावर लावण्याची सर्वसाधारण प्रथा आहे. प्रत्येक निवड-णुकीच्या वेळी त्याला पक्षाकडे तिकिट मागायला जावे लागते. निव-डून आल्यानंतर सभापतिपद त्यालाच दिले जाईल याची शाश्वती नाही. सभापतिपद सोडून मंत्रिपदही स्वीकारावे लागते व मंत्रिपद

काढून घेऊन सभापतिपद दिले जाते. त्यामुळे सभापतिपदी निवड झाल्यानंतर पक्षाशी संपूर्ण काडीमोड घेता येत नाही. आजकाल तर सभापतिपद भूषविणारे पक्षाच्या सभांनाही हजर राहू लागले आहेत. त्यामुळे सभापतीचा सत्ताधारी पक्षाकडे थोडा कल असण्याचा धोका आहे. सभापतिपदी एकदा निवडून आलेली व्यक्ती त्याची इच्छा असेपर्यंत त्या पदावर राहील अशी व्यवस्था होण्याची आवश्यकता आहे. सभापती चर्चेत भाग घेत नाही.

संसद काम संपूर्ण वेळाचे

ब्रिटिश पार्लमेंटची बैठक सोमवार ते शुक्रवार रोज भरते. पैकी सोमवार ते गुरुवार दुपारी २.३० ते रात्री १०.३० व शुक्रवारी सकाळी ९.३० ते दुपारी ३ अशी वेळ असते. अनेक वेळा रात्री १०.३० नंतरही बैठक चालू राहते. अर्थात सभागृहापुढे असलेल्या कामावर ते अवलंबून असते. मधून मधून चार-सहा आठवड्यांची सुट्टी असते. वर्षभरात १७५ ते २०० दिवस पार्लमेन्टची बैठक होते. याखेरीज विविध समित्यांच्या बैठका भरतात. त्या सुटीच्या काळातही भरतात. प्रत्येक सदस्य कोणत्या ना कोणत्या संसदीय समितीचा सदस्य असतो. त्यामुळे संसद-सदस्यत्व हे पूर्ण वेळाचेच काम झाले आहे. याचाच अर्थ संसद-सदस्य उपजीविकेसाठी दुसरा कोणताही व्यवसाय करू शकत नाही. त्याला चांगले जीवन जगता आले पाहिजे हे ध्यानात घेऊन ब्रिटनमधील संसद-सदस्यांचे वेतन व इतर सवलती ठरविण्यात आल्या आहेत.

खासदारांना वेतन व भत्ते

ब्रिटिश पार्लमेंटच्या सदस्याला वेतन देण्याची पद्धत १९११ मध्ये सुरू झाली. त्या वेळी वर्षाला ४०० पौंड वेतन प्रत्येक सदस्याला मिळू लागले. १९३७ मध्ये हे वेतन वाढवून ६०० पौंड करण्यात आले. त्यानंतर दहा वर्षांनी ते वार्षिक एक हजार पौंड करण्यात आले. १९५४ मध्ये वेतनात वाढ करण्यात आली नाही; परंतु दर बैठकीचा दोन पौंड भत्ता सुरू झाला. शुक्रवारी अर्धाच दिवस बैठक भरत असल्यामुळे त्या दिवसाचा भत्ता मिळत नसे. १९५७ मध्ये वार्षिक वेतन १७५० पौंड करण्यात आले. १९६४ मध्ये वेतन ३२५० पौंड करण्यात आले. १९७२ मध्ये ४५०० पौंडपर्यंत ते वाढविण्यात आले. याखेरीज हाउस ऑफ कॉमन्सच्या परिसरातून मोफत फोन, पोस्टेज व स्टेशनरी अशा सवलती सुरू झाल्या. राजधानीत राहणाऱ्या सदस्यांना २२८ पौंड, सबसिस्टन अलाबन्स १०५० पौंड, सचिवासाठी १७५० पौंड व मोटारभत्ता सुरू झाला. चार वर्षांची संसद-सदस्यत्वाची कारकीर्द झाली किंवा वयाला ६५ वर्षे झाली तर पेन्शन-योजना सुरू झाली.

डोक्याला उपजीविकेची विवंचना राहू नये, संसद–काम कार्यक्षमतेने करण्यास त्यांना अवसर मिळावा म्हणून १९८१ च्या जूनपासून वर्षाला १३१५० पौंड वेतन (रुपये २,१०,४०० फक्त) देण्यास सुरुवात झाली आहे. अर्थात यावर इतरांप्रमाणे आयकर भरावा लागतो. याखेरीज एक सचिव व एक संशोधक सहाय्यक यासाठी वर्षाला ८ हजार पौंड खर्च करता येतो. ती रक्कम परत मिळते. लंडनमधील सदस्यांना वर्षाला ५४६ पौंड जादा भत्ता मिळतो. लंडनबाहेरील सदस्यांना मुलकी नोकरांप्रमाणे घरापासून दूर राहिल्याचा जास्तीत जास्त ३८६६ पौंड भत्ता मिळतो. इतर सवलती पूर्वीप्रमाणेच.

पंतप्रधान, लॉर्ड चॅन्सेलर व कॅबिनेटदर्जाचे मंत्री यांना वर्षाला २६२५० पौंड (सुमारे रु. ४ लक्ष २० हजार) वेतन मिळते. कॅबिनेटदर्जा नसलेले परंतु स्वतंत्रपणे खाते संभाळणारे मंत्री व राज्यमंत्री यांना २१९०० पौंड (सुमारे ३ लक्ष ५० हजार ४०० रु.) संसदीय सचिव व अंडरसेक्रेटरीज ऑफ स्टेट १४२५० पौंड (सुमारे २ लक्ष २८ हजार रु.) वर्षाला वेतन असते. याखेरीज संसदीय सदस्य म्हणून वर्षाला ७६७० पौंड (सुमारे १ लक्ष २२ हजार रुपये) व इतर संसद–सदस्यांचे भत्ते मिळतात. अर्थात हे वेतन मतदारसंघातील कामाबद्दल असते. सभापतीला वर्षाला २७५०० पौंड (सुमारे ४ लक्ष ४० हजार रु.) वेतन अधिक ६९३० पौंड संसदीय-सदस्य-वेतन व वेस्टमिन्स्टर पॅलेसमध्ये निवास मिळतो. सभापतिपदावरून निवृत्त झाल्यावर त्याला पिअर करण्यात येते व पेन्शन देण्यात येते.

चेअरमन ऑफ वेज अँड मीन्स या पदावरील व्यक्तीला ६९३० पौंडाच्या संसदीय वेतनाखेरीज १६ हजार पौंड (सुमारे रु. २,५६०००) वार्षिक वेतन मिळते. याखेरीज एक–दोन डेप्युटी-चेअरमन असतात त्यांना संसदीय वेतनाखेरीज १४ हजार पौंड वार्षिक वेतन मिळते. यांची संसद–सदस्यांकडून निवड होते व ते उपसभापती म्हणून काम करतात. ते सभापतीप्रमाणे चर्चेत भाग घेत नाहीत किंवा मतदानही करीत नाहीत.

विरोधी पक्षनेत्याला वेतन

विरोधी पक्षांपैकी सर्वांत मोठ्या पक्षाला प्रमुख विरोधी पक्षाचा मान मिळतो व त्या पक्षनेत्याला संसदीय वेतनाखेरीज २४१०० पौंड (सुमारे रु. ३,८५०००) वार्षिक वेतन मिळते. उमरावसभेतील विरोधी पक्षनेत्याला १४२५० पौंड वार्षिक वेतन मिळते. सरकार-पक्षाच्या प्रमुख प्रतोदाला १८२५० ते २१९०० पौंड वार्षिक वेतन मिळते. उपमुख्यप्रतोदाला १८६५० पौंड व इतर सरकारी प्रतोदांना १०२५० पौंड वेतन मिळते. विरोधी पक्षाच्या मुख्य प्रतोदाला १८६५० पौंड व दोन उपप्रतोदांना १०२५० पौंड वेतन मिळते. याखेरीज त्यांना संसदीय वेतन चालूच राहते. उमरावसभेतील विरोधी पक्षाच्या मुख्य प्रतोदाला १२०५० पौंड वार्षिक वेतन आहे.

आपल्याकडील वेतन व भत्ते

आपल्याकडील खासदारपद (आणि आमदारपदही) हे सेवाभावी मानलेले आहे. ब्रिटनमधील संसद-सदस्याप्रमाणे आपल्याकडील संसद-सदस्याला संपूर्ण वेळ या कामासाठी द्यावा लागतो. संसदेचे अधिवेशन सुरू असते तेव्हा त्याने सोमवार ते शुक्रवार ११ ते ६ संसदेच्या कामकाजात भाग घेण्यासाठी हजर रहावयाचे असते. संसद-अधिवेशन सुरू नसेल तेव्हा समित्यांच्या कामकाजासाठी हजर रहावे लागते आणि उरलेला वेळ आपल्या मतदारसंघात मतदारांशी संपर्क साधण्यास जावे लागते. (काही खासदार एकदा निवडून आले की नंतर आपल्या मतदारसंघाकडे पुढील निवडणुकीपर्यंत फिरकतही

नाहीत अशा तक्रारी आहेत.) ज्याच्याकडे उपजीविकेचे दुसरे साधन नाही त्याला केवळ संसद–सदस्य म्हणून मिळणाऱ्या वेतन व भत्त्यावर जगणे व कुटुंब चालविणे अशक्यच आहे इतके तुटपुंजे वेतन व भत्ते आपल्याकडे मिळतात. संसद-सदस्याला दरदहा ५०० रु. वेतन मिळते. शिवाय अधिवेशन सुरू असताना हजर राहिलेल्या दर दिवसाला ५१ रु. भत्ता मिळतो. तसेच समितीच्या सभेलाही हजर राहिल्यास दैनिक भत्ता मिळतो. खासदाराला घर देण्यात येते; परंतु त्याला भाडे द्यावे लागते. तुलनात्मकदृष्ट्या भाडे कमी असते; पण खासदाराला नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणी एक घर असते. राजधानीत दुसरे घर म्हणजे दोन संसारच जणू चालवावे लागतात आणि संसदसदस्य म्हणून मिळणाऱ्या वेतनात ते शक्य होत नाही. म्हणजेच संसार चालविण्यासाठी त्याला उत्पन्नाचे दुसरे साधन असावे लागते. ज्यांचा व्यापार–उद्योग आहे, मोठी शेती आहे वा उत्पन्नाचे दुसरे काही साधन आहे तेच संसदेच्या फंदात पडू शकतात. संसद–सदस्याला पहिल्या वर्गाचा प्रवास–परवाना असतो. त्यामुळे भारतात तो कुठेही मोफत हिंडू शकतो. अधिवेशनाच्या काळात त्याला एकदा वा दोनदा आपल्या राजधानीपर्यंत व परत विमान–प्रवासाचा खर्च मिळतो. राजधानीतील त्याच्या निवासस्थानी जो टेलिफोन असतो त्यावरून त्याला व नेहमीच्या निवासस्थानातून वर्षाला १० हजार टेलिफोनकॉल्स विनामूल्य करता येतात. काही प्रमाणात स्टेशनरीही विनामूल्य मिळते. एकूण संसदसदस्याला मिळणारे वेतन व सवलती तुटपुंज्याच.

पाच वर्षे सदस्य असलेल्या संसदसदस्याला निवृत्तिवेतन दरमहा ३०० रु. मिळते. ज्याची संसदसेवा ५ वर्षांहून जास्त झाली आहे त्या प्रत्येक वर्षाला दरमहा ५० रु. जास्त मिळतात. जेव्हा निवृत्त सदस्य राज्यपालपद, मंत्रीपद किंवा वेतन घेणारे कोणतेही सरकारी पद स्वीकारतो तेव्हा त्याला हे निवृत्तिवेतन मिळत नाही. एक अत्यंत महत्त्वाची सवलत संसदसदस्याला मिळते ती म्हणजे वैद्यकीय मदत. निवृत्त सदस्याला कोणत्याच सवलतीचा लाभ मिळत नाही.

मंत्र्यांना तुटपुंजा पगार

केंद्रीय मंत्री व राज्यमंत्री तसेच लोकसभेचे सभापती व राज्यसभेचे अध्यक्ष यांना मासिक २२५० रु. वेतन (वर्षाला २७००० .) मिळते. उपमंत्र्याला दरमहा रु. १७५० (वर्षाला २१००० रु.) वेतन आहे. उपसभापती व राज्यसभेचा उपाध्यक्ष यांना रु. २००० मासिक वेतन आहे. याखेरीज मंत्री व राज्यमंत्री आदींना दरमहा ५०० रु. प्रासंगिक खर्चासाठी भत्ता मिळतो. उपमंत्री व उपसभापतीला हा भत्ता मासिक २५० रु. आहे. याखेरीज रहायला फर्निचरसह घर, मोटार आदि सवलती मिळतात; परंतु मंत्रीपद स्वीकारल्यानंतर संसदसदस्य म्हणून मिळणारे वेतन अर्थातच मिळत नाही. मंत्र्यांना मिळणारे वेतन व भत्तेही तुटपुंजे आहेत. त्यात ते आपले घर चालवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना खर्च भागविण्यासाठी दुसरे मार्ग शोधावे लागतात. संसदसदस्यांचे वेतन मासिक एक हजार रुपये करावे व दैनिक भत्ता ७५ रु. करावा असे विधेयक संसदेच्या येत्या अधिवेशनात चर्चेला येणार आहे.

ब्रिटिश निवडणुका व संसदसदस्यांचे वेतन आणि भारतीय सार्वत्रिक निवडणुका व संसदसदस्यांचे वेतन व भत्ते आणि ते ठरविण्यामागची भूमिका याचा हा तौलनिक अभ्यास आहे. साम्य व फरक दाखविला आहे. ज्या ब्रिटिश संसदीय पद्धतीचा आपण वारसा घेतला आहे त्यातील किती स्वीकारले व किती नाकारले ते यावरून लक्षात यावयास हरकत नाही. □

आसामच्या कविता

पृष्ठ ११ वरून

त्रिवेणी संगमावर साळसूदपणे
आणि आपल्याच खोल डोहात पोसायचे
काळकूट ओकणारे कालिया
ह्या पाण्याचा तसला स्वभाव नाही
तसा इतिहास नाही

मग
कुठून आली ही रक्ताळलेली प्रेते
ह्या पारदर्शक प्रवाहात ?
कुठून दिसली ह्या लहरत्या पाण्यात
बेसावध घरांची जळती प्रतिबिंबे ?
ह्या पाण्याच्या अवखळ खळखळाटामागून
मग हे दबलेले हुंदके कसे आले ?
कुठून आला हा रक्ताचा ओहळ
आणि मिसळला ह्या महान नदीत
बेगुमानपणे...कुठून ?

हिमालयाच्या कडे-कपारींमधील
पक्ष्यांचे रंगीबेरंगी थवे
स्थलांतरून यायचे
थंडीवाऱ्याचे हिच्या आश्रयाला
आज
हे गिधाडांचे अभद्र तांडे
का घोटाळतात
हिच्या डोक्यावरून

आजपर्यंत हिने केवळ पाहिली
काठावर खेळणाऱ्या बालकांची
खेळकर भांडणे
क्वचित लढाई देखील
वाळूच्या किल्ल्यासाठी लढलेली
हिने ऐकली आजवर
पाण्यामधे घडा बुडवताना
होणारी बुडबुड
आणि घडा उचलताना होणारा
कंकणांचा मंजूळ किणकिणाट
कालपरवा झाडलेल्या
बंदुकांच्या फैरींचे आवाज
हिला नवीन आहेत

ब्रह्मपुत्रे
तुझ्यापासून हजारो मैलांवर
दिवसाकाठी दोन तास येणाऱ्या
नळाच्या पाण्यात
भिजणारी आमची मने
तुझ्या आसवांचा प्रलय
त्यात सामावणेच शक्य नाही
तसे आम्ही देखील
यथाशक्ती अस्वस्थ होतो कधीमधी
पण रोजी–रोटीच्याच लढाया
आम्हाला आयुष्यभर पुरतात
ब्रह्मपुत्रे
आजमात्र आसमंतातून येताहेत
अनेक अलिप्त दिलासे
असंख्य सांत्वनपर छापील हुंदके
आज कोरडघा उपचारास्तव
आमची ढोंगी मने पुटपुटतात
ब्रह्मपुत्रे,
आम्ही तुझ्या दुःखात सहभागी आहोत !
आम्ही तुझ्या दुःखात सहभागी आहोत !

□

फेब्रुवारी १९८३

□



आजचे कवी

अविनाश सहस्रबुद्धे

१९७० च्या आगेमागे ज्यांनी कविता लिहायला सुरुवात केली आणि आपला वेगळा ठसा उमटवला अशा एकूण दहा कवींची ओळख या लेखमालेतून होईल. मागील अंकात पहिला लेख प्रसिद्ध झाला.

लेखांक दुसरा

हेमंत गोविंद जोगळेकर

हेमंत गोविंद जोगळेकर यांच्या कविता-संग्रहाचे नाव आहे 'होड्या'. काव्यनिर्मिती करीत असताना कवी त्याला आलेल्या जीवनानुभवातलं आकारसत्य शोधीत असतो. एकाच वेळी जीवनाचा, आकारांचा आणि स्वत:च्या व्यक्तित्वाचा घेतलेला हा शोध असतो. 'पृथगात्मता' ही कवीनं घेतलेल्या आपल्या व्यक्तित्वाच्या शोधात अपरिहार्य असते. जोगळेकरांच्या 'होड्या' संग्रहातील कविता वाचताना हे सतत जाणवत रहातं की, ही कविताही व्यक्तित्वाचा असा शोध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करताना दिसते. ही कविता वाचताना आणखी एक गोष्ट चटकन जाणवते ती अशी की, जोगळेकरांच्या कवितेचा सूर हा मर्ढेकरांच्या कवितेशी मिळताजुळता आहे. आजच्या साठोत्तरी मराठी कवितेतील काही कवींची कविता ही मर्ढेकरांचा वारसा सांगणारी कविता आहे. जोगळेकरांच्या कवितेवरही मर्ढेकरांचे हे संस्कार झालेले आहेत. याचा प्रत्यय त्यांच्या 'वाग', 'त्या क्षणी', 'रंग', 'डोंबाऱ्याचा खेळ' इ. कवितांमधून येतो. मर्ढेकरांच्या काव्यानुभूतीतील जीवनानुभव अतिशय विदारक असा आहे. जोगळेकरांच्या बहुसंख्य कवितांतील अनुभवाला कोवळीक असली, तरलता असली, तरी त्यातीलही अनेक ठिकाणी या विदारकतेचीच छाया पडलेली दिसते. या विदारकतेतून उद्‌भवणाऱ्या मानवी जीवनातील मूलभूत प्रश्नांनी कविमन सतत अस्वस्थ झालेले असल्यामुळे तिचे रूप जसे अंतर्मुख आहे तसेच ही विदारकता वास्तव-लक्षी निरीक्षणाच्या आधारावर सुस्थिर असल्यामुळे तिचे रूप बहिर्मुखही आहे. या अर्थानेच ती अप्रत्यक्षपणे सामाजिक जाणिवेची कविता आहे असे आपल्याला म्हणता येईल. मूलत: ती आत्मनिष्ठ भावकविताच आहे व सामाजिक जाणिवेपेक्षा वैयक्तिक भावभावनांनाच तिच्यात प्राधान्य मिळाल्याचे दिसते. हेमंत जोगळेकरांच्या 'होड्या', 'तळघात.. मळघात', 'मोर सज्जच असतात', 'तुझ्या-बद्दल' इ. कवितांमधून प्रेमिकांच्या मनातील तरल आंदोलने अत्यंत हळुवारपणे चित्रित झालेली आहेत. ही आंदोलने कोवळ्या तरुण वयातील असल्यामुळे त्यात एक प्रकारची कोवळीक, तरलता जशी आहे तसेच स्त्री-बद्दल वाटणारे संदिग्ध, स्वत:लाच नीटसे न समजलेले आकर्षण आहे. प्रेमातील नाजुक संबंध, भाव–भावना जशा आहेत तशीच अनिश्चिततेची, निराश मनाची जाणीवही आहे. या कवितांना कोवळ्या वयातील सुखद आठवणींचा जसा स्पर्श आहे तसाच उदासीनतेचा सूरही आहे. म्हणूनच कवीला 'बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि साधी होडी' अशा पुष्कळ होड्या करता येत असल्या तरी शेवटी त्यातून वलयांकित होते ती उदासीनतेचीच विषण्ण, खिन्न जाणीव आणि कवी सहजच म्हणून जातो–

पाऊस ना, पडलाच नाही
पाणी न, वाह्यलंच नाही
होड्या ना, सोडल्याच नाहीत
होड्या ना, केल्याच नाहीत. (पृ. ४)

उदास, विषण्ण मनाची तीच जाणीव खालील ओळींमधूनही अत्यंत तीव्रपणे व्यक्त होते.

'मी'च्या आतमध्ये
तेच तेच रस्ते
तीच तीच गाणी
गोल गोल राणी, एवढं एवढं पाणी
गोल गोल राणी, एवढं एवढं पाणी
(पृ. ५)

कधीकधी प्रेमभावनेतील उत्कटतेचे आणि तीव्रतेचे पर्यवसान अर्थशून्यतेची प्रतीती निर्माण करते आणि त्यातून विशिष्ट प्रतिमांचे आकृतिबंध निर्माण होतात. सिगरेटच्या थोटकांचा गालिचा', 'मागच्या अंगणात पुरलेला पैसा', 'फुलदाणी' या अशाच काही प्रतिमा. जिवाला भिडवणारी अथांग आर्तता सिनिसिझममधून उद्‌भवणारा निराश, विदारक उपहास अशा स्वरूपाच्या अर्थशून्यतेचा अनुभव मग त्यांच्या काही कवितांमधून व्यक्त होतो. या अर्थशून्यतेमुळेच 'मी माझा चेहरा शोधतोय. मला माझा चेहरा सापडत नाही आहे'ची जाणीव निर्माण होते.

मला एकदा पंख फुटले होते
फुलपाखरासारखे
पण ते कुणाला कळलेही नाही
मग मी ते पंख कापून टाकले
बारीक बारीक तुकडे करून
हळूच वाऱ्यावर सोडून दिले
पण तेही कुणाला कळले नाही

अशासारख्या ओळी अर्थशून्य जीविता-चाच उत्कट अनुभव अत्यंत प्रत्ययकारीरीतीने व्यक्त करतात,

जोगळेकरांच्या प्रेमकविता या रूढ अर्थाने 'तू' आणि 'मी' च्या कविता नाहीत म्हणूनच प्रेमानुभवातील सांकेतिकता त्यांच्यात दिसत नाही. कृत्रिम प्रतिमांचा स्पर्शही त्यांना झालेला नाही जो आजच्या

अनेक कवींच्या प्रेमभावनेच्या प्रेमकवितेत दिसतो, प्रेमभावनेच्या अनेक सूक्ष्म छटा जोगळेकरांनी व्यक्त केल्या आहेत. ही प्रेमकविता जेव्हा निराश प्रीतीचा अनुभव व्यक्त करू पहाते तेव्हा एका वेगळ्या पातळीवर तेवढीच तरल, नाजूक बनते. जोगळेकरांच्या प्रेमकविता एका कोवळ्या भावनेचं फार नितळ दर्शन घडवितात हे तर खरंच; परंतु त्या कोवळ्या भावनेतलं संदिग्धपण शब्दातून व्यक्त करतानाही जोगळेकरांनी हळुवारपणे जपलं आहे हे विशेष.

जोगळेकरांचे कविमन हे जसे एकीकडे अंतर्मुखतेने मनाचा खोल खोल ठाव घेणारे आहे तसेच ते दुसरीकडे बहिर्मुखतेने समाजवास्तव न्याहाळणारेही आहे त्यातूनच कधी वैफल्यतेची जाणीवही निर्माण होते. हे वैफल्य दुहेरी आहे. ते जसे वैयक्तिक अनुभवातून आलेले आहे तसेच सामाजिक आणि आधुनिक जगाचा, शोषणाचा संदर्भ असलेलेही आहे. ही वैफल्याची जाणीव कवीला प्रकर्षाने भिडत असली तरी तिचा प्रवास अगतिकतेकडे, नियतीवादाकडे घेऊन जाणारा नाही. ही विफलता, उदासीनता संमिश्र आहे. म्हणूनच कधी ती हवी आहे, तर कधी नको आहे. कधी ती संभ्रमावस्थेतून आली आहे तर कधी वस्तुस्थितीच्या भानातून. वर्तमान संदर्भाचे, संघर्षशील जीवनातील गुंतागुंतीचे भानही तिला आहे. वैफल्याच्या या जाणिवेमागेही कवीची शांत, गंभीर, प्रौढ व प्रगल्भ वृत्तीच प्रकट होते. जोगळेकरांच्या अशा कवितांना चिंतनशीलतेचा स्पर्श आहे. आजच्या आधुनिक जगातील माणसाच्या अस्तित्वाला क्षणोक्षणी जाणारे तडे व त्याचे असहायपण यांच्या चिंतनाने व्याकुळ झालेले हे कविमन आहे. 'टेबलाच्या ह्या बाजूस' बसणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तीचे हे असहाय्यपण आहे. डोळ्यात स्वप्ने आहेत फक्त टेबलाच्या बाजूस जाण्याची. असहाय्यतेची ही जाणीव आहे म्हणूनच कवी वास्तवाची कठोर कबुली देतो.

हे टेबल...
हे टेबलच उलथून टाकता येईल
हे आपल्या मनातही येत नाही.

कधी हा अनुभव इतका खरा आणि तळापासून आलेला असतो की,



हेमंत गोविंद जोगळेकर

पुणे येथे ३०-१०-१९४८ रोजी जन्म. रासायनिक अभियात्रिकीमध्ये बी. टेक्. सध्या हिंदुस्थान ॲंटिबायोटिक्समध्ये सीनियर केमिकल इंजिनियर.

१९७१ पासून कवितालेखनास सुरुवात. किर्लोस्कर, स्त्री, हंस, सत्यकथा, अभिरुची, साहित्य इ. नियतकालिकांतून प्रसिद्धी. 'कविता दशकाची' (ग्रंथाली १९८०), 'सर्वोत्कृष्ट कविता' (१९७७) व 'अक्षर दिवाळी' (१९८०, ८२) त कवितांचा समावेश. 'होड्या' हा संग्रह श्रीप्रकाशनातर्फे १९८२ साली प्रकाशित. विडंबनकवितेचा संग्रह 'माझा (पण) बेहद्द नाममात्र घोडा' प्रकाशनाच्या मार्गावर.

पत्ता : हेमलता, ९१७/१९ सी. फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४११ ००४.

मी हात लांब केला तुझ्या दिशेने–
तू
झोपलेली होतीस शांत
माझ्याकडे पाठ करून.

सारख्या ओळींमधूनही त्याची प्रामाणिक ओळख मिळते.

भारतीय समाजजीवनात स्त्री ही पुरुषाच्या वर्चस्वाखालील मादीच ठरते. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील स्त्री-जीवन हा जोगळेकरांच्या कवितांचा विषय आहे. या सगळ्याच कविता अत्यंत लक्षणीय व समर्थ अशा कविता आहेत. आजच्या आधुनिक जीवनात अनेक अंगांनी–सोसणाऱ्या स्त्रीची प्रतिमा त्यांच्यामधून उभी रहाते. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीची होणारी विटंबना या एका विदारक वास्तवतेला हेमंत जोगळेकर अत्यंत धीटपणे सामोरे जातात. स्त्रीजीवनाचे इतके प्रत्ययकारी चित्र आजच्या मराठी कवितेत अभावानेच पहायला मिळते.

'त्याची इच्छा', 'वारसा', 'का हसतेस', 'रंग', 'डोंबाऱ्याचा खेळ' इ. कवितांचे केंद्र 'आजची स्त्री'च आहे. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाची होणारी कोंडी हा या कवितांचा विषय आहे. ही स्त्री पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील तर आहेच त्याशिवाय आजच्या महानगरीय संस्कृतीतील नैतिक अवमूल्यनाचे संदर्भही तिच्याभोवती आहेत. स्त्रीच्या या प्रतिमेला सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. आजच्या जीवनातला तिचा संघर्ष हा अनेक पदरी आहे. विषम समाजरचनेतील आर्थिक कोंडीतून बाहेर पडण्यासाठी तिला दिवसभर नोकरीतील कष्ट उपसून शिणलेली काया घेऊन घरी यावे लागते. ही काया नुसती शिणलेलीच नसते तर लोकलमधील, बसमधील गर्दीत विटाळलेलीही असते. दिवसभरचा हा शिणवटा कमी असतो म्हणूनच की काय रात्री तिची इच्छा असो नसो तिला नवऱ्याच्या इच्छेखातर शिणलेले शरीर पुन्हा शिणवावे लागते.

माझ्या अंगावर नवऱ्याचे वजन
अंगाशी झटताहेत त्याचेच हात
मी डोळे उघडत नाही
माझ्यात त्राण नाही
त्याला रोखण्याचं किंवा सहभागी
होण्याचं.

असं मनातल्या मनात कळवळून म्हणणारी ही स्त्री आहे. 'तुम्ही शिरू शकता तुमच्या नवऱ्याच्या कुशीत त्याची इच्छा असेल तर' हे या पती–पत्नीसंबंधातील कठोर वास्तव आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रीचा संघर्ष इथेच थांबत नाही. तिचा संघर्ष हा कसा सगळ्या पातळ्यांवरचा आहे, ती पतीविषयीच्या, परंपरेच्या व दैनंदिन चाकोरीच्या बंधनात कशी घुसमटते आहे याचा वेध जोगळेकर तिच्या जीवनातील नित्याच्या

प्रसंगामधूनच घेतात–

रात्री मधेच तुमची छोटी उठल्या-
वरती
तुम्हीच उठा तुमची स्वप्ने थांबवून
आणि कपडे चढवून, थोपटा तिला ती
झोपेपर्यंत.
पण ती तशीच रडत राहिली
तर तिला बाहेर घेऊन जा
खेळवायला;
नाही तर तुमच्या नवऱ्याची झोपमोड
होईल.
कारण त्याला जायचे असते दुसऱ्या
दिवशी कामावरती.

या ओळींमधून स्त्रीजीवनातील वेदना थेट वाचकाच्या मनाला जाऊन भिडते. 'फुलदाणी', 'का हसतेस ?', 'संदर्भखुणा' या कवितांमधून जोगळेकरांनी पती-पत्नीच्या नातेसंबंधात निर्माण होऊ पहाणारा दुरावा सूक्ष्मपणे टिपला आहे. 'वारसा' या कवितेत परंपरेला जखडलेल्या, सामाजिक दडपणांखाली दडपलेल्या स्त्रीमनाची आंदोलने आहेत. परंपरेचे हे भान, ही दडपणे आईने मुलीवर म्हणजेच स्त्रीने स्त्रीवर लादलेली आहेत व तोच त्यांच्यामधला वारसा आहे. पण ही बंधने, दडपणे स्वेच्छेने लादलेली नाहीत. अगतिकतेतून नाइलाजाने आलेली आहेत. त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही म्हणून आहेत. म्हणूनच ती म्हणते–

मी जवळजवळ पुरं केलं होतं माझं
ऐतिहासिक कर्तव्य
तुला एक जबाबदार भेकड स्त्री
बनवण्याचं
माझा सांस्कृतिक वारसा तुझ्यापर्यंत
पोचवण्याचं.

स्त्री-स्त्रीमधील हा सांस्कृतिक वारसा स्त्रीला नेहमी पिचत ठेवणाराच नाही का ?

आर्थिक आघाडीवरील सर्व व्यवघाने संभाळत, पुरुषाच्या वखवखलेल्या स्पर्शांना, 'केवळ नजरेने करतो संपूर्ण नग्न समोर उभ्या कोणत्याही बाईला'च्या भीषण वास्तवाला तोंड देत तोल सांभाळावा लागतो तो स्त्रीलाच. नवरा फक्त थंडपणे सांगतो नोकरीच्या पहिल्याच दिवशी की,

'साहेब असाही असतो
नोकरी करायची म्हणजे त्याला
तोडता येत नाही
पण त्याला अधिक जवळ येऊ देता
कामा नये.
शेवटी बाईलाच हा तोल सांभाळायचा
असतो.'

'तो आता कुरकुर करतोय माझ्या निरुत्साहाबद्दल. मला आठवतंय, कधी तरी त्यानं मला आधीशी म्हटलेलं' या दोनच ओळींमधून जोगळेकर स्त्रीच्या वाटघाला येणारं शारीर-संबंधातील वास्तव उघडं करतात. जोगळेकरांच्या कवितेचा विषय झालेली ही स्त्री मध्यमवर्गातील आहे म्हणूनच मध्यमवर्गातील दुभंगलेल्या व्यक्ति-जीवनाचे असंख्य कंगोरे त्यातून व्यक्त होतात.

'तेव्हा ना' व 'ठ्ठो' या कवितांमध्ये 'मुठीमध्ये आईचे बोट बंद' असण्याच्या काळातील, बालवयातील स्मरणे आहेत, तर 'अर्धे मिनिट', 'चित्र' या कविता निर्मिति-प्रक्रियेसंबंधीच्या कविता आहेत. 'तिकिटचेकर' या कवितेतून जोगळेकरांनी वर्गा-वर्गातील विषमतेचे चित्र नेमकेपणाने रेखाटले आहे.

'होडघा' संग्रहातील कवितांमधील हे हे विविध विषय पाहिले की आपल्या भोवतीचं जग या कवीने किती संवेदनशीलतेने न्याहाळलं आहे याची साक्ष पटते.

जोगळेकरांच्या कवितेची भाषा साधी, सरळ, स्वाभाविक व अनलंकृत आहे व म्हणूनच थेट काळजाला भिडण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. 'तिकिटचेकर', 'कॅमेरे रोखलेले', 'डोंबाऱ्याचा खेळ' या कवितांमध्ये निवेदनात्मक शैलीचा अवलंब केला असला तरी त्यामुळे त्या कविता भावकवितेपासून दूर सरकलेल्या आहेत असे वाटत नाही व हेच या कवितांचे वैशिष्ट्य आहे. जोगळेकरांच्या कवितेत प्रतिमांचा वापरही फारसा दिसत नाही; परंतु ज्या प्रतिमा येतात त्या अनुभवातील लयीच्या अंगाने सहजपणेच येतात. त्यांच्या रचनेत कुठलीही कृत्रिमता जाणवत नाही.

आजच्या समकालीन कवितेत लक्षणीय भर घालणारी ही कविता आहे.

□

तळघात....मळघात

पहिल्यांदा पाहिलं तुला :
वाटलं नव्हतं मला
आपली कधी ओळख होईल.
पण असेच समोरासमोर
येत गेलो वारंवार
अन् तू म्हणालीस,
"माझं नाव...
तुमचं नाव काय ?"

तळघात...मळघात
तळघात...मळघात

मग काय झालं की
भेटत गेलो पुन्हा पुन्हा
काय काय बोललो आणिक
किती हसलो कारणाविना
अन् तू म्हणालीस,
"आपण कसे भेटलो नाही
याआधीच ?"

तळघात...मळघात
तळघात...मळघात

नंतर कशा कुणास ठाऊक
भेटी होत गेल्या विरळ
आणि जरी भेटलो तरी
शोधावे लागत विषय !
निरोपाचा शब्द तसा
उच्चारला कुणीच नाही
–पण असेच एकदा अचानक भेटल्यावर
आपण जेव्हा एकमेकांना म्हणालो,
"हलो."

तळघात...मळघात.
तळघात...मळघात.

□

का हसतेस ?

रात्री तू माझ्याजमळ झोपतेस,
सकाळी माझ्यासाठी न्याहारी बनवतेस
मी ऑफिसला गेल्यावर
माझ्यासाठी डबा भरून पाठवतेस,
संध्याकाळी न चुकता
मी तुला फिरायला नेतो
वाटेत कुणी भेटले तर
तुझी ओळख करून देतो,
"ही माझी पत्नी."
मग तू हसतेस.
का हसतेस ?
खरं सांग, का हसतेस ?

शब्दातच गुंतून पडलेली 'शिकस्त'

'शिकस्त' ही ना. सं. इनामदार यांची सहावी ऐतिहासिक कादंबरी. आपल्या कादंबरी–लेखनासाठी इनामदार यांनी पेशवाईचा काळ निवडलेला दिसतो. बाजीराव आणि थोरले माधवराव सोडले तर पेशव्यांच्या काळात भव्य–दिव्य असे काही पाहावयास मिळत नाही. शौर्य आणि मुत्सद्देगिरीच्या दृष्टीने पाहिले तर बाजीराव आणि नाना फडणीस या दोनच व्यक्ती डोळ्यात भरतात. बाकी सारी जरीपटक्यांची देवघेव! आदर्शाचा लखलखाट, उच्च दर्जाच्या मुत्सद्देगिरीची चमक, डावपेचांचे चातुर्य, नैतिकतेची चाड किंवा पल्ला दाखविणारी दूरदृष्टी या साऱ्यांचाच अभाव एकसमयावच्छेदेकरून पेशवाईत आढळतो. उच्च कलाकृतींनी जन्म घ्यावा अशी कूस पेशवाईची नाही.

त्यामुळे इनामदार यांच्या कादंबऱ्यांना मूलतःच मर्यादा पडलेल्या दिसतात.

तसेच कादंबरी-लेखनाच्या दृष्टीने दुसरी एक त्रुटी म्हणजे ऐतिहासिक साधने आणि आहेत त्या साधनांची विश्वासार्हता. त्या काळातील बखरवाङ्मयाची जी निर्मिती झालेली आहे तीसुद्धा एकांगी. अनेक बाजूंनी झालेल्या लेखनामुळे एखाद्या घटनेवर प्रकाश पडलेला आहे, त्याला काही अस्सल कागदपत्रांची निर्विवाद साथ मिळालेली आहे असे चित्र तेथे क्वचितच दिसते. अशा परिस्थितीत कल्पकतेला तरी वाव कितीसा असणार !

तरी पण पेशवाईच्या काळातील व्यक्तींवर काही ललितकृती तयार झालेल्या आहेतच. त्यात अगदी लक्षणीय अशा ललितकृतीचा उल्लेख करावयाचा झाला तर 'सवाई माधवरावांचा मृत्यू' या नाटकाचा करावा लागेल. या नाटकात ऐतिहासिक दृष्टीने भव्य–दिव्य असे जरी काही नसले तरी नाट्यनिर्मितीला पोषक ठरावे असे सवाई माधवरावांचे व्यक्तिमत्त्व तेथे दिसते. अर्थात कुठल्याही कलाकृतीच्या निर्मितीला–त्यात ऐतिहासिक कलाकृती आलीच. काही भव्योदात्त असे असावेच लागते असे नाही. अगदी सामान्य वातावरणात, सामान्य व्यक्तींच्या जीवनावरही उत्तम कलाकृती निर्माण होत असताना दिसतात. याची किती तरी उदाहरणे देता येतील. भाऊ पाध्यांची 'वासूनाका', जयवंत दळवींची 'चक्र' आणि भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' अशी बरीच उदाहरणे अशू शकतील. त्यामुळे कादंबरीकारांसाठी पेशवाईचा काळ हा त्याच्या कलाकृतीच्या निर्मितीसाठी पोषक किंवा उपयुक्त नाही असे विधान करता येणार नाही. फक्त त्यासाठी कादंबरीकाराजवळ ऐतिहासिक दृष्टी आणि प्रतिभेची देणगी असणे आवश्यक असते.

'शिकस्त' ही सर्वार्थाने पार्वतीबाईच्या जीवनावरील कादंबरी. इनामदार यांना या कादंबरीसाठी जो पट निवडावा लागला, त्यात नानासाहेब पेशवे यांच्या जीवनाची संध्याकाळ, पानिपतच्या शेवटच्या युद्धाची शोकांतिका, त्या युद्धात पडलेले विश्वासराव आणि गहाळ झालेले सदाशिवराव. नानासाहेबांचा मृत्यू, माधवरावांचे अल्पायुष्य, नारायणरावांचा खून, पेशवाईपुढे उभा राहिलेला नेतृत्वाचा प्रश्न, सदाशिवरावभाऊंच्या तोतयाचा प्रश्न आणि पार्वतीबाईंचा मृत्यू, या सर्व घडामोडी येतात.

इनामदार यांच्यापुढे मुख्यतः उभी राहिलेली अडचण ही इतिहासाच्या तोकड्या साधनांची आहे. जेथे पेशवे यांच्या जीवनातील सर्व तपशील सापडत नाहीत तेथे पेशवेकाळातील एखाद्या स्त्रीच्या जीवनातील तपशील कोठून सापडणार ? म्हणून पार्वतीबाईचे व्यक्तिमत्त्व उभे करणे ही फार अवघड गोष्ट त्यांच्यापुढे असावी. शिवाय राजकीय इतिहासातील एखाद्या व्यक्तीचे एकेरी जीवन उभे करणे ही गोष्ट केवळ अशक्यच असते. अनंत दिशांनी तत्कालीन राजकीय प्रवाहाच्या लाटा त्या व्यक्तीच्या जीवनावर येऊन आदळत असतात. शिवाय ज्या वाटांवरून या व्यक्तींचे जीवन मार्ग आक्रमीत असते त्या वाटा मध्येच केव्हा तरी कुठे तरी लुप्त झालेल्या असतात. काही वेळा काही ठिकाणी तर वाटाच नसतात; पण तेथून मार्ग तर आक्रमावयाचा असतो. तेव्हा त्या ठिकाणी कल्पित सत्याचा आधार घ्यावा लागतो आणि उभे करावयाचे ते व्यक्तिमत्त्व ज्ञात इतिहासाच्या संदर्भात वास्तव वाटावयास हवे असते. काही घटना, काही परिसर आणि काही व्यक्ती एवढ्या शिदोरीवर ही कलाकृती उभी करावयाची असते. यासाठी इतिहासाचे भान, साऱ्या इतिहासाला व्यापून उरलेला ऐतिहासिक दृष्टिकोन आणि अव्वल दर्जाची कल्पकता याची जरुरी असते. पार्वतीबाईचे जीवनचरित्र कलाबद्ध करताना इनामदार यांच्यापुढे हे प्रश्न उभे राहिले असणारच आणि या प्रश्नांना सामोरे जाताना त्यांना यश आणि अपयश दोन्ही पदरी घ्यावे लागलेले दिसते. पार्वतीबाईचे व्यक्तिचित्र शब्दबद्ध करताना यशापयशाचे झोके वारंवार दिसतात.

निर्जीव पार्वती

या सुमारे ५७५ पानांच्या कादंबरीत पार्वतीबाईच्या जीवनाचा जो आलेख उमटतो, तो कुठे सजीवच होत नाही. अनंत घटनांमधून उमटत गेलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व शब्दांच्या पलीकडे जात नाही. केवळ अगतिकता आणि एकच एक ध्यास एवढ्या पातळ्यांवरूनच या व्यक्तिमत्त्वाच्या जीवनाचा सारा प्रवास घडतो.

हा सारा प्रवास क्लेशदायक तर खराच; पण केवळ निवेदनापलीकडे त्या क्लेशदायक प्रवासाला रूप सापडत नाही. पार्वतीबाई-

साहेब इकडच्या स्वारीच्या भेटीसाठी धडपडतात; परंतु कादंबरीकार पार्वतीबाईंना शब्दांपलीकडचे चैतन्याचे रूप देण्यासाठी मात्र धडपडताना दिसत नाही. एवढ्या प्रचंड पृष्ठविस्ताराची कादंबरी, तीमध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत पार्वतीबाईंचे अस्तित्वच भरून राहिलेले आहे; परंतु पार्वतीबाईंवाचून ती पोरकी वाटते. याचे कारण काय असावे? अनेक कारणे संभवतात. त्यातील एक महत्त्वाचे कारण असे की, पार्वतीबाईंच्या जीवनात जो प्रश्न निर्माण झालेला आहे, त्या प्रश्नाचे परिघ कादंबरीच्या एकूण विस्ताराच्या मानाने लहान आहे आणि जेवढे ते लहान आहे तेवढेच ते एकेरी आणि वैयक्तिक आहे. त्या प्रश्नात नंतर राजकारण येते हे जरी खरे असले तरी त्या राजकारणाचा एकमेव केंद्रबिंदू हा एकच प्रश्न होऊ शकत नाही. कारण पार्वतीबाईंचा नवरा सदाशिवरावभाऊ, जो पानिपतच्या युद्धात गहाळ झालेला आहे तो पेशव्यांच्या गादीचा वारसदार नाही. त्यामुळे पेशवाईतील तत्कालीन राजकारणाचा केंद्रबिंदू पार्वतीबाईंच्या जीवनात निर्माण झालेल्या केंद्रबिंदूला छेद देतो आणि लेखकाचे मन मात्र या दोन केंद्रबिंदूंभोवतीच फिरत राहते.

पेशवाईतील त्या वेळच्या राजकारणातील लाटा कधी पेशवाईच्या भवितव्याच्या प्रश्नावर आदळतात तर कधी पार्वतीबाईंच्या वैयक्तिक जीवनात निर्माण झालेल्या प्रश्नावर आदळतात. पानिपतचे युद्ध गमावले. इकडे नानासाहेब पेशवे यांचा अंत झाला. सतरा वर्षांच्या अननुभवी तरुण माधवरावावर राज्याचा कारभार पहाण्याची जबाबदारी येऊन पडली. युद्ध हरल्यामुळे निरनिराळ्या शत्रूंच्या हालचाली वाढल्या. दौलतीच्या निरनिराळ्या सुभेदारांच्या निष्ठा बदलल्या. चहूकडून अस्थिरतेचं वातावरण निर्माण झाले आणि भवितव्याचाच प्रश्न पाहता पाहता जगड्व्याळ बनला. पार्वतीबाईंच्या वैयक्तिक जीवनातील प्रश्न त्यामानाने लहान परंतु तो प्रश्नदेखील पाण्यातील कमळाच्या पानाप्रमाणे अलिप्त राहू शकत नव्हता. पाहाता पाहाता तोही तत्कालीन राजकारणाचाच एक भाग होऊन बसला.

आणि इथेच कादंबरीकार इनामदार यांच्यापुढे निर्णयासाठी एक प्रश्न उभा राहतो. पार्वतीबाईंच्या अवघ्या जीवनाला व्यापून टाकणारे पतिवियोगाचे हे दुःख नेमके उचलून त्याला कलात्मक पातळीवर नेवून बसविणे कादंबरीकाराच्या दृष्टीने आवश्यक होते; परंतु ५७५ पानांच्या या कादंबरीत मूळ प्रश्नालाच बगल दिली गेल्यामुळे कलाकृती म्हणून जो वस्तू पुढे यावयास हवी होती ती आलेली दिसत नाही. त्याऐवजी पेशवाईतील उत्तरमध्यकाळातील राजकीय घडामोडींच्या गोष्टीरूप इतिहासाचे स्वरूप त्याला प्राप्त झाल्यासारखे दिसते. इनामदार यांनी आपल्या कादंबरीला 'शिकस्त' हे नाव देऊन देखील वाचकांची थोडी दिशाभूलच केलेली आहे असे वाटते (का ती त्यांचीच स्वतःची दिशाभूल आहे?)

अर्थहीन–आकारहीन!

प्रथम दर्शनीच 'शिकस्त' हे नाव द्व्यर्थी संबोधन वाटते. एक तर पार्वतीबाईंच्या जीवनाची झालेली शिकस्त किंवा पानिपतची लढाई हरल्यामुळे मराठ्यांच्या राज्याला बसलेल्या शिकस्तीचा जबरदस्त तडाखा! या दोन समांतर प्रश्नांचा घोटाळा इनामदार यांच्या मनात दिसतो. या दोन वेगवेगळ्या विषयांचे चित्रण करण्यात त्यांचे कलेचे भान सुटलेले दिसते.

कादंबरीची सुरुवात होते ती सदाशिवराव भाऊंच्या उदगीरच्या लढाईतील विजयापासून आणि शेवट होतो पार्वतीबाईंच्या मृत्यूपाशी. म्हणजे पार्वतीबाईंच्या आयुष्यातील केवळ वीस–बावीस वर्षांतील जीवनाचा आलेख ही कादंबरी चित्रित करते. त्याबरोबरच पानिपतच्या युद्धातील अपयशानंतर मराठ्यांच्या दौलतीत झालेल्या घडामोडींच्या सर्व घटनाही या कादंबरीत येतात. त्यामुळे घड पार्वतीबाईंच्या जीवनाची संपूर्ण कहाणीही नाही किंवा घड पेशवाईचा उत्तरकालही नाही अशी तिची त्रिशंकूसारखी अवस्था झालेली आहे. ही पार्वतीबाईंच्या जीवनाची शोकांतिका आहे असे इनामदार स्वतःच आपल्या निवेदनात सांगतात म्हणजे त्यांचे कलावंताचे मन पार्वतीबाईंच्या जीवनातील शोकांतिकेच्या केंद्रबिंदूजवळ आहे असे आपल्याला कबूल करावे लागते; परंतु प्रत्यक्ष निर्मितीत या शोकांतिकेचे गहिरे रंग कुठेच प्रत्ययाला येत नाहीत. राजगृहात राहणारी; परंतु प्रत्यक्ष राजकारणाचा विषय नसणारी पार्वतीबाई तसे पाहिले तर गोपिकाबाईंपेक्षाही दुय्यम व्यक्तिमत्त्व असणारी ही स्त्री आहे. आपल्या नवऱ्याच्या निमित्ताने जे राजकारण खेळले जाते, त्याचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष चटके तिला बसतात. त्यामुळे एक सतत व्यापून राहणारी व्याकुळता तिच्या जीवनाचा स्थायीभाव झालेली आहे. अशा निराशेचे हे ऊन्ह-पावसाचे खेळ तिच्या जीवनाभोवती सतत फेर धरून आहेत. या खेळातील ऊन्ह-पाऊस आपल्या अंगावर झेलीत असता तिच्या मनात उठणाऱ्या प्रतिक्रिया लेखकाने एकाच जातीच्या रंगविलेल्या आहेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. बावीस वर्षे चाललेल्या या खेळाला त्यामुळे सर्वव्यापी दुःखांतिकेचे रंग लाभलेले नाहीत.

इतिहासाच्या पार्श्वभूमीवर एकूणच कल्पकतेवर आधारलेले पार्वतीबाईंचे व्यक्तिचित्र कादंबरीत तसे पूर्णाकार घेऊ शकत नाही. तिचे लहानपण, लग्न, पेशव्यांच्या राजवाड्यात तिचा प्रवेश, एखाद्या चिमणीच्या पिल्लाने आपल्या घरटयातून पहिली झेप अंतराळात घ्यावी असले काही स्तिमित करणारे विलक्षण अनुभव, राजघराण्यात वाढत असणारे तिचे व्यक्तिमत्त्व, राजकारणाचे, नवीन नात्यांचे, विशिष्ट वेगळ्या प्रकारच्या अदबीचे, वागणुकीचे आणि राहणीसाहणीचे सारेच निराळे जग तिच्या पुढे उभे राहावयास हवे होते. अनंत व्यक्ती,

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

दुसरी आवृत्ती
मूल्य : तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पुणे ३०

राजकारणाचे खल, या पटावरील आपले स्थान, आपल्या पतीचे स्थान, प्रेमाचे रंग आणि कर्तव्याच्या चौकटी, राजगृहात राजकारणाच्या निमित्ताने निर्माण होणारे निरनिराळे केंद्रबिंदु आणि त्यांचा एकमेकांशी संबंध त्या संबंधातून निर्माण होणाऱ्या आशा-निराशेच्या भावना आणि या साऱ्यांमधून निर्माण होणारा एक विशिष्ट जीवनविषयक दृष्टिकोन आणि त्या दृष्टिकोनातून विविध घटनांकडे पाहण्याचे, त्या समजावून घेण्याचे धैर्य असा कुठल्याही कलात्मक व्यक्तिमत्त्वाला येणारा अर्थ आणि आकार पार्वतीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाला आलेला नाही.

बावीस वर्षांत बावीस वेळा ऋतू बदलले. त्यांचा व्यक्तिपरिपोषावर होणारा परिणाम, या घ्यासात अनेक रात्री आल्या आणि गेल्या; परंतु त्या घ्यासाची काही स्वप्ने उमटली नाहीत. प्रगट झाली ती इकडची स्वारी असा एकच घ्यास ! त्यात पार्वतीबाईंचे मन कधी वेगळ्या शंका-कुशंका काढीतच नाही. इकडच्या स्वारीकडून आलेला अंगरखा हृदयाशी कुरवाळते. खरोखरच एखादे वेळी ही व्यक्ती ती नसेल तर आपले हे कृत्य किती किळसवाणे आहे याबद्दल थोडीशी देखील शंका पार्वतीबाईंच्या मनाला शिवत नाही ! सावधानता, भावनात्मकता, निष्ठा, कर्तव्य, सारासार विवेक अशा किती तरी भावनांचे कार्य निरनिराळ्या पातळ्यांवरून कलाकृतीला अभिप्रेत असते. भावनांची निर्मिती, त्यांचे कार्य आणि त्यांचा योग्य परिणाम साधण्याचे अवधान येथे मुळीच राखले गेलेले दिसत नाही. त्यामुळे पार्वतीबाईंचे एकदा जगून गेलेले हे हाडामांसाचे व्यक्तिमत्त्व येथे केवळ शब्दांतच अडकून राहिल्यासारखे वाटते. त्याचा परिपोष होत नाही, त्याला विकासाची दिशा लाभत नाही आणि त्यामध्ये चैतन्य निर्माण होत नाही. त्यामुळे पार्वतीबाईंची गोष्ट कळते; परंतु एक जबरदस्त दुःखांतिका वाचल्याचे समाधान वाचकाला लाभत नाही !

—वि. शं. पारगावकर

शिकस्त
लेखक : ना. सं. इनामदार
कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे
मूल्य – ६० रुपये.

रंगभूमी

नव्या शारीर जाणिवांचे

'खोल खोल पाणी'

सुमारे चाळीस वर्षांपूर्वीचा काळ. नाशिकमध्ये एक प्रख्यात डॉक्टर रहात असतात. विधुर. राजा आणि बाळ ही दोन मुले, लक्ष्मण नावाचा एक नोकर आणि चंद्राक्का ही स्वैपाकीण. डॉक्टर नानासाहेब हे गावातले प्रतिष्ठित गृहस्थ असतात. तरी पण त्यांच्याबद्दल गावात कुजबुज असते. चंद्राक्का ही तरुण, देखणी आणि मागे कोणताच पाश नसलेली स्त्री. राजा आणि बाळ यांची ती आईच्या मायेने सगळं करत असते. तेच 'आई'पण सर्वार्थाने सिद्ध करीत असते. नाना आणि चंद्राक्काचे शारीरिक संबंध असतात.

राजा आणि बाळ यांच्यात राजा मोठा. १४–१५ वर्षांचा. तारुण्याच्या उंबरठ्यावर उभा असलेला. शरीराचे वेगळे अर्थ उमगू लागण्याची ही वेळ. त्याचा मित्र वामन्या त्याला स्त्री–पुरुष–संबंधाविषयी माहिती पुरवत असतो. राजाचं साधंभोळं मन, त्या सगळ्या गोष्टी 'घाण' म्हणून नाकारत असते; पण स्वप्नात त्याला तेच सगळं छळत असतं. नाना–चंद्राक्काबद्दलही तो ऐकून असतो; पण आपले वडील असलं बीभत्स कृत्य करणार नाहीत असं त्याला वाटत असतं.

एक दिवस गल्लीत कुत्र्यांचं मैथुन बघत उभे राहिल्याबद्दल राजा आणि बाळ नानांचा सडकून मार खातात. रात्री धाकटा बाळ तापाने फणफणतो. औषध आणण्यासाठी राजा वर नानांच्या खोलीत जातो. तिथे तो नाना आणि चंद्राक्काला एकत्र बघतो. राजाला जबरदस्त हादरा बसतो. तेव्हापासून राजाचं, चंद्राक्काबरोबरचं वागणं बदलतं. एरवी आईसारखी वाटणारी चंद्राक्का, तिच्याबद्दल त्याच्या मनात अढी बसते.

एवढ्यावरच हे थांबत नाही. चंद्राक्का तिच्या एका गाववाल्याच्या नादानं तरुण फौजदाराबरोबरही रत होत असते. गावभर बोंब उठते. शिवाय चंद्राक्काविषयी त्याचं मत कलुषित करणारी मयुआत्याही असतेच. एक दिवस खुद्द नाना दारू पिऊन येऊन चंद्राक्काला वडवून काढतात !

कडक शिस्तीच्या नानांसमोर मान खाली घालून वावरणारा राजा, एक दिवस चंद्राक्का तरी या घरात राहील किंवा मी तरी अशी तोंडावर बजावणी करतो. निरुपायानं नाना चंद्राक्काची मुंबईला व्यवस्था करतात; पण स्वतः मात्र लगेचच कायमचे निघून जातात !

संपूर्ण नाटक पौगंडावस्थेतील तरुणाच्या दृष्टिकोनातून घेतले आहे. अननुभूत संवेदना शरीरभर धडका मारत असतात. 'सेक्स'-विषयी आकर्षण आणि भीती एकदमच मनात वावरत असतात. त्याच 'खोल खोल डोहाच्या' तळाचा वेध घेण्याचा प्रयत्न हे नाटक करते.

नाटक फ्लॅशबॅकच्या तंत्रानं घेतलं आहे. वृद्धत्वाकडे झुकलेल्या राजाच्या आठवणी म्हणजे हे नाटक. राजाचा चंद्राक्कावर माया नसते असे नाही. तिनं आपल्याला किती प्रेमानं, खस्ता खाऊन मोठं केलं आहे,

आईची माया दिली आहे याची त्याला जाणीव असते; पण तरीसुद्धा ती आपली आई नाही ही वस्तुस्थिती असताना तिचे नानांबरोबर संबंध असावेत ही गोष्ट त्याला बिलकुल पटत नसते.

एवढेच नव्हे तर ती पुन्हा गावातल्या फौजदाराकडेही जाते, ही गोष्ट तर राजाला सर्वांत धक्कादायक वाटत असते. सगळ्या गावात नानांची छी:थू: होत असलेली त्याला सहन होत नसते. त्याच वेळी चंद्राक्काला कोणी 'वेश्या' म्हटलेलंही त्याला पटत नसते. तरी पण या सगळ्या त्रासाचे मूळ असलेली चंद्राक्का घरातून गेली पाहिजे, घराचा व नानांचा मान परत राहिला पाहिजे असं तो ठरवतो आणि तसं तो घडवतोही. थोडंसं स्वत:च्या मनाविरुद्धच. तरीही एका स्वत:च्या तत्त्वासाठी.

हाच भावडा राजा, एकीकडे लग्न केल्यावर बायकोबरोबर 'चावटपणा' मुळीच करणार नाही असे ठरवत असतो, तर दुसरीकडे एका छानशा मुलीवर मन अडकून बसतो. तिचं खरं नावही त्याला माहीत नसतं. तो तिला 'गुलबकावली' म्हणत असतो. तिच्यावर मरत असतो, तिच्याशी लग्न करायचा बेत रचत असतो; पण एक दिवस वामन्या त्याला वेगळंच काही धक्कादायक सांगतो. त्या मुलीला–पुष्पीला–घेऊन सिनेमाला कसे गेलो, थिएटरमध्ये 'वरवर' गंमत कशी केली, नंतर एकांतात पूर्ण मजा कशी मारली याचे रसभरित तो वर्णन करतो. राजाला हा हादरा फार मोठा बसतो. चंद्राक्का तशी तर ही पुष्पी अशी ! आपली गुलबकावलीसुद्धा शरीराच्या आकर्षणात बुडावी ?

□

रत्नाकर मतकरींचे हे नवे नाटक 'सेक्स'-ची पौगंडावस्थेतील जाणीव या एवढ्याच विषयावर मुख्यत: केंद्रित झाले आहे; पण त्याच वेळी 'सेक्स'संबंधित इतरही गोष्टी अपरिहार्यपणे येतात. म्हणजे चंद्राक्का ही तरुण आणि सुंदर आहे. ती नानांवर भक्तियुक्त प्रेम करते. तरीही साठीकडे झुकलेल्या नानांपेक्षा तरणाबांड फौजदारच तिच्या शारीरिक गरजा पूर्ण करू शकतो, हे आकर्षण तिला सोडवत नाही. नानांनादेखील याची जाणीव आहे. नाना चंद्राक्कामध्ये शरीरापेक्षा मनाने जास्त गुंतलेले असतात.

चंद्राक्काने जाऊ नये आणि जावे असे दोन्ही एकदमच राजाला वाटते. आपण चंद्राक्काला घालवून दिली ते बरोबर होते का ? नीती म्हणजे काय ? नीतीविषयक आपल्या कल्पना इतरांवर लादणे योग्य आहे का ? हे प्रश्न राजाला वृद्धत्वाच्या वेळी सतावत असतात. नाटककारालाही हेच प्रश्न प्रामुख्याने मांडायचे आहेत.

संपूर्ण नाटक अत्यंत बांधेसूद व वेगवान आहे. प्रत्येक प्रसंग हा आवश्यकच आहे. संवाद अर्थपूर्ण आणि नाटकाची कथा पुढे सरकवणारे आहेत. वेळप्रसंगी ते नाट्यपूर्ण होतात; पण नाटकी कधीच होत नाहीत, हे मतकरींचे यश !

नाटकाच्या उत्तम संहितेबरोबरच दिग्दर्शक कमलाकर सारंग यांनीही उत्तम कामगिरी बजावली आहे. एका नाजूक विषयावरील संघर्ष मांडणारे, मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करणारे हे नाटक आहे याचे त्यांनी सतत भान ठेवले आहे. सर्वच पात्रांना अत्यंत संयत हालचाली दिल्या आहेत. नाटक कुठेही 'हॉट' होणार नाही याची त्यांनी दक्षता घेतली आहे.

अभिनयाच्या बाबतीत विराज चिटणीस (राजा) याला फुलमार्क. तारुण्यनावाच्या अनोळखी विश्वात प्रवेश करताना गोंधळलेला, घाबरलेला, स्वप्नं बघणारा, बालपणाची छटा किंचित जपणारा, वडिलांना मान ताठ ठेवून जाब विचारणारा राजा त्याने सुरेखच उभा केला. नाटकाचा 'नायक' तो आहे असे म्हणायला हरकत नाही.

'आपली चंद्राक्का आकडेवाल्या फौजदाराबरोबर लागू आहे' असे स्पष्टपणे बोलणारा बिनधास 'बाळ' देवेंद्र सारळकर (जोडीदार फेम) याने अप्रतिम उभा केलाय. राजाच्या तुलनेत हे पात्र दुय्यमच आहे. कारण तो अजून 'लहान' आहे. त्यामुळेच कदाचित चंद्राक्काला राजा घराबाहेर काढायला का निघाला आहे, तिचे नक्की काय चुकले, हे त्याला उलगडत नाही. आपल्यावर आईसारखी माया करणारी चंद्राक्का चालली म्हटल्यावर तो हमसाहमसी रडतो. मुलांचा हा पूर्ण भाग लेखनदृष्ट्या व दिग्दर्शनदृष्ट्या खूपच सरस आहे आणि त्याचे या दोन्ही मुलांनी उत्तम चीज केलंय.

नानांची भूमिका कमलाकर सारंग यांनी मन लावून केलीय. कडक शिस्तीचे, वार्धक्याकडे झुकलेले नाना आवाज व हालचालींसह सुंदर रीतीने ते दाखवतात. त्यांची चंद्राक्काविषयीची ओढ आणि प्रेम, तिचे बाहेरचे प्रकरण कळल्यावर येणारा राग, राजावरचा वरून राग पण अंतर्यामी वात्सल्य, तो घराबाहेर पडल्यानंतरची घालमेल आणि ती लपवण्याचा प्रयत्न, तो परतल्यावरचा आनंद (मारायला घेतलेली छडी आपोआप गळून पडण्याचा 'टच' छान !) या सर्वांसह कमलाकर सारंगांचा नाना विश्वसनीय झाला.

आईवेगळ्या मुलांवर आईसारखं प्रेम करणारी, नानांच्या माडीवर जाणारी, शरीराच्या आकर्षणानं आणि ओढीनं फौजदाराकडे जाणारी चंद्राक्का लालन सारंग यांनी झकासपैकी (मार खाण्यासह) वठवली. नाटककाराला चंद्राक्का किती तरुण अभिप्रेत आहे ? समजत नाही; पण लालन सारंग यांनी जेवढी तरुण दाखवली ती व तेवढीसुद्धा पटली. त्यांनी आपल्या बोलण्यातला एकसुरीपणा बराचसा कमी केलेला जाणवला. ते एक छान झाले.

यात येणारे राजाच्या आईचे पात्र माझ्या मते प्रतीकात्मक आहे. त्याच्या स्वप्नात ती येते. राजा आपल्या अडचणी, दु:ख, विचार तिला सांगतो. ती त्याला सल्ला म्हणा किंवा उत्तरे देते आणि जाते. राजाचे भावडे आणि स्वप्नाळू मन व 'प्रॅक्टिकल' असा हा संवाद नसेल ना ? त्या दृष्टीने 'तुला आता माझी गरज नाही. कारण तू आता मोठा झाला आहेस' असे सांगून आईने केलेली शेवटची 'एग्झिट' या दृष्टीने तर्कसुसंगत वाटते. ही भूमिका अमिता खोपकर यांनी ठीक केली. याप्रमाणेच, वामन्या (राकेश सारंग), लक्ष्मण (राजा नाईक), बाळकू (चंदू पारखी), मन्नुआत्या (माया गुर्जर) या सर्वांनी आपापल्या भूमिका व्यवस्थित, चोखपणे बजावल्या.

अजित मर्चंट यांचे पार्श्वसंगीत व बाबा आंबेरकरांची प्रकाशयोजना, नाटकाची परिणामकारकता वाढवणारे व आपापल्या योग्य जागी होते. नानांच्या दुमजली वाड्याचा सेट बाबा पार्सेकर यांनी मस्तपैकी उभारला आहे. एकूणच निर्मितीवर बराच खर्च केलाय असे वाटते.

–निखिल गजेंद्रगडकर

एक्सोसेत....एक्सोसेत....

अमृत पुरंदरे

...' आणि अर्जुनाने आपल्या भात्यातून एक अस्त्र काढले. मोठ्या काळजीपूर्वक धनुष्याला लावले. त्या अस्त्राचे तेज बघून पांडवांच्या सैन्याने एकदम गगनभेदी आरोळ्या ठोकल्या. त्या अचानक आलेल्या आरोळ्या ऐकून कौरवांचे सैन्य गडबडले आणि हातातील कामे टाकून प्रत्येकजण आरोळ्यांचे कारण शोधू लागला आणि जेव्हा त्यांना शांतपणे डोळे मिटून मंत्रोच्चार करणारी धीरगंभीर अर्जुनाची मूर्ती दिसली व त्याच्या धनुष्याला लावलेले,तेजाने चमकणारे अग्न्यस्त्र दिसले तेव्हा त्यांची घबराट झाली.

आपल्या रथामध्ये उभ्या असलेल्या दुर्योधनाच्या कपाळावर आठ्या पडल्या. चिंतेच्या मुद्रेने त्याने जेव्हा कर्णाकडे पाहिले तेव्हा कर्णसुद्धा काळजीमध्ये पडलेला दिसला; परंतु क्षणभरातच कर्णाचा चेहरा नुकतेच अॅस्प्रा खाल्लेल्या माणसाप्रमाणे खुलला व त्याने दुर्योधनाला, ज्याप्रमाणे गावस्कर थम्सअपच्या जाहिरातीत निर्देश करतो त्याप्रमाणे केला. दुर्योधनाने सुटकेचा निश्वास टाकला. एवढ्यात प्रचंड गडगडाचा आवाज झाला. दुर्योधनाने चमकून आवाजाच्या दिशेने पाहिले. तेव्हा त्याच्या लक्षात आले की हा गडगडाट ढगांचा नसून अर्जुनाच्या गांडीव-धनुष्याचा टणत्कार आहे.

एखाद्या विजेच्या लोळाप्रमाणे अग्न्यस्त्र आकाशात झेपावले. पुन्हा एकदा पांडवांच्या सैन्याने प्रचंड चीत्कार केला. क्षणातच आकाशातून अग्नीचा वर्षाव कौरवांच्या सैन्यावर होऊ लागला. द्रोणाचार्यांनी रचलेला व्यूह विस्कटून सर्व सैन्य सैरावैरा धावू लागले. इतक्यात कर्णाने त्याच्या भात्यामधून एक तेजस्वी अस्त्र काढले. त्वरेने धनुष्याला लावले. मंत्र पुटपुटला. धनुष्य आकर्ण ताणले आणि धरणी दुभंगणारा आवाज करीत आपले अस्त्र आकाशात सोडले. त्या आवाजाने, भयभीत होऊन पळणारे कौरवांचे सैन्य स्तंभित झाले व काय झाले हे कळल्यानंतर पांडवांच्यापेक्षा मोठ्या गर्जना देत मूळच्या जागांकडे पुन्हा जाऊ लागले. कर्णाने सोडलेले अस्त्र हे पर्जन्यास्त्र होते. त्याच्यातून धो धो, पाऊस पडू लागला व अग्न्यस्त्राचा प्रभाव संपला'..

अशा महाभारत, रामायण पुराणात असलेल्या गोष्टी मोठ्या मनोरंजक असतात. एक जादू अस्त्र आणि दुसरे त्याहीपेक्षा जादू अस्त्र. पहिल्या अस्त्राला दुसरे अस्त्र हे उत्तर हल्लीच्या जगात हे असंच चालले आहे.

बोटी उध्वस्त करण्यासाठी एक अस्त्र हे अस्त्र उडवण्यासाठी दुसरे अस्त्र ते अस्त्र निकामी करण्यासाठी तिसरी यंत्रणा वगैरे.

नुकतेच आपण एक्सोसेत नावाचे क्षेपणास्त्र फ्रान्सकडून विकत घेतले. या अस्त्राने अर्जेंटिनाकडून उत्तम कामगिरी बजावली. ब्रिटिशांची अनेक जहाजे बुडवली. त्यात शेफील्डनावाची मोठी, अत्याधुनिक युद्धनौका सुद्धा होती. एवढ्या प्रचंड मोठ्या, महाकाय युद्धनौकेचा बळी एका स्वस्त क्षेपणास्त्राने घेतल्यामुळे समुद्रावरील युद्धाचा साचाच बदलतो की काय अशी भीती मोठ्या राष्ट्रांना वाटत आहे. अक्राळविक्राळ आकारांच्या आणि भयंकर किंमतीच्या विमानवाहू नौका बनवाव्यात का नाही ? ज्या आहेत त्यांचे काय ? असे यक्षप्रश्न निर्माण झाले आहेत.

एका 'निमित्झ' एवढ्या विमानवाहू नौकेची किंमत साधारणपणे पस्तीस अब्ज रुपये (३.५×१०^{१०}) एवढी असते. एक एक्सोसेत' क्षेपणअस्त्र फक्त पंचवीस लाख रुपयांना मिळते.

फार खोलात जाण्याऐवजी आपण आधी 'एक्सोसेत' हे नेमकं काय आहे ? ते कसे असते ? इ. गोष्टी विचारात घेऊ.

काही वर्षांपूर्वी तयार केलेली क्षेपणास्त्रे ही वजनाने जास्त, धातूने बनवलेली आणि अचूकतेमधे कमी अशी होती. त्यामुळे अशी अस्त्रे बोटींवरच्या रडारयंत्रावर चटकन दिसत. अर्थातच लक्ष्यावर येऊन आदळायच्या आधीच ती स्वतः लक्ष्य बनलेली असत.

१९७२ साली फ्रान्सने प्रथम 'एक्सोसेत' नावाचे क्षेपणास्त्र बनवले. हे वजनाने हलके होते. कारण त्याचे कवच जवळजवळ संपूर्णपणे फायनरग्लासचे होते. अर्थातच यामुळे ते रडारला चटकन लक्षात येणार नव्हते. त्यामध्ये एक छोटासा कॅम्प्युटर, एक रडार व एक रेडिओअल्टीमीटर (उंचीमापक) बसवले होते. एक छोटी पण शक्तिशाली बॅटरी या सर्वांना पुरेसा विद्युतपुरवठा करणार होती.

याची वेधकता आणि उपयुक्तता इतकी मोठी होती की, जगातून अनेक राष्ट्रांनी या अस्त्रांची मागणी केली. ग्रीसने तर ही अस्त्रे फ्रान्सच्याही आधी आपल्या बोटींवर बसवली. १९७८ पर्यंत ही अस्त्रे विमानातून समुद्रावर, समुद्रातून समुद्रात वा समुद्रातून विमानावर मारायची सोय झाली.

एक्सोसेत अस्त्र एखाद्या लक्ष्यावर विमानातून सोडायचे असेल तर ते ७३ कि. मी. अंतरावरून सोडता येते. पूर्वी विमानाला सूर मारून लक्ष्याच्या जवळ जाऊन मग हल्ला करावा लागत असे, एक्सोसेत १०००० मीटर उंचीवरून सोडताना त्याच्यातील कॉम्प्युटरला लक्ष्याच्या ठिकाणासंबंधी सूचना दिल्या जातात. क्षेपणअस्त्र निघाले की प्रथम ते पायऱ्या-पायऱ्यांनी समुद्राच्या पातळी-

पर्यंत येते. त्यात बसवलेल्या उंचीमापकामुळे त्याची समुद्रापासूनची उंची आपोआप नियंत्रित केली जाते. जवळजवळ आवाजाच्या वेगाने (०.९२ मॅक) हे अस्त्र लक्ष्याकडे क्षेपावत असते, त्याच्या नाकामधे रडार बसवलेले असते. जेव्हा क्षेपणास्त्र लक्ष्यापासून दहा किलोमीटर अंतरावर येते तेव्हा ते समुद्राच्या पातळीपासून फक्त दोन मीटर-वरून उडत असते. याच वेळेला रडार आपले कार्य चालू करते. आपले लक्ष्य बरोबर टिपून क्षेपणास्त्राला लक्ष्याच्या बरोबर मध्याचा नेम लावून देते. वेगाने एक्सोसेत जेव्हा लक्ष्यावर आदळते तेव्हा त्याच्यातील दारुगोळा एकदम उडून लक्ष्य नष्ट होते.

फार पूर्वी क्षेपणास्त्रे ही उंचावरून येऊन बोटीवर वरून हल्ला करत असत. याचे कारण अतिशय जाड चिलखत असलेल्या बोटींना वरून हल्ला केला तर काहीही प्रतिकार करता येत नसे. परंतु नव्या रडार-नियंत्रित तोफा व क्षेपणास्त्रे विरोधी क्षेपणास्त्रांमुळे ही क्षेपणास्त्रे कालबाह्य ठरली. समुद्राला चिकटून येणारे एक्सोसेत रडारला दिसणे महामुष्कील ! ते समुद्रापासून इतके जवळून उडते की त्याची रडारवर येणारी प्रतिमा ही गोंधळात टाकणारी येते. कारण रडार क्षेपणास्त्रे आणि त्याची पाण्यावरून परावर्तित झालेली प्रतिमा यांना वेगळे करू शकत नाही. तसेच समुद्राच्या लाटांमुळे रडारच्या पडद्यावर बरेच ठिपके येतात. आणखी एक गोष्ट म्हणजे विमानविरोधी तोफा किंवा बंदुका क्षितिजरेषेच्या खाली नेम धरू शकत नाहीत. या सर्व गोष्टी एक्सोसेत या समुद्राला घासत येणाऱ्या क्षेपणास्त्राला जवळजवळ अभेद्य बनवतात.

'एक्सोसेत' याचा अर्थ 'उडणारा मासा'. या उडणाऱ्या माशाच्या संशोधनातला सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे त्याचे समुद्रालगतचे अतिवेगवान आक्रमण नियंत्रित करणे. सुरुवातीला ही गोष्ट कोणालाच जमत नव्हती; परंतु एका फ्रेंच कंपनीने वजनाने हलका असा रेडिओ अल्टीमीटर (उंचीमापक) तयार केला. या मीटरमधून रेडिओलहरी समुद्राकडे सोडल्या जातात. त्या परत एकवटल्या जातात. उंचीबद्दलची सर्व माहिती यामुळे कॉम्प्युटरला मिळते. कॉम्प्युटर अतिशय शीघ्रगतीने एक मोटरचे नियंत्रण करतो. ही मोटर क्षेपणास्त्राच्या शेपटामधे असलेल्या सुकाणूचे नियंत्रण करते. अशा प्रकारे कितीही कमी उंचीवरून या 'उडणाऱ्या माशाचे' उड्डाण नियंत्रित केले जाते.

क्षेपणास्त्र सोडण्यापूर्वी (विमानातून किंवा बोटीतून) त्याला काही माहिती नक्की द्यायला लागते. त्याची सुरुवातीची दिशा, लक्ष्याचे अंदाजे अंतर, उडण्यासाठी वापरावयाची उंची या गोष्टी 'सांगून' एकदा का त्याचे बटण दाबले की विमान किंवा बोट आपली दिशा बदलू शकते.

या प्रकारचे क्षेपणास्त्र इतके चांगले असेल असे शास्त्रज्ञांना वाटत नव्हते; परंतु जेव्हा 'शेफील्ड' सारखी प्रचंड युद्धनौका केवळ एकाच क्षेपणास्त्राने बुडली तेव्हा मात्र शास्त्रज्ञ चमकले. अशा प्रकारच्या क्षेपणास्त्रांच्या सहाय्याने कोणत्याही छोट्या देशाची नौसेना कोणत्याही बलाढ्य नौसेनेला नक्की शह देऊ शकेल अशी भीती अनेक शास्त्रज्ञांना वाटत आहे.

रेसचे घोडे

याच्या विरोधी सूर काही शास्त्रज्ञांनी लावलेला आहे. त्यांचे म्हणणे असे की, 'शेफील्ड' व्यवस्थित संरक्षित नव्हती. तिच्यावर हल्ला करणाऱ्या विमानाने केवळ ४० कि. मी. अंतरावरून हल्ला केला. (एक्सोसेत ७२ कि. मी. वरून सोडता येते). त्यामुळे क्षेपणास्त्रामधील सर्व इंधन जळाले नव्हते. त्याचप्रमाणे शेफील्ड बोटीचे चिलखत फार जाड नव्हते. अर्थातच एकाच अस्त्राचा स्फोट मोठा होऊन शेफील्ड बुडाली. सर्वसाधारणपणे एवढ्या मोठ्या बोटी नेहमी इतर छोट्या बोटींनी वेढलेल्या असतात. तसेच त्याच्यावर विमानातूनसुद्धा छत्र धरले जाते; परंतु 'शेफील्ड' अशा प्रकारे संरक्षित केली गेली नव्हती. शेफील्ड ही विनाशिका होती; परंतु विमानवाहू नौका, क्रुझर्स किंवा युद्धनौका यांच्यावर बरेच जाड चिलखत असते. या शास्त्रज्ञांच्या मते एक्सोसेतसारख्या एका क्षेपणस्त्राच्या आघाताने बोट निकामी होणे ही अशक्य बाब आहे. बुडणे तर लांबच राहिले !

आता प्रश्न उरतो तो शेफील्डवर हल्ला करणारे विमान इतक्या जवळ मुळात येऊच कसे शकले ? विमान कमी उंचीवरून उड्डाण करून एखाद्या वेळेला बोटीच्या रडारला फसवेल; परंतु त्याने ब्रिटिश 'निमोर्ड' विमानांना कसे फसवले ? 'निमोर्ड' विमाने ही 'इलेक्ट्रॉनिक इंटेलिजन्स प्लेन्स' म्हणून

काट्याने काटा

शस्त्रस्पर्धेमधला दुसरा भाग म्हणजे अस्त्राला प्रतिअस्त्र निर्माण करणे, हल्ल्याच्या विरुद्ध बचाव करणे. ही हल्ला आणि बचावाची साखळी मोठी विचित्र आहे.

आपण समुद्रावरच्या एक्सोसेतसारख्या क्षेपणास्त्रांना विरोध करण्यासाठी काय उपाय योजले जातात किंवा बचाव कसा केला जातो ते बघू.

(१) बोटीचे चिलखत जाड बनवले जाते.

(२) ज्या विमानातून किंवा बोटीतून क्षेपणास्त्रे सोडली जातात तीच नष्ट करणे. कारण क्षेपणास्त्र सोडायच्या कक्षेमध्ये येण्याआधीच विमाने किंवा बोटी रडारला दिसतात.

(३) क्षेपणास्त्रविरोधी क्षेपणास्त्र बनवणे. सध्या ब्रिटनकडे 'सी बुल्फ' अमेरिकेकडे 'सी स्पॅरो' या नावाची क्षेपणास्त्रे विरोधी क्षेपणास्त्रे आहेत. ही अस्त्रे हल्ला करणाऱ्या क्षेपणास्त्राच्या, बचाव करणाऱ्या जहाजाच्या रडार प्रतिमेवरून आपले लक्ष गाठतात. त्यांची लांबी ३.५ मीटरएवढी असते.

(४) नवीन 'फॅलॅंक्स (phalanx) व्हल्कन जातीची मशीनगन जिच्या सहा नळ्यांमधून मिनिटाला ३०००, २० मि. मि. च्या गोळ्यांचा वर्षाव होतो. बोटीभोवती शिशाची भिंतच उभी केली जाते. यातली एक गोळी जरी क्षेपणास्त्राच्या नाकामधील रडारला लागली तरी लक्षवेध अचूक करण्याची अस्त्राची क्षमता संपते. क्षेपणअस्त्रच नव्हे तर अंगावर येणारा तोफगोळासुद्धा या बंदुकीने नष्ट करता येतो.

(५) क्षेपणास्त्राच्या रडारला फसवण्यासाठी ॲल्युमिनियमच्या लांब पट्ट्या बोटीवरून तोफेच्या प्रकारच्या गोळ्याने लांब सोडल्या जातात. यामुळे रडार गोंधळात पडते व वेगळ्याच लक्षावर हल्ला करते.

संबोधिली जातात. या विमानांवर अतिशय शक्तिशाली रडार बसवलेले असते. या रडारच्या सहाय्याने 'निमोर्ड' शत्रूच्या विमानांचा दुरूनच वेध घेते. त्याच्या वेगाची, दिशेची आणि अंदाजे लक्ष्याची सूचना योग्य ठिकाणी देते. थोडक्यात सांगायचे झाले तर मूळ युद्धात सामील न होता अतिशय मोलाचे सहाय्य करते. हल्ली विमानांमधे 'रडार जामर' म्हणजे रडार तात्पुरते निकामी करण्याची यंत्रणा बसवलेली असते. अशा यंत्रणेचा या विमानावर परिणाम होत नाही. त्यामुळे हल्ला करणाऱ्या विमानाने प्रतिकार करणाऱ्या विमानाचे रडार जरी बंद पाडले तरी 'निमोर्ड' विमानांवरून अशा विमानांना योग्य मार्गदर्शन केले जाते. अमेरिकेकडे 'हॉकआय' नावाची अशाच प्रकारची 'इलेक्ट्रॉनिक इंटेलिजन्स प्लेन्स' आहेत. युद्धतज्ज्ञांच्या मते ब्रिटिश निमोर्ड विमानांचा तळ अर्जेंटिनापासून फारच लांब म्हणजे ३००० कि. मी. वर होता. त्यामुळे अर्जेंटिनाचे विमान बोटीजवळ आल्याचे लक्षात यायला ब्रिटिशांना उशीर लागला. यामुळे ब्रिटिश विमाने योग्य ठिकाणी वेळेवर पोहचू शकली नाहीत.

थोडक्यात काय तर एकदा एक बोट बुडवायला जमलं; पण ते सारखं-सारखं जमणार नाही !

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात एखादी बोट बुडवायची झाली तर त्यासाठी इतर बोटींना बरेच जवळ जाऊन हल्ला करावा लागायचा किंवा विमानांना बोटीवर जवळून सूर मारून बॉंबफेक करावी लागायची; परंतु बोटीवर रडार आले आणि त्यामुळे युद्धाचे तंत्रच बदलले. जसजशी शक्तिशाली रडार्स बोटींवर बसायला लागली तसतसे इतर बोटींचे त्या बोटीपासूनचे अंतर वाढत गेले.

मग क्षेपणास्त्रांचे युग चालू झाले. क्षेपणअस्त्र अचानक, मोठ्या वेगाने, उंचावरून बोटीवर हल्ला करू लागली. बोटींचे भवितव्य धोक्यात आले. कारण यापूर्वी समुद्रावर साम्राज्य करणाऱ्या बोटींना असा धोका कधीही आला नव्हता. (जपानच्या आत्महत्या करणाऱ्या वैमानिकांच्या जीवघेण्या तुकडीचा अपवाद वगळावा. 'कमिकेझ' जातीची विमाने घेऊन हे वैमानिक सरळ बोटींवर धडक मारत असत.) परंतु रडारमध्ये सुधारणा करून या अस्त्राचा अगोदरच वेध घेण्याचे अतिशय अचूक तंत्र शोधून काढले गेले. लगेच शास्त्रज्ञांनी समुद्राला घासत येणारी एक्सोसेतसारखी क्षेपणास्त्रे बनवली. ही रडारला लगेच लक्षात येईनात. पुन्हा बोटींचे पारडे हलके झाले; पण उत्तर सापडले. क्षेपणअस्त्राच्या रडारला बंद पाडणारी उपकरणे निघाली. सहा नळ्यांची आणि भारी वजनाच्या गोळ्यांचा वर्षाव करणारी काम्पूटर आणि रडारने नियंत्रित केलेली मशिनगन निघाली. बोटींचे पारडे पुन्हा जड झाले.

परंतु आता अतिशय धोकादायक नवीन जहाजविरोधी क्षेपणास्त्रे उदयाला येत आहेत. ही कमालीच्या वेगाने (ध्वनीच्या तिप्पट वेगाने) चार, चारशे कि. मी. आपल्या लक्षाकडे क्षेपावत जाऊ शकतील. रशियाच्या टी. यू.–२६ विमानांनी अशी अस्त्रे बसवली सुद्धा आहेत. ही अस्त्रे समजा नवीन तंत्राने निकामी करता येऊ लागली तर काय ? शास्त्रज्ञांनी त्याचा विचार आत्ताच करायला सुरुवात केली आहे. याच्यानंतरच्या क्षेपणअस्त्रांमध्ये इलेक्ट्रॉनिक जॅमर बसविले जातील. त्यांच्यामुळे रडारच्या सहाय्याने हल्ला करणाऱ्या तोफा, मशिनगन्स किंवा क्षेपणास्त्रांना निकामी करेल. (जॅमरमुळे रडारचे कार्य थांबवता येते.) किंवा रडारशिवाय अन्य मार्गदर्शक तंत्रांचा उपयोग करून क्षेपणास्त्रे बनवली जातील. उदाहरणार्थ इन्फारेड किंवा लेसर सिस्टम्स् किंवा टी. व्ही. मार्गदर्शक व शोधक पद्धत. यामुळे क्षेपणास्त्रांचे पारडे पुन्हा जड होईल.

पण बोटींची ही धोकादायक स्थिती कायम राहील असे कोणी सांगावे ? उद्या एखादा नवीन शोध लागेल, बोटींचा भाव पुन्हा वधारेल. हे युद्ध एखाद्या सीसॉप्रमाणे इकडे-तिकडे वरखाली होत राहणार. एखाद्या घोड्यांच्या रेसप्रमाणे हा खेळ चालू आहे. एकाच घोड्यावर जो कोण सर्व पैसे कायम लावेल तो बुडलाच म्हणून समजा !

□

हार्पून–एक्सोसेत

वेगवेगळ्या अस्त्रांची आणि शस्त्रांची नेहमीच चढाओढ चालू असते. मोठे देश त्याला 'शस्त्रस्पर्धा' असे म्हणतात. समुद्रात जहाजांवर वापरावयाच्या क्षेपणास्त्रांमध्ये अशीच चढाओढ चालू आहे.

जगात जी काही सर्वांत चांगली खपणारी क्षेपणास्त्रे आहेत त्यांमध्ये 'एक्सोसेत' हे एक आहे. बहुधा जगातले २५ वेगळे देश ही अस्त्रे बाळगून आहेत. आतापर्यंत १८००० अस्त्रे विकली गेली असावीत असा रशियाचा कयास आहे.

'हार्पून' हे अमेरिकेने तयार केलेले क्षेपणास्त्र. नुकतेच पाकिस्तानला हे अस्त्र देण्याचे अमेरिकेने कबूल केले आहे. भारताने लगेच त्याच्याविरुद्ध आवाज उठवला. कारण 'हार्पून' 'एक्सोसेत'पेक्षा जास्त मारक आहे असा अमेरिकेचा दावा आहे. खाली 'हार्पून' आणि 'एक्सोसेत' यांची समांतर माहिती दिली आहे.

	GM34A हार्पून	Am39एक्सोसेत
लांबी	४ ५ मीटर	५ मीटर
व्यास	४ ३० सें. मी.	३५. सें. मी.
लक्षवेधाची क्षमता	११० कि. मी.	७२. कि. मी.
इंजिन/इंधन	टर्बोजेट इंजिन (रॉकेटप्रमाणे)	घन इंधन
किंमत अंदाजे	रु. ७७,३०००/–	रु. ३०,००००/–

हार्पूनवर असलेली इलेक्ट्रॉनिक यंत्रणा जास्त गुंतागुंतीची आहे. अर्थातच भारताची 'एक्सोसेत' हार्पूनशी बरोबरी करू शकणार नाहीत. त्यामुळे नवीन जास्त शक्तिशाली अस्त्रे घेणे भारताला भाग पडणार. पर्यायाने शस्त्रस्पर्धा सुरू. पर्यायाने बड्या राष्ट्रांची जास्त अस्त्रे विकली जाणार. पर्यायाने त्यांची खळगी भरली जाणार, उखळ पांढरे होणार !

□

इंटरवल....

◻ मुंबैची हवा, एकच प्याला

वेधशाळेलाही ज्या हवेचा अंदाज वर्तविणं कठीण जाईल अशी 'हवा' नाटकवाल्यांची असते, आहे. 'हवा मे उडता जाए' म्हणजे डोक्यातल्या हवेनिशी जमिनीवरुन उडत जाणारा...

असे हवामे उडनेवाले जनतापार्टीच्या मंत्रिमंडळासारखे कधीही कोसळू शकतात, नव्हे कोसळतात आणि कोसळल्यावर त्यांना जाग येते...पण तेव्हा डोक्यातली हवा (आणि नशाही) पार उतरलेली असते... आणि मग हाती रहातो तो पश्चात्ताप; पण त्यांचा पश्चात्तापही हवेसारखाच, क्षणाचा! पुन्हा मूळ स्वभाव. जित्याची खोड मेल्याशिवाय थोडीच जाते.

आता हेच बघा ना, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचा विद्यार्थी, फार्सचा (खरोखरचा) बादशहा आणि अत्यंत (विचारी) कुशल दिग्दर्शक श्री. शशिकांत निकते...आज त्याच्यासारखा 'फार्समास्टर' रंगभूमीवर कोणीही नाही, पण हा महाभाग एकच प्यालाचे दिवसाला अनेक प्रयोग करुन 'एकच प्याला' हाच माझा जन्मसिद्ध हक्क आहे असं म्हणून वेळोवेळी नशा डोक्यात घेऊन अनेक निर्मात्यांचे, कलाकारांचे, बॅंक-स्टेजवर्कर्सचे नुकसान करणार असेल तर...

अशा नशेबाज हवामे उडता जाएवाल्यांना नाटचसृष्टीने हाकलून देणंच योग्य नव्हे काय? पण तेही इथं शक्य नाही. कारण लाचारी. पणशीकरांच्या महाराणी पद्मिनीचे दिग्दर्शन आणि त्यातली मुख्य भूमिका करणारा हा नट, दारूच्या ग्लासात एका प्रयोगाला पार बुडाला आणि प्रयोगाला आलाच नाही.

प्रभाकर पणशीकर जाम भडकले, अगदी इथे ओशाळला मृत्युमधल्या औरंगजेबासारखे, परत त्याला उभा करणार नाही ही शपथ घेऊन त्यांनी त्याच्याऐवजी राघवेंद्र कडकोळलाही उभे केले...हा धीटपणा पाहून बरं वाटलं...पण–पण हे थोडा वेळच बरं का ...कारण शुक्रवारी दोन सप्टेंबर, नाटचसंपदा आयोजित नव कलाकार मेळाव्याचे संचलन जान्हवी खांडेकर आणि...आणि शशिकांत निकते करत होते...आता ठरवा तुम्हीच काय ते!

◻ श्रीकांत मोघे आणि प्राइव्हेट लाइफ

कोणत्याही 'प्राइव्हेट' लाइफात लक्ष घालायची आपली संवय नाही.

कारण कोणत्याही प्राइव्हेट लाइफात पाय घातला की तो कशात काय नि लफडयात पाय ठरणारच.

पण कसं कोण जाणे.

आज मला श्रीकांत मोघ्यांच्या 'प्राइव्हेट लाइफ 'मध्ये माझं नकटं नाक खुपसायची इच्छा होतेय.

श्रीकांत मोघे म्हटलं की आठवतं फक्त (आणि फक्तच) लेकुरे उदंड जाहली.

बाकीच्या नाटकात कितीही गंभीर भूमिका असली तरी ते लेकुरेच्या स्टाइलनं करण्यात मोघ्यांचा हातखंडा. अश्वमेधमधली भूमिकाही त्यांनी ह्या हातखंड्यानेच (मारली) साकारली होती.

तर अशा हातखंड्या मोघ्यांनी सुमारे नऊ वर्षांपूर्वी

मराठी नाटक 'असूनी नाथ मी अनाथ' ह्यावर आधारित

असलेल्या एका (मराठी नव्हे तर) हिंदी चित्रपटात भूमिका करण्याचे ठरविले.

म्हणजे त्यांना त्यातल्या 'व्हिलन'च्या भूमिकेसाठी 'सहीवद्ध' केले.

मोघेच ते, अगदी आनंदून गेले, हुरळूनही गेले असावेत.

बी. के. आदर्श दिग्दर्शित आणि जयमाला-निर्मित हा चित्रपट नऊ वर्षं रखडून शेवटी 'रिलीज' झाला. श्रीकांत मोघे, सुधीर मोघे आणि मंडळी आणि समस्त मोघे-परिवार मोठया उत्साहाने दया डोंगरे, सुरेश खरे, भावनाबाई, गीवा हिंदूचे समस्त सगळे, आणि ॲक्टिव्हवाले ह्यांच्यासह प्राइव्हेट लाइफ 'च्या प्रिमियरला गेले... प्राइव्हेट लाइफ सुरू झाला आणि... मोघ्यांचे प्राइव्हेट लाइफ उध्वस्त व्हायची वेळ आली...

चक्क नऊ बेडसीन्स आणि तेही जयमाला बरोबर आणि तेही हिडीस, लोकांची वासना भडकविणारे, लोकांना चाळविणारे...बरोबर आलेले सगळे सखे–सोयरे गरगरलेच; पण मोघ्यांनाही गरगरायला लागलं...केवळ दोन बेडसीन्स शूटिंगच्या वेळेस दिले असत्याचे मोघ्यांना व्यवस्थित आठवत असताना पडद्यावर नऊ बेडसीन्स? 'अरे, आपण दिले कधी एवढे बेडसीन्स?' मोघे स्वत:-लाच वारंवार चिमटे काढून विचारताना सध्या दिसताहेत.

राजा गोसावी आणि थर्ड क्लास

राजा गोसावी... विनोदाचा बादशहा.

त्यांचा एक जुना पण मराठी माणसाचा मराठी बाणा दाखविणारा किस्सा सांगतो.

राजा गोसावी मराठीत खूप फॉर्मात होते तेव्हाचे दिवस. मराठीची बहुमोल (?) कामगिरी लक्षात घेऊन त्यांना 'ए. व्ही. एम' ह्या मद्रासच्या सुप्रसिद्ध कंपनीनं आपल्या एका चित्रपटात घेतलंही.

मद्रासला शूटिंग होतं.

कंपनीतर्फे एअरकंडिशन्ड फर्स्टक्लासचे तिकीट बुक करण्यात आलं होतं.

राजाभाऊ गोसावींना गाडीत बसविण्यासाठी कंपनीचा एक माणूसही त्यांच्यासोबत आला. त्यानं राजा गोसावींना त्यांच्या जागेवर बसवले. त्यांना व्यवस्थित निरोपही दिला.

गाडी सुटायला थोडा अवधी होता.

निरोप देऊन तो माणूस निघून गेला.

प्लॅटफॉर्मवरून बाहेर पडल्यावर त्याला त्याच्या हातात असलेल्या एका पॅकेटची आठवण झाली... तो क्षणभर हादरला... एक विग् कोणत्याही परिस्थितीत मद्रासला पोहोचवायचा होता, विग् तर हातात! तसाच तो मागे फिरला. अक्षरश: धावत तो राजा गोसावी ज्या डब्यात बसले होते त्या डब्याकडे आला...

झाला प्रकार होऊन फक्त दहा मिनिटंही झाली नसतील.

तो राजाभाऊंच्या डब्यात... डब्यामध्ये राजाभाऊ नाहीत की त्यांचे सामानही नाही. तो आणखीन हादरला... आजूबाजूला चौकशी केली तर समजलं डब्यातला माणूस सामानासह उतरून केव्हाच गेलाय!...

क्षणभर तो माणूस... काय अवस्था झाली असेल त्याची... कल्पना करा... तो डब्यातून उतरला... राजाभाऊंना शोधायला... तेवढयात गाडी सुटली .. त्याला सुचेना... इतक्यात... इतक्यात त्याचं लक्ष सहज थर्ड क्लासच्या डब्याकडे गेलं... ही गर्दी आणि त्या गर्दीत राजाभाऊ त्यांच्या सामानासह लटकत होते... आता बोला? त्या दहा मिनिटांत राजाभाऊंनी आपला मराठी बाणा दाखविला!

— नाटक्या

हातच्या कांकणाला आरसा कशाला?

नव्या २० कलमी कार्यक्रमाच्या अंतर्गत प्रगति आणि भरभराट यादृष्टीने मिळविण्यात आलेले यश उत्साहवर्धक आहे. खालील निवडक कार्यक्रमांत तर निर्धारित लक्ष्याच्या पलिकडे पण मजल मारण्यात आली आहे.

हे यश म्हणजे प्रगतीचे बोलके चित्रच

- जलसिंचनाच्या सोयी
- समन्वित ग्रामीण विकास योजना
- वैठबिगार मजुरांची मुक्तता
- अनुसूचित जातींचे कल्याण
- समस्या गांवातून पिण्याच्या पाण्याची सोय
- वृक्षारोपण
- समन्वित बाल विकास योजना खंडांची स्थापना

सरकारतर्फे लक्ष्य पूर्तीकडे सतत नजर ठेवण्यात येत आहे. अर्थात प्रगतीचा वेग कायम ठेवण्यासाठीं गरज आहे लोकांच्या सहकार्याची

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीं आपण प्राणपणानें कामाला लागू या

davp 83/169